
HAKARA

# हाकारा

वर्ष : एकविसावे • अंक तिसरा
जुलै - सप्टेंबर २०००



## पाणी टंचाई आणि पाणलोट विकास

THE MAHARASHTRA ASSOCIATION OF ANTHROPOLOGICAL SCIENCES

## रौप्य महोत्सवी वर्ष

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

## कार्यकारी मंडळ

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | प्रा. रा. के. मुटाटकर |
| उपाध्यक्ष | : | डॉ. विजय भानू |
| मुख्य सचिव | : | डॉ. सुधाकर मोराणकर |
| सह सचिव | : | पुरूषोत्तम आगाशे |
| खजिनदार | : | जयवंत मंत्री |
| सभासद | : | ॲड. पदमाकर वळवी (आमदार) |
| | | डॉ. मिलिंद बोकील |
| | | सुधीर जोग |
| | | गणपत पंडित |
| | | आरती कौलगेकर |
| | | सुमेध गुर्जर |

दलित, आदिवासी, भटक्या-विमुक्त जाती, इतर अकिंचन कष्टकरी वर्ग आणि स्त्रिया यांच्या शोषणमुक्तीसाठी जर कुठे लोकशाहीच्या तत्त्वावर चळवळ संघटित होत असेल तर तिला पाठिंबा देणे, तिच्याशी आपल्या विचारांचा अनुबंध राखणे हे मी माझे कर्तव्य समजतो. प्रबोधनाची हीच खरी योग्य दिशा आहे, असे मला वाटते.

**गं. बा. सरदार**

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता !

**महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे नियतकालिक**

# हाकारा

(त्रैमासिक)



वर्ष : एकविसावे • जुलै - सप्टेंबर २००० • अंक : तिसरा

संकल्पना / प्रेरणा
प्रा. गं. बा. सरदार

संपादक - मुद्रक - प्रकाशक
रामचंद्र मुटाटकर

कार्यकारी संपादक
ग. शां. पंडित

संपादक मंडळ
मिलिंद बोकील
सुधीर जोग
श्रीनिवास इंदापूरकर
पुरुषोत्तम आगाशे

अक्षरजुळणी
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे

मुद्रण स्थळ
असाईन सिस्टिम्स्, पुणे - ३०
फोन - ४३३ ०१६२

मुखपृष्ठ छायाचित्र
परिषदेच्या संग्रहातून

प्रकाशन व पत्रव्यवहाराचा पत्ता
६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११ ००७
फोन/फॅक्स : (०२०) ५८८७२११

*अंकाचे मूल्य : रु. २५/-*

## अनुक्रम

संपादकीय

**गोंडी राजांच्या काळातील पाणी व्यवस्थापन**
श्रीनिवास इंदापूरकर ०३

**फड पद्धती : प्राचीन जलसिंचन**
नीला दात्ये ०६

**झाबुआ : परत मिळालेले नंदनवन**
अनिल अग्रवाल / सुनिता नारायण ११

**एका यशस्वी समर्पणाची कथा**
श्रीनिवास इंदापूरकर १९

**पाणलोट विकासात स्त्रियांचा सहभाग**
स्मिता गाटे २२

**सुखोमाजरी : पहिला प्रयोग**
अनिल अग्रवाल / सुनिता नारायण २७

**राळेगण सिद्धी : लोकसहभागातून....**
अप्पासाहेब घाडगे ३१

**महाराष्ट्रातील पिण्याच्या पाण्याची समस्या**
एच. एम. देसरडा ३६

अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी किंवा मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने या नियतकालिकास अंशत: अनुदान दिले असले तरी नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

# संपादकीय

'हाकारा'च्या परंपरेला साजेसा यावर्षीचा तिसरा विशेषांक 'पाणी टंचाई व पाणलोट विकास' या विषयावर काढण्यात आला आहे.

देशात जवळजवळ सगळीकडेच उन्हाळा सुरू होण्यापूर्वी पाण्याची टंचाई सुरू होते व उन्हाळ्यात ही परिस्थिती भीषण रूप धारण करते, हा नेहमीचाच अनुभव आहे. महाराष्ट्रात स्वयंसेवी संस्थांच्या प्रयत्नांनी व काही ठिकाणी ग्रामस्थांच्या श्रमदानाने पाणलोट क्षेत्रविकासाचे प्रयोग होऊ लागलेत, तर काही ठिकाणी ते यशस्वी सुद्धा झालेत. परंतु बहुतांशी भाग अजूनही दुष्काळाच्या छायेत आहे.

मुळात ही परिस्थिती उद्‌भवायला शासकीय नियोजनातील काही चुका व गैरसमज कारणीभूत आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात अधिक पर्जन्यमान असलेल्या घाटमाथ्यांवर पाणी अडवून दुष्काळी भागात पाणी आणण्याचे काही प्रयोग झाले, तोपर्यंत परिस्थिती बरी होती. परंतु त्यानंतर केवळ नदी-नाल्यांवर पाणी अडवून जलाशये, धरणे बांधण्याचा सपाटा सुरू झाला आणि आज ही परिस्थिती ओढवली आहे. खरेतर पाणी नियोजनातला हा शेवटचा टप्पा आहे. त्याआधी भूगर्भात पाणी साठविण्यासाठी डोंगर माथ्यापासून पायथ्यापर्यंत पाणी अडविण्याचे मार्ग अवलंबिणे आवश्यक आहे, हे काही प्रयोगांवरुन सिद्धही झाले आहे; परंतु त्याकडे पूर्णतः डोळेझाक केली गेली.

या अंकात पूर्वी व आजच्या काळात पाणी नियोजनाचे, व्यवस्थापनाचे जे प्रयोग झाले - उदाहरणार्थ, फड पद्धती, गोंड राजांच्या काळातील पाणी व्यवस्थापन इत्यादींची माहिती दिली आहेच; शिवाय झाबुआ, सुखोमाजरी, राळेगण सिद्धी येथील पाणलोट क्षेत्रविकासाच्या कामांची कहाणी सुद्धा दिली आहे. या प्रयोगांच्या यशस्वीतेमुळे काहींना प्रेरणा मिळावी हाच उद्देश आहे.

पाणी पंचायतीचे आवाहन, पाणलोट कार्यक्रमातील स्त्रियांचे योगदान, पाण्याच्या समस्येवरचे विवेचन हे लेख वाचकांना मार्गदर्शक ठरतील. वाचकांनी आपल्या प्रतिक्रिया जरूर कळवाव्यात व काही सूचना असतील तर त्यांचेही स्वागत आहे.

**संपादक मंडळ**

# गोंडी राजांच्या काळातील पाणी व्यवस्थापन

श्रीनिवास इंदापूरकर

**भा**रतातील काही भागात फार पूर्वीपासून 'आदिवासी' लोकांचे राज्य होते. त्या काळातील आदिवासी राजांनी अतिशय कल्पकतेने व लोकांच्या दृष्टिकोनातून राज्य चालविले. या आदिवासी जमातीतील एक जमात म्हणजे गोंड होत. या गोंड राजांचा उल्लेख प्राचीन इतिहासात सुध्दा सापडतो. हे गोंड राजे मुख्यतः अतिशय घनदाट असण्यात वास्तव्यास असत. महाराष्ट्रातील चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात गोंडांचे साम्राज्य होते. त्याचप्रमाणे गोंडी लोक आंध्र व ओरिसातसुध्दा आढळतात. गोंडी राजांनी प्रत्येक गावाला वेगळी स्वायत्तता दिली होती. त्यामुळे गावातले लोक व त्यांचा प्रमुख नैसर्गिक साधन संपत्तीचे रक्षण व संवर्धन करीत असे. त्यामुळेच त्याकाळात सुध्दा पाण्याचे नियोजन व पाण्याचे वितरण विनासायास पार पडत असे.

## काटाजची निर्मिती व देखभाल

या गोंडी राजांच्या काळात पाणी साठवण्यासाठी गावोगाव तळी बांधली गेली. या तळ्यांना 'काटाज' असे म्हणत. हे काटाज तिन्ही बाजूंनी बंदिस्त असत व त्याच्या एका बाजूने चर काढलेला असे. या चरामुळे काटाजमध्ये पावसाळ्यात पाणी येई. काटाजची बांधणी करताना कोणत्याही प्रकारचे खोदकाम केले जात नाही. या तलावासाठी भौगोलिक परिस्थिती व जमिनीच्या रचनेचा अभ्यास करण्यात येई. याची रचना 'बशी' सारखी असे. त्यामुळे पावसाचे पाणी गुरूत्वाकर्षणाच्या क्रियेने तलावात वेगाने येते. यामुळे पावसाळ्यात 'काटाज' संपूर्णपणे भरले जात.

त्याचप्रमाणे, ज्या ठिकाणी अशी परिस्थिती नाही, त्या ठिकाणी पाण्याचा वेग व दिशांचा अभ्यास करण्यात येई. त्यानुसार काटाजची निर्मिती करण्यात येई. हे तलाव पाण्याचा वेग व त्यातील पाणी वाहून नेण्याची क्षमता यामुळे सहजपणे पावसाळ्यात भरले जात असत. गोंडांच्या काळात 'जमिनदारी' व्यवस्था अस्तित्वात होती. हे जमीनदार गावाचे प्रमुख असत. त्यांना 'गाऊंटीयाज' असे म्हणत. या जमीनदारांनी स्वतःच्या अखत्यारीतील गावांमध्ये शेकडो काटाज बांधलेले दिसतात. यासाठी लागणारी जमीन गोंड राजांनी जमीनदारांना मोफत दिलेली दिसते.

या काटाज मधील पाणी वापरण्यासाठीचे नियम 'ग्रामसभा' करीत असे. या नियमांची अंमलबजावणी करण्याचे अधिकार जमीनदाराकडे असत. त्यासाठी पाणी पंचायतसुध्दा असे. पाणी पंचायतचे आदेश जमीनदारांवर बंधनकारक असत. या नियमांमुळे पावसाळ्यात 'काटाज' कडे जाणाऱ्या पाऊलवाटेचा कोणीही उपयोग करू शकत नसे. त्याचप्रमाणे या तलावाभोवतीची अर्धा हेक्टर जमीन गावच्या मालकीचे असे. या जमिनीवर कोणाचाही अधिकार नसे. त्याचप्रमाणे तलावातील अधिक पाणी वाहून जाण्यासाठी 'चॅनेल्स' खोदण्यात येत. यामुळे जमीन पाणथळ होत नसे. या सर्व पद्धतीत काटेकोर नियोजन आणि अंमलबजावणी होत असे. या पाणी वाटप व्यवस्थेत पाणी पंचायतीमार्फत गावातील लोकांचा सहभाग सतत राहात असे.

पाणी वाटपाबाबत सुध्दा कडक नियम होते. या नियमांचे पालन जमीनदारांवर सुद्धा बंधनकारक असत. पाणीवाटपात जमिनीचा प्रकार, एकूण क्षेत्रफळ इत्यादीचा विचार होत असे. या पाणी वाटपात कोणावरही अन्याय होणार नाही याची खबरदारी घेतली जाई. सर्वांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे पाण्याचे वाटप होत असे.

या सर्व पाणी व्यवस्थापनास देखभाल व दुरूस्ती लागत असे. ही दुरूस्ती दोन तीन वर्षातून एकदा केली जायची. या 'काटाजच्या' अवतीभोवती मोठ्या प्रमाणात झाडे व जंगल होते यामुळे अवतीभोवतीचा फारच कमी गाळ तलावात जाई. त्यामुळे गाळाने तलाव भरण्याची शक्यता कमी असे. या तलावांवर सामूहिक मालकी असे. त्याचप्रमाणे तलावाभोवती ताडी, साल, महुआ वगैरे झाडे लावीत असत. तसेच हत्तीगवताची लागवड होई. यामुळे गाळ तलावात जात नसे, त्यास प्रतिबंध होई.

काटाज' मध्ये गाळ साठला की तो काढून टाकला जाई. हा गाळ काढण्यासाठी ग्रामस्थ मदत करीत असत. या गाळाचा उपयोग खत म्हणून केला जाई. प्रत्येक गाळाच्या गाडीला पैसे आकारण्यात येत असत. ज्यावर्षी 'काटाजमध्ये' मोठ्या प्रमाणात काम असे तेव्हा जमीनदार सर्व गावकऱ्यांना दुरूस्तीसाठी बोलवत असत. काटाजची दुरूस्ती ही सर्वांची जबाबदारी असे. आपल्या गावातील पाण्याचा स्त्रोत आपणच सांभाळायचा असतो, त्याप्रमाणे ग्रामस्थ वागत असत. पाण्याच्या स्त्रोताविषयींच्या नियमांचे सर्वचजण काटेकोर पालन करीत.

## काटाजचे कार्य कसे चालायचे ?

गोंडांचे राज्यकर्ते मुख्यतः ग्रामीण भागाला आत्मनिर्भर ठेवत असत. ते स्वतः गावावर राज्य करीत नसत, त्यांनी गावांना स्वायत्तता दिली होती. यामुळे त्यांच्या राजवटीत 'ग्रामसभेला' महत्त्व होते. या सभेत पंचमंडळी निर्णय घेत असत. या पद्धतीमुळे गावातील नैसर्गिक साधनसंपत्तीवर गावाचेच नियंत्रण असे. या नैसर्गिक साधनसंपत्तीच्या वाढीसाठी गोंड सत्ताधारी स्थानिक लोकांना अधिकाधिक प्रोत्साहन देत असत. त्यामुळे गोंड राजांचे सक्षम कार्यक्षेत्र सर्वत्र पसरले होते.

करवसुलीचे, पाण्याच्या वितरणाचे हक्क आलटून पालटून गावकऱ्यांना मिळत असत. गावातील इतर गोष्टींची देखभाल ठराविक काळासाठी विशिष्ट व्यक्ती करीत असत. त्यासाठी गोंड राजे त्यांना संपूर्ण स्वायत्तता देत असत. पण त्यांच्यावर नियंत्रणाचा हक्क गाव पंचायतीकडे असे.

काटाज बांधणारे लोक विशिष्ट ज्ञान असणारे असत. त्यांना त्यांच्या कामाचा मोबदला म्हणून लोकांकडून काही जमिनी बक्षिस म्हणून देण्यात आल्या. अशा प्रकारच्या जहागिरींना 'सागर रक्षा जागिर' असे म्हणत. काही गावांमध्ये असमानता नष्ट व्हावी म्हणून 'लाखभाटा' योजना होती. यामध्ये दरवर्षी पाण्याचे वाटप एकाआड एक होत असे. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांना बागायती करण्याची संधी मिळत असे.

## काटाजचे फायदे

काटाजमध्ये भरपूर प्रमाणात पाणी साठत असल्यामुळे जमिनीतील पाण्याच्या साठ्यातसुध्दा वाढ होई. पावसाळ्यात काटाज भरले की त्यामध्ये येणाऱ्या ओढ्या नाल्यांवर नाला बंडींग करण्याची परवानगी ग्रामसभेत मिळत असे. अशा प्रकारचे

छोटे बंधारे पश्चिम ओरिसात सर्वत्र आढळतात.

काटाजचा उपयोग करून छोट्याछोट्या टाक्या बांधण्यात येत असत. या टाक्यांमध्ये काटाजचे पाणी झिपरून येई. अशा टाक्यांना 'बांध' म्हणतात. यातले पाणी फक्त पिण्यासाठी वापरले जात असे. या टाक्यांना 'दैवी' भावना लावली जात असल्यामुळे बांधातले पाणी इतर कार्यासाठी वापरण्यात येत नसे. या पाणीपुरवठ्याच्या पुरातन व्यवस्था अगदी पद्धतशीरपणे राबविल्या जात असत. त्यातील नियोजन व पुरवठा शास्त्रीय दृष्टिकोनातून होत असे. या चांगल्या पद्धतींचे अवशेष संबलपूर व बालनगीर जिल्ह्यांमध्ये अजूनही दिसतात. या पुरातन पद्धतींमुळे ओरिसामध्ये दुष्काळाचे सावट पूर्वी फार मोठ्या प्रमाणात आले नाही.

१८९७ साली भारतात मोठा दुष्काळ पडला होता. या दुष्काळात बहुतेक राज्यातील ९०% ते १००% पिके जळून गेली. हा दुष्काळ एकोणिसाव्या शतकातील सर्वात मोठा दुष्काळ होता. पण या दुष्काळात सुद्धा संबलपूर जिल्ह्याला फारशी झळ बसली नाही. त्याचप्रमाणे १९००-१९०१ साली ओरिसात दुष्काळामुळे भीषण परिस्थिती होती पण काटाज पद्धतीमुळे संबलपूर जिल्ह्यातील अर्धेअधिक उत्पन्न वाचले. त्याचप्रमाणे पाण्याचा प्रश्न कोणालाही भेडसावला नाही. या सर्व पद्धतींचा उल्लेख ब्रिटीश काळातील गॅझेटियरमध्ये आढळतो.

**काटाज नष्ट का होत आहेत?**

स्वातंत्र्यानंतर भारताचा कल मोठ्या व मध्यम धरणांकडे राहिला. यातच ओरिसामध्ये जगातील सर्वात जास्त लांबीचे 'हिराकूड' धरण महानदीवर बांधण्यात आले. या धरणाचे पाणी कालव्यांद्वारे ठिकठिकाणी पोहोचविले गेले. त्यामुळे सुरुवातीच्या काळात पाणी टंचाई वगैरे काहीच जाणविली नाही. पण त्यामुळे 'काटाज' कडे दुर्लक्ष झाले. गावातील पाण्याचा नैसर्गिक स्त्रोतच दुर्लक्षित केला गेला. त्याच्यात गाळाचे, गवताचे प्रमाण वाढले. अनेक काटाज दलदलमय झाले. अशा काटाजमध्ये अजिबात पाणी साठत नाही.

यात स्वातंत्र्य प्राप्तीनंतर गावातील छोटे तलाव, ओढे यांच्यावर सरकारी नियंत्रण आले. त्यामुळे पंचायतीचा अधिकार एकदम कमी झाला. गावातील प्रत्येक माणूस स्वतःला वेगळा समजू लागला. या प्रवृत्तीमुळे काटाजभोवतीची झाडे भराभर कापली जाऊ लागली, पर्यावरणाचा ऱ्हास सुरू झाला. वृक्षतोडीमुळे या तलावांमध्ये गाळ वेगाने भरू लागला. काही धनदांडग्या लोकांनी काटाजभोवतीच्या सुपीक जमिनींवर अतिक्रमण केले. या जमिनी स्वतःच्या नावावर करून घेतल्या. या जमिनींवर मोठ्या प्रमाणात उत्पन्न घेऊ लागले. त्याचप्रमाणे शेतीसाठी काटाजमधील पाणी भरपूर प्रमाणात उपसायला सुरुवात केली. यामुळे 'काटाज संस्कृती' ओरिसात नष्ट झालेली आहे.

सरकारी यंत्रणेने ओरिसातील काही गावांमध्ये काटाजचे स्वरूपच बदलवून टाकले. त्यांनी या काटाजच्या बाजू व तळ सिमेंट क्रॉंक्रिटचे केले. त्यात मच्छी पालनाचा व्यवसाय सुरू केला. या क्रॉंक्रिटमुळे जमिनीत पाणी झिरपण्याचे प्रमाण एकदमच कमी झाले. सरकारी यंत्रणेने काटाजचे पाणी उपसून मासेमारीची तळी उभी केली. यामुळे त्यांचे संपूर्ण अस्तित्वच गेल्यासारखे आहे. या मच्छीमारी प्रकल्पामुळे आजूबाजूची माती, कचरा,

**(पृष्ठ १८ वर पहा)**

# फड पध्दती

## महाराष्ट्रातील प्राचीन जलसिंचन पद्धती

नीला दात्ये

आपला देश कृषी प्रधान आहे. येथील शेती पावसाच्या पाण्यावर अवलंबून असते. पावसाचे पाणी अडविणे व जिरविणे फार गरजेचे आहे. फार पूर्वीपासून आपल्याकडे काही ठिकाणी उत्कृष्ट नियोजन केलेले आढळते. पण काळाच्या ओघात अशा योजना मोडकळीस आल्या. यातीलच एक योजना खानदेशात आजही छोट्या प्रमाणात अस्तित्वात आहे. या योजनेत लोकांचा संपूर्ण सहभाग असतो. 'फड पध्दत' नावाने प्रसिध्द असलेली ही पाणीपुरवठ्याची योजना अनेक गावांच्या सहकार्याने राबविण्यात येते.

फड पध्दत ३०० ते ४०० वर्षापूर्वीची आहे. ही पध्दत तापी नदीच्या तीन उपनद्यांवर बांधलेली दिसते. यामध्ये धुळे, नाशिक जिल्ह्यांचा समावेश आहे. या नद्यांवर एका पाठोपाठ एक असे अनेक बंधारे आहेत. ते फार मोठे नाहीत. या बंधाऱ्यांचा उपयोग शेतीसाठी पाणी अडवायला झाला. या उत्कृष्ट पध्दतीचा अवलंब प्रथम खानदेशात झालेला दिसतो. १८८० च्या गॅझिटियरमध्ये फडपद्धतीचा उल्लेख आहे.

जुन्या काळात सुध्दा दुष्काळी परिस्थिती उद्‌भवत असे. त्यावेळी त्यावर मात करण्यासाठी निरनिराळ्या उपाययोजना केल्या जात असत. ही खानदेशातील 'फड' पद्धत कोणाला सुचली असावी याचा स्पष्ट उल्लेख कोठेही आढळत नाही. पण मुस्लिम राज्यकर्त्यांच्या काळात ही पद्धत अस्तित्वात आल्याचे समजते.

**फड पद्धत कशी होती ?**

शेतीला पुरेसा आणि व्यवस्थित पाणीपुरवठा होण्यासाठी या पध्दतीचा अवलंब होत असे. या पध्दतीत अनेक गावातील लाभधारक शेतकरी एकत्रित येत. हे सर्व शेतकरी फड पध्दतीचे नियोजन करीत असत. या पध्दतीत लोकांकडून त्या कामातील राजे लोकांना किंवा सत्ताधारी लोकांना सुरुवातीचे पैसे गुंतविण्याची विनंती करण्यात येत असे. त्यामुळे बंधारे बांधण्याचा मुख्य खर्च सत्ताधाऱ्यांकडून होत असे. त्यानंतरची संपूर्ण देखभाल स्थानिक लोकांकडून केली जात असे. यामध्ये मुख्य स्त्रातातून पाणी उपसणे, पाण्याचे वाटप, त्यातील सामाजिक प्रश्नांची उकल व देखभालीचा खर्च लोकांमार्फतच केला जाई.

ही सर्व पद्धत तापी नदीच्या उपनद्यांवर उभारलेली दिसते. यात मुख्यतः धुळे जिल्ह्याचा समावेश आढळतो. धुळ्यात सरासरी ६७४ मिलीमिटर पाऊस पडतो. हा पाऊस बारमाही शेतीसाठी पुरेसा नाही. दरवेळी दुष्काळाची स्थिती उद्‌भवत असे. या ठिकाणची जमीन अतिशय सुपीक आहे, पण पाण्याच्या दुर्भिक्षांमुळे उत्पन्न हाती येत नसे. या भागात 'जमिनीत' पाणी खूपच कमी होते. त्यामुळे ते फारसे पुरत नसे. त्यापेक्षा छोट्या नद्यांवर बंधारे बांधण्याची कल्पना पुढे आली.

या छोट्या छोट्या बंधाऱ्यांचा उपयोग

शेतीसाठी अतिशय चांगल्यारीतीने होऊ लागला. पाण्यावर लोकांचा हक्क आहे हे सत्ताधाऱ्यांनी मान्य केले. त्यांनी लोकांच्या मागणीला मान दिला. स्थानिक लोकांच्या मदतीने नद्यांवर उपयुक्त जागा शोधण्यात आल्या. त्यासाठी त्याकाळातील तज्ज्ञ लोकांनी मदतीचा हात पुढे केला. या नद्यांवर बंधारे बांधण्यास सत्ताधाऱ्यांनी विरोध केला नाही. त्यांनी लोकांची कल्पना उचलून धरली. शिवाय शेतकऱ्यांना नदीचे पाणी शेतीसाठी वापरण्यास मान्यता दिली. यामुळे या भागात कायमस्वरूपी 'बागायत' क्षेत्र तयार झाले.

या फड पध्दतीत प्रत्येक गावात प्रत्येक लाभधारक शेतकऱ्याची जमीन बागायत क्षेत्रात येत असल्याने त्याला पाण्याचा फायदा निश्चितच मिळत असे. एका फडाचे चार भाग करण्यात येत. एका भागात सरासरी १००-१२५ हेक्टर जमिनीचा अंतर्भाव असे. गावातील प्रत्येक शेतकऱ्याला लाभ होत असल्याने सर्वांचा सहभाग अतिशय उत्तम असे.

बंधाऱ्यांपासून छोटे छोटे कालवे काढण्यात आले. हे कालवे शेतीपर्यंत आणण्यात आले. या कालव्यांची लांबी २ ते १२ किलोमीटर एवढी होती. त्यांची पाणी वाहून नेण्याची क्षमतासुध्दा निश्चित करण्यात आली होती. साधारणपणे सेकंदाला ४५० लिटर पाणी वाहून नेण्याची त्यांची क्षमता होती.

या कालव्यातून बागायती क्षेत्रापर्यंत 'चर' म्हणून पाणी आणले जायचे. चारही फडांमध्ये चरांमधून पाणी फिरवले जात असे. प्रत्येक लाभधारक आपल्या स्वतःच्या शेतात 'सारंग' (Saranga) म्हणून पाणी देत असे. प्रत्येक कालव्यावर जादा पाणी पुनः नदीत जाण्याची व्यवस्था होती. पाणी वाया जाऊ नये म्हणून अतिशय काळजी घेतली जात असे.

## फड पध्दतीचे नियोजन

या सर्व पध्दतीचे नियोजन करण्यासाठी 'कमिटीची' स्थापना होत असे. सर्व गावांमधील लाभार्थी शेतकरी आपापल्या गावातील सभासदांची निवड या कमिटीमध्ये करत असे. कमिटीचा एक अध्यक्ष असे. सभासदाची निवड दर दोन ते चार वर्षांनी होत असे. एकच अध्यक्ष अनेक वर्षांपर्यंत राहात असे. सभासद बदलण्याचा अधिकार त्या त्या गावातील लाभधारक शेतकऱ्यांना असे. त्यामुळे सभासदाची निवड अधिक जलद होत असे.

कमिटीच्या सदस्यांची संख्या निश्चित नसे. ही संख्या गावानुसार व वेळेनुसार बदलत राही. ही समिती फड पध्दतीचे संरक्षण, निरीक्षण आणि कार्यवाही यास जबाबदार राहात असे. समिती देखभालीसाठी हवालदार, पटकरी, आणि जगलिआच्या नेमणुका होत. हवालदार मुख्यतः निरीक्षणाचे काम करी. सर्वांवर त्याची देखरेख असे. कालव्याची दुरुस्ती, पाणी सोडणे यासंदर्भातले निर्णय पटकरी घेत असत.

जगलिआ किंवा पाणी सोडणारा माणूस पाण्याच्या नियोजनावर देखरेख करीत असे. या तिघांना समितीद्वारे मार्गदर्शक तत्त्वे नेमून दिलेली असत. त्यांना कमिटीच्या सदस्यांचा निर्णय मानावा लागे. लाभधारकांनी दिलेले आदेश त्यांना बंधनकारक नव्हते. कमिटीमार्फतच सर्व आदेश द्यावे लागत. या तिन्हीही व्यक्तींना दरमहा निश्चित वेतन दिले जात असे. कमिटी शेतकरी व नोकरदारांच्या समस्या ऐकून योग्य तो निर्णय देत असे. कमिटीचा निर्णय सर्वांना मान्य करावाच लागायचा.

कमिटीचे सदस्य दोन तीन महिन्यांतून एकदा

भेटत असत. या सभेत कार्यालयीन निर्णय घेतले जात. त्याचप्रमाणे लाभधारकांना येणाऱ्या अडीअडचणींवर तोडगा शोधण्याचा प्रयत्न केला जात असे. यातील प्रमुख अडचण म्हणजे कालव्याच्या वरच्या बाजूला असणाऱ्या गावातील लोकांचे जास्त प्रमाणात पाणी घेण्याचे धोरण होय. यासाठी अतिशय बारकाईने लक्ष ठेवावे लागे. पाणी चोरणाऱ्यांवर कारवाई करावी लागत असे. अनेकदा समितीच्या सदस्यांना लाभधारकांविरूध्द कठोर निर्णय घ्यावे लागत.

सर्व लाभधारकांची वर्षातून एकदा सभा भरत असे. प्रत्येक गावात ढोल वाजवून सभेची कल्पना गावकऱ्यांना दिली जायची. मोठी सभा अक्षयतृतीयेला भरायची. या सर्वसाधारण सभेत पाण्याची उपलब्धता पाहून पिकांविषयी चर्चा होत असे. या पाण्यावर पुढील पिकांबद्दल निर्णय घेण्यात यायचा. याबाबत कमिटीचा निर्णय अंतिम असे. हा निर्णय सर्व लाभधारकांना बंधनकारक होता. कमिटीचे सदस्य पाणीवाटपाबाबत सर्वांशी चर्चा करूनच अंतिम निर्णय घेत.

ज्या व्यक्ती नियमांचे पालन करीत नसत, त्यांना रोख दंड ठोठावण्यात येत असे. त्याचप्रमाणे गावरान जमिनीवरील गवत विकून आलेल्या पैशांचा हिशोब सर्वसाधारण सभेत ठेवला जाई. या सभेत गतवर्षीच्या देखभालीचा खर्च सुध्दा मिटींगमध्ये ठेवला जाऊन त्यावर चर्चा होई. गावातील कोणत्याही व्यक्तीला जमाखर्च बघण्याची मुभा असे. या व्यक्ती त्यावर प्रश्न उपस्थित करत. पाणी सोडण्यावरून शेतकरी व पाणी सोडणारे कर्मचारी यांच्यात वादाचे प्रसंग तयार होत; पण कमिटीचे सदस्य त्यामध्ये समझोता घडवून आणत, वेळप्रसंगी अप्रिय निर्णयसुध्दा घेत.

'फडची' देखभाल दोन पातळ्यांवर होत असे. 'चारी' आणि सारंगची देखभाल वैयक्तिकरित्या केली जात असे. ही जबाबदारी त्या त्या शेतकऱ्याची असे. पण 'कालव्याची' देखभाल सामुदायिक असे. त्याच्या डागडुजीचा खर्च, श्रमदान सर्व लाभधारकांना करावे लागत असे. त्याचे नियोजन वर्षातून एकदा व्हायचे. या संदर्भातील मार्गदर्शक तत्वे कमिटीद्वारे आखली जात. यासंदर्भात अतिशय नियोजनपूर्वक व काळजीने कमिटीच्या मार्गदर्शनाखाली काम होत असे. यासंदर्भातले निर्णय सर्वसाधारण सभेत घेतले जात. देखभालीसाठी बाहेरचे कामगार न आणता, श्रमदानावर भर दिला जात असे. 'पटकरी' कालव्याच्या स्थितीबद्दल अहवाल सादर करीत असत. ही माहिती लाभधारकांसमोर ठेवून दुरुस्तीचे दिवस निश्चित करण्यात येत. कालव्याच्या लांबीवर दुरुस्तीचे दिवस अवलंबून असत.

प्रत्येक गावातील देखभालीचे दिवस निश्चित झाल्यावर पटकरी लाभधारकांची यादी करीत. या लोकांचे हजेरी पत्रकच तयार केले जाई. त्याप्रमाणे दहा दहा जणांचे गट तयार केले जात. या गटातील प्रमुखास "मुकादम' म्हणत. त्या गावात येणाऱ्या कालव्याची लांबी मोजली जात. त्यानंतर प्रत्येक गटात कालव्याच्या देखभालीसाठी समप्रमाणात भाग वाटून दिला जाई. गटातील प्रत्येक सदस्याला मुकादम होण्याची संधी मिळायची. या डागडुजीसाठी 'मे' महिन्याची निवड करण्यात येत असे. श्रमदानासाठी कमिटीच्या सदस्यांचा सुध्दा सहभाग असे. त्यांना त्यातून सूट नव्हती.

देखभालीच्या दिवशी जर कोणी गैरहजर राहिले तर त्यास दंड होई. हा दंड रोजच्या मजुरीच्या

दीडपट जास्त आकारला जायचा. या देखभालीसाठी लागणारे इतर साहित्य भाड्याने घेतले जाई किंवा शेतकरी स्वतःचे देत असत. रोजच्या रोज लागणारी देखभाल पटकरी करीत असत. कालव्याच्या शेजारचे गवत किंवा गाळ काढणे, जुजबी दुरूस्ती त्यांच्याद्वारे होत असे.

## पाणी पुरवठ्याची पध्दत

कालव्याची पाणी वाहून नेण्याची क्षमता ८ ते १० क्युसेस एवढी होती. कालव्यातून पाणी फडापर्यंत पोहोचत असे. फडामध्ये पाणी फिरवण्याचे काम 'जगलियांचे' असे. यासंदर्भात त्यांनी 'पाळ्या' ठरवलेल्या असायच्या. त्यावर ते पाणी सोडत.

प्रत्येक फडात कोणते पीक घ्यायचे याचे नियोजन 'मे' महिन्यातील सर्वसाधारण सभेत होत असे. त्यानुसारच पाण्याचे वाटप व्हायचे. कधीकधी जगलियांना तंत्रशुध्द प्रशिक्षण दिले जात नसे, त्यामुळे पाण्याचा अपव्यय होई. कधीकधी शेतातील चारी मोठ्या खणल्या जात, त्यामुळे पाणी जास्त येई, अशावेळी पाण्याची नासाडी होत असे. खरीप पिकांच्यावेळी पाणी वेळेवर व मुबलक मिळत असे; पण रब्बी पिकांच्यावेळी पाण्याची कमतरता भासायची. अशावेळी चारही फडांमध्ये उत्पादन घेता येत नसे. एखादा फड बंद किंवा रिकामा ठेवावा लागे.

मे महिन्यातच खरीप व रब्बी पिकांचे नियोजन करून विविध पिके घेतली जात. निरनिराळ्या फडांमध्ये वेगवेगळी पिके असत. अतिशय उत्कृष्ट नियोजनामुळे सर्वच शेतकऱ्यांना फायदा होई.

'फड' पध्दती म्हणजे सामुदायिक शेतीचे उत्कृष्ट उदाहरण होय.

## फड पध्दतीची वैशिष्ट्ये

१) या पध्दतीचे पहिले वैशिष्टे म्हणजे यात 'लवचिकपणा' होता. कमिटीच्या सदस्यांची संख्या गरजेनुसार कमीजास्त होत असे. कमिटीचे सदस्य प्रामाणिक व कामाची जबाबदारी घेणारे लागत. कमिटीच्या अध्यक्षांच्या कामाबद्दल जर आक्षेप असतील तर त्यांना सर्वसाधारण सभेत 'उत्तर' द्यावे लागत असे. या आक्षेपांचे समाधानकारक उत्तर आले नाही तर अध्यक्षांना राजीनामा द्यावा लागायचा.

ज्या लोकांना कमिटीच्या कामाची आवड असे त्यांनाच त्यावर घेतले जात असे. त्यात कोणतीही जोरजबरदस्ती नसे. हवालदार, पटकरींच्या नियुक्तीबाबत हाच निकष होता. ज्यावेळी गरज असेल तेव्हा जास्त लोकांची नेमणूक केली जायची.

२) फड पद्धतीतील कमिटी काही गावांमध्ये अजूनही कार्यान्वित आहे. भारत स्वतंत्र झाल्यावर ग्रामपंचायती आल्या. त्यांचे सदस्य वेगळे आहेत; पण फड पध्दतीतील कमिटी अजूनही तिचे काम करीत आहे. यामध्ये ग्रामपंचायतीची ढवळाढवळ नसते.

या पध्दतीमुळे 'पाण्याचे समप्रमाणात' वाटप होते. सर्व शेतकऱ्यांना लाभ होतो. एक चांगली सामुदायिक प्रक्रिया आहे, त्यामुळे गावातील लोकांमध्ये एकोपा राहण्यास मदत होते. या पध्दतीत खर्च होतो; पण सर्व लाभधारक खर्च उचलतात. कोणा एकाला भुर्दंड पडत नाही.

३) गेल्या दोन तीन शतकांपासून 'फड' पध्दती खानदेशात आहे. या काळात मोठ्या प्रमाणात राजकीय उलथापालथ झाली; पण फड पद्धतीला

तडा गेला नाही. या पध्दतीतील शेतकऱ्यांनी स्वतःचा पाण्यावरील मालकी हक्क सरकारला दिलेला नाही. त्यांनी सरकारला त्याऐवजी 'मोबदला' देण्याची तयारी दाखवली आहे. या पद्धतीत छोटे छोटे शेतकरी एकत्र येऊ शकतात. ते स्वतः पाण्याचे नियोजन स्वतःसाठी करू शकतात. त्यासाठी सरकारी नियंत्रणाची गरज नाही. पण हळूहळू सरकारी हस्तक्षेप वाढण्यास सुरुवात झाली आहे. यामध्ये मुख्यतः पाटबंधारे खात्यांचा हस्तक्षेप वाढत आहे.

**फड पद्धती नष्ट का झाली ?**

फड पद्धतीत लहान नद्यांवर छोटे छोटे बंधारे बांधले गेले. पण गेल्या तीस चाळीस वर्षात पाटबंधारे खात्यातून 'मोठ्या' धरणांची रचना झाली. या धरणातून पाणी धुळ्याला पोहोचवले गेले आहे. धुळे शहर वाढत असल्याने अशा नद्यांचे अडवलेले पाणी इकडे वळवलेले आहे. त्यामुळे फड पद्धतीतील बंधाऱ्यात फारच कमी पाणी असते. काही छोटे बंधारे कोरडे पडले आहेत.

याच भागात साखर कारखान्याची उभारणी झाली आहे. या कारखान्याला ऊस लागतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी 'फड' पद्धतीचे तत्व गुंडाळून सर्वत्र ऊसाची लागवड केली आहे. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांनी द्राक्षांची सुद्धा लागवड सुरू केली आहे. त्यासाठी पाण्याचा उपसा सुरू आहे.

तसेच नद्यांच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात 'कूपनलिका' खोदल्या आहेत. यातून बागायत क्षेत्रास पाणी दिले जाते. या वाढत्या कूपनलिकांमुळे नदीतील पाणी फार काळ टिकत नाही. या पाण्याला एकसारखा उपसा आहे. त्यामुळे पाणी अतोनात वापरले जाते. ही पद्धतच फड पद्धती नष्ट करीत आहे.

सध्याच्या काळात फारच कमी ठिकाणी फड पद्धती अस्तित्वात दिसते. तरूण पिढीला यात कोणताही आपलेपणा वाटत नाही. ते शेतीमध्ये लक्ष घालत नाहीत. त्यांना शहरात 'नोकऱ्या' पाहिजेत. त्यामुळे कमिटीचे सगळे सदस्य वयस्कर आहेत. त्यांची संख्या सद्धा रोडावत आहे. अशाने संपूर्ण पद्धतच नष्ट झालेली आहे.

आधुनिक काळातील जीवन पध्दती व विचारसरणी काही जुन्या पण चांगल्या गोष्टी मोडीत काढीत आहे. साखर कारखाना, त्यामुळे येणारा ऊस, द्राक्षे यांसारख्या पिकांमुळे फड पद्धतीचे अस्तित्वच नष्ट झाले आहे. प्रत्येकाला कमी काळात जास्त पैसा पाहिजे, त्यामुळे भविष्याचा विचार होत नाही. शेकडो वर्षांची चालत आलेली उत्कृष्ट व टिकणारी पध्दत आपण बंद पाडलेली आहे. गेल्या तीस चाळीस वर्षामध्ये आधुनिकता, विकास व तंत्रज्ञान यांच्या मदतीने मानवाने प्रगतीचे लक्षणीय टप्पे गाठले; पण त्याच्यातील 'संस्कृती' लोप पावत आहे 'आपण सगळेजण आनंदाने राहू' असा विचार मागे पडत आहे. 'मी व माझे' हा विचार पुढे आल्याने आपणच नविन सहस्त्रकात नवनवीन समस्या ओढावून घेत आहोत. ● ●

(Source : Dying wisdon, Edited by - Anil Agarwal & Sunita Narayan)

**वर्गणीदारांसाठी सूचना**

सन २००१ पासून 'हाकारा' च्या कागद व छपाई खर्चात वाढ झाल्यामुळे वार्षिक वर्गणीत सुद्धा वाढ करावी लागत आहे. कृपया सहकार्य करावे.

वार्षिक : संस्थांसाठी १०० रूपये फक्त
व्यक्तींसाठी ६० रूपये फक्त
आजीव :(फक्त व्यक्तींसाठी) ६०० रूपये

# 'झाबुआ' : परत मिळालेले एक नंदनवन

अनिल अग्रवाल/सुनिता नारायण
(मराठी अनुवाद : अपर्णा जोशी)

राजीव गांधी पंतप्रधान झाल्यानंतर त्यांनी सर्वप्रथम राष्ट्राला उद्देशून दिलेल्या संदेशात सांगितलं होतं की, "हे नवीन सरकार सर्वात प्रथम जंगलतोड विरोधी मोहीम हाती घेणार आहे. त्यामुळे दरवर्षी ५ लाख हेक्टर जमीन लागवडीखाली येईल. ही मोहीम जगातील सर्वात मोठी जंगलतोडविरोधी मोहीम असेल. ही सगळी मोहीम प्रामुख्याने लोक चळवळीतून घडून येईल." हे प्रत्यक्षात कसे आणायचे हे मात्र फारच थोड्या लोकांना माहीत होते.

मध्यप्रदेश आणि गुजरातच्या सीमेवर असणाऱ्या 'झाबुआ' जिल्ह्याचा विकास हा सर्वदृष्टीने आगळाच आहे. राज्यसरकार आणि मोठ्या प्रमाणावर लोकांनी एकत्र येऊन जमीन आणि पाणी व्यवस्थापनासाठी केलेला प्रयत्न यातून दिसून येतो. एवढ्या मोठ्या संख्येने लोकांचा सहभाग असणारी भारतातील ही बहुतकरून पहिलीच सरकारी योजना असेल.

पाणलोट क्षेत्रविकास योजना मध्यप्रदेशात सुरू होऊन चार वर्षे झाली. ह्या योजनेमुळे या प्रदेशातील एकूणच पाण्याच्या स्त्रोतांमध्ये वाढ झालेली दिसून येते. त्यामुळे हिरव्यागार शेतांनी सर्व प्रदेश बहरलेला दिसतो. जवाहरलाल नेहरूंनी म्हटल्याप्रमाणे 'झाबुआ' हे खऱ्या अर्थाने 'आधुनिक भारताचे मंदीर' आहे, असे म्हणायला हरकत नाही. स्थानिक लोकांना त्यांच्याच पर्यावरणाच्या व्यवस्थापनात सहभागी करून घेतल्याने गरिबी समूळ नष्ट करता येऊ शकते, हेच या उदाहरणावरून दिसून येते. झाबुआ हे आज पृथ्वीदेवतेला वाहिलेले एक मंदीर समजले जाते. या मंदिराचे आर्किटेक्ट मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री दिग्विजयसिंग असून येथील हजारो आदिवासी मंदिरातील पुजारी आहेत.

गांधीजींनाही अभिमान वाटावा असे झाबुआ हे ठिकाण आहे. गांधीजींच्या म्हणण्याप्रमाणे माणूस हाच प्रत्येक आर्थिक विकासाचा परिस असतो हेच झाबुआने सिध्द केलेले आहे.

१९८५ मध्ये झाबुआ हे एक वैराण वाळवंट होते. पण १३ वर्षांनी अतिशय काळजी घेऊन त्या जमिनीमधे जिवंतपणा आला, झाडे वाढायला सुरुवात झाली आणि सगळा परिसर हिरव्यागार गवतांनी भरून गेला. १९८० मध्ये जो प्रदेश दुष्काळग्रस्त होता तेथील विहिरी आता पाण्याने वाहू लागल्या आहेत. राजकीय इच्छाशक्तीचे हे एक उत्तम उदाहरण आहे.

### पूर्वी झाबुआ काय होते ?

१९६४ पर्यंत ह्या जिल्ह्याच्या एकूण भूभागापैकी ३३.३ टक्के प्रदेश जंगलांनी व्यापलेला होता. झाबुआ राज्य गॅझेटिअरमधील १९०८ च्या नोंदीनुसार झाबुआत अतिशय उंच अशा डोंगररांगा आहेत. यातील बऱ्याचशा डोंगररांगा या समुद्रसपाटीपासून १,८०० फूट उंच असून हा प्रदेश घनदाट जंगलांनी व्यापलेला होता. याच घनदाट जंगलामध्ये छोट्या प्रमाणातच, पण अतिशय मौल्यवान अशी

सागवानाची झाडे होती. त्याच बरोबर आंबा, महुआ, आवळा, बाभूळ, धावुडा, इमली (चिंच), खैर आणि पिंपळ हेही वृक्ष इथे आढळत होते.

२० व्या शतकाच्या सुरुवाती पर्यंतच्या काळात या भागात घनदाट जंगल असल्याची नोंद आढळते. केंद्रसरकारचे राजकीय आणि मिलिटरी/सेना प्रमुख लिहितात (मेमोर ऑफ सेंट्रल इंडियामध्ये), "माळवा आणि गुजरात प्रांताला विभागून जाणारी एक मोठी पर्वतरांग विंध्यपर्वतापासून पश्चिम टोकापर्यंत पसरलेली दिसून येते. या पर्वतांमधील दऱ्याखोऱ्यांतील जमीनीत पाणी असून भरपूर सुपीक आहे."

दुर्दैवाने या शतकात गेल्या ५० वर्षाच्या काळात हा जंगलमय भाग नष्ट व्हायला लागला. १९६३ ते ९३ या काळात एकूण भूभागापैकी जंगलव्याप्त प्रदेशाचे प्रमाण ३३.३ टक्क्यांवरून ४.९ पर्यंत कमी झालेले दिसून येते. राज्यातील एकूण जंगलव्याप्त प्रदेश तसेच गावागावातील सार्वजनिक जमिनींपैकी १५ टक्के जमीन लागवडीखाली आणण्यात आली.

सर्मीई गावातील ९० वर्षांचे ढोलजी सांगतात, "६० वर्षांपूर्वीपर्यंत माझ्या घराच्या आजूबाजूला घनदाट जंगल होते. रात्रीच्यावेळी वाघांच्या डरकाळ्यांचा आवाज पार घराच्या जवळपास ऐकू येत असे. या आसपासच्या परिसरातील जंगले जाऊन उजाड डोंगररांगा व शेतीच उरली आहे." पुढे ते म्हणतात, "मी मरण्यापूर्वी कितीतरी आधीच जंगल मेले. ज्या डोंगरांमधून जायचे आम्हाला धाडसही होत नसे, आता तीच जागा गावांची भेटायची अशी सार्वजनिक जागा झालेली आहे."

पिपलीपाडा गावातील ८५ वर्षांचे आमलिया म्हणतात, ५०-६० वर्षांपूर्वीपर्यंत पिंपळपाडा गाव हे पूर्णपणे दुर्गम होते. इतर गावांपासून जवळजवळ तुटलेले होते. आसपास असणाऱ्या घनदाट सागाच्या जंगलांनी त्या गावापर्यंत पोहोचणे फारच अवघड होत असे. पण अचानकपणे झाडांची तोड सुरू झाली आणि इतर गावकऱ्यांप्रमाणेच मलाही या तोडीच्या कामावर रोजावर ठेवले गेले.

पिंपळपाडा गावाचे जमीन नसलेले एक शेतकरी गोलिया हे ठेकेदार आणि बांबूंच्या व्यापारांसाठी झालेल्या जंगलतोडीचे साक्षीदार आहेत. स्वातंत्र्यानंतरच्या काही वर्षातच बांबूंच्या व्यापाऱ्यांसाठी जी जंगलतोड झाली, त्यांची त्यांना पूर्ण आठवण आहे. ते म्हणतात, "रोज ट्रकच्या ट्रक भरून लाकूड गावातून बाहेर जात असे. जंगल पूर्णपणे नष्ट होईपर्यंत हे चालूच राहिले. त्यानंतर मी मात्र बेकार झालो." ते पुढे म्हणतात, "पूर्वी हेच जंगल अशा राजांच्या अधिपत्याखाली होते की, ज्यांनी अशा जंगलतोडीला कधीच परवानगी दिली नाही. जंगलांवरच पूर्णपणे अवलंबून असणाऱ्या आम्हा आदिवासी भिल्लांचे ती झाडे तोडण्याचे धाडसच होणार नाही. पण अचानक या जंगलांचे मालक बदलले. सरकारी बाबूंच्या हातात ही जंगले गेली. तेथील ठेकेदारांना झाडेतोडीसाठी याच बाबूंनी मदत केलेली आम्ही पाहिलेली आहे. काही काळानंतर आम्हाला समजले, जे जंगल आमच्या आदिवासींचे होते ते तेथील गावकऱ्यांनी त्यांच्या शेतीसाठी तोडायला सुरुवात केली. काही ठिकाणी तर घरे बांधून छोट्या छोट्या वस्त्याही तयार झाल्या. त्यांच्या ह्या घरांशेजारील जंगलांवर स्वतःचा हक्क दाखवून त्यांनी ती मोठमोठ्या व्यापारांना विकली. जंगले पूर्णपणे नाहीशी झाली. यानंतर हळूहळू पाऊसही अनियमित येऊ लागला. पूर्वी असणाऱ्या जंगलांच्या

खुणा जपणारी जी काही मुळे इथल्या जमिनीत शिल्लक राहिली होती, तीच आज हे गावकरी जंगले पुन्हा निर्माण करण्यासाठी जोपासत आहेत.

जंगल अधिकाऱ्यांचे म्हणणे मात्र याबाबतीत वेगळेच आहे. ते म्हणतात, "लोकसंख्येत झालेली अचानक भरमसाट वाढ आणि वाढती बेकारी, नोकरीची असुरक्षितता, कमी झालेली आर्थिक उपलब्धता याचमुळे खरे तर जंगले साफ होऊ लागली."

१९९१ च्या जनगणनेनुसार झाबुआमधील लोकसंख्येत भरमसाट वाढ झाली. यातील ९७ टक्के लोक हे पूर्णतः शेतीवरच अवलंबून असल्यामुळे याकाळात लागवडीखालील प्रदेशातही वाढ झाली.

सामाजिक आणि आर्थिक कारणांसाठी जंगलांची झालेली तोड, हा नाश प्रामुख्याने स्वातंत्रप्राप्तीनंतरच्या काळातील आहे. बांबुच्या व्यापाऱ्यांनी मनाला येईल त्याप्रमाणे जंगलतोड केली. समाजवादी चळवळींमुळे लागवड क्षेत्रासाठी तसेच लोकांना राहण्यासाठी जागा उपलब्ध करण्यासाठी जंगलांवर अतिक्रमण झाले.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या काळात एक नवीन योजना झाबुआमध्ये राबविली. भिल्ल आदिवासींना स्वतःच्या मालकीची जमीन तसेच अतिक्रमण झालेला जंगलप्रदेश लागवडीखाली / शेतीखाली आणायला उद्युक्त केले. यामुळे जंगलतोडीत अजूनच वाढ झाली. मोठ्या प्रमाणावर झालेल्या ह्या जंगलांच्या नासधुशींमुळे नैसर्गिक आपत्ती ओढवली. या जमिनींमधील सुपीकता नष्ट होऊ लागली. नोकरीधंदा मिळणे अवघड होऊन बसले. त्यामुळे लोक हळूहळू गावे सोडून जाऊ लागले.

१९६५ ते १९९० च्या काळात लागवडीखालील क्षेत्रामध्ये २,९९, ६०० हेक्टर ते ३,८५, ४०० हेक्टर अशी वाढ झाली. अन्नाची वाढत जाणारी मागणी यामुळे गावागावातील सार्वजनिक जमिनीही लागवडीखाली आणल्या गेल्या. यामुळे जनावरांचे चराईक्षेत्र नष्ट होऊ लागले आणि गुरांना अन्न पुरवणे हा एक भार होऊन बसला.

झाबुआतील प्रदेश हा डोंगरदऱ्यांतून वळणावळणांचा आहे. या परिसरात ८३० मि.मि. इतका वार्षिक पाऊस पडतो; पण पाणी वाहून जाते. हे पाणी येथील मातीत साठून राहिलेले दिसत नाही. पावसाळ्यानंतरच्या काळातील पाण्याची होणारी साठवण इथे दिसतच नाही. दरवर्षी पडणाऱ्या पावसाचे प्रमाण हे बदलत जाते. त्यामुळे येथील मातीची धूप होण्याचे प्रमाण वाढलेले आहे. अचानक वाढलेल्या लागवडक्षेत्रामुळे जमिनीची सुपीकता नाहीशी होऊन मातीची धूप होण्याचे प्रमाण वाढलेले आहे. जनावरांच्या मोकाट चरण्यामुळे वाढणाऱ्या, पिकणाऱ्या भाजीपाल्यावरही परिणाम झालेला आहे. आता तर हा जिल्हा डोंगराळ, खडकाळ प्रदेश म्हणूनच ओळखला जातो.

झाबुआशेजारील धार जिल्ह्यातील काही प्रदेश हे नैसर्गिक आपत्तीच्या सीमारेषेवर आहेत. नैसर्गिक असमतोलपणा वाढल्यामुळे माणसे आणि जनावरे यांची गुजराण होणे जवळ जवळ अशक्य होऊ लागले.

झाबुआमधील ८३% लोक हे जंगलांशी अतूट नाते जपणारे भिल्ल आदिवासी असल्यामुळे हा परिणाम जास्तच दिसून येतो. आर. गोपालकृष्णन (District Collectior in 1985) म्हणतात, "येथील जवळजवळ ९० टक्के लोक हे शेतीवर अवलंबून

आहेत आणि जंगलांवर अवलंबून होते. जंगले जशी नाहीशी व्हायला लागली तसा जंगलापासून मिळणाऱ्या उत्पन्नावर परिणाम झाला. हे उत्पन्नही कमी होऊ लागले. याचा परिणाम म्हणजे या प्रदेशातून मोठ्या प्रमाणावर लोक स्थलांतरीत झाले. वर्षातून ६ महिने तरी हे लोक गावाबाहेर राहू लागले."

नैसर्गिक संकटामुळे निर्माण झालेले अतिशय अवघड असे सामाजिक, आर्थिक तसेच नैसर्गिक स्वरूपाचे प्रश्न मांडताना, काक्राधार गावातील ६५ वयाचे टोलिया सांगतात, "आसपासच्या डोंगरावरील मातीची धूप झाल्यामुळे माझी ०.८०% हेक्टर जमीन (शेतजमीन) वाहून आलेल्या दगडमातींनी भरून गेली. जमीन नापीक झाली. ज्यावर माझे सर्व आयुष्य अवलंबून होते अशा शेतीतील उत्पन्नाला मी मुकलो. आवश्यक,पुरेसा चारापाणी न मिळाल्यामुळे माझ्या गायीसुद्धा अशक्त झाल्या. काही वर्ष तरी मी बेकारच होतो. त्यांतर मी माझ्या गायी विकून टाकल्या. आणि इथून ४५० कि.मी. अंतरावर असणाऱ्या कोटा या गावी रोजगारीवर जाऊ लागलो.'

ह्या जिल्ह्यातील जवळपास ६० टक्के लोक नोकरीधंद्यानिमित्ताने गुजरात, राजस्थान किंवा मध्यप्रदेशातच इतर मोठ्या शहरांमध्ये जात असत. पूर्वीच्या काळात भिल्ल लोकांनी पावसाचा देव इंद्र याच्याशी यद्ध पुकारल्यामुळेच आजही त्यांना दुष्काळाला सामोरे जावे लागत आहे, अशी येथील लोकांची भावना आहे."

अंबाखोडा गावातील तामू नावाचे गृहस्थ म्हणतात, "पूर्वी सप्टेंबर पर्यंत झाबुआवर ढग दाटून येत आणि आजच्या सारखे उत्तम आणि भरपूर पीकपाण्याचे स्वप्नही आमच्यासमोर नसायचे. पावसाळ्यानंतरच्या काळात हाथीपावहाच्या जंगलात घनदाट झाडी असे. जंगली जनावरांचा वावरही असे. त्यामुळे त्या डोंगररांगांतून जायचे धाडस फक्त भिल्लच करू शकत. आमच्या पूर्वजांनी दिलेल्या लढ्यामुळे वरुणराज इंद्र अजूनही आम्हाला शिक्षा देत आहे."

## शेतकऱ्यांना आर्थिक फटका

१९६६-६८ या काळामध्ये झाबुआने स्वातंत्र्यानंतर प्रथमच दुर्भिक्ष्य बघितले. जवळपास तीन वर्षे तिथे पाऊस पडला नाही. ओसाड डोंगरांवरून मातीही वाहून गेल्यामुळे पावसाळ्यानंतरचा पाणीसाठा निर्माणच झाला नाही.

१९६० मध्ये स्वतःची जमीन/भूमी सोडून स्थलांतरित झालेल्या आदिवासींपैकी एक गृहस्थ तामू सांगतात, "मी माझी सर्व पुंजी ज्या शेतजमिनीतच गुंतविली होती, ती जमीन पूर्णपणे कोरडी होऊन गेली. त्यामुळे मी माझ्या तिन्ही गायी देखील विकल्या आणि रोजगारासाठी गाव सोडून इंदोरला गेलो. शेतीमधून उत्पन्न मिळेनासे झाल्यामुळे कामधंद्यासाठी बाहेरगावी जायचे प्रमाण सर्वत्र दिसू लागले. मी माझी बायको व मुलांना मागे ठेवून जवळपास १० वर्षे तरी नोकरीसाठी सतत बाहेर जात होतो. माझ्या कुटुंबाला मिळणाऱ्या कमी उत्पन्नावर गुजराण करणे, जगणे अतिशय अवघड होत असे. त्यामुळे दुसऱ्यांच्या शेतावर जाऊन त्यांना पण रोजगारीवरही काम केले.

१९८५ मध्ये झाबुआमध्ये दुसऱ्यांदा मोठा दुष्काळ पडला. त्यावेळी सरकारकडून आम्हाला गवंडीकाम दिले गेले. मुक्त चराईला मोकळीक मिळाली. त्याकाळांत मी परत गाव सोडले नाही,

परंतु जंगलांवर अवलंबून असणाऱ्या आम्हा भिल्ल जमातीतील माझे एक पुजाऱ्याचे स्थान तोपर्यंत नष्ट झाले होते आणि मी भिल्ल नाही, तर 'मामू' म्हणून ओळखला जाऊ लागलो."

१९८५ चा दुष्काळ जास्त मोठा आणि गंभीर होता. १९११ नंतर प्रथमच झाबुआत ३०८ मि.मि. इतक्या कमी पावसाची नोंद झाली. स्वातंत्र्यानंतर प्रथम इतक्या मोठ्या प्रमाणावर अन्नाचा तुटवडा, उपासमार इथे आढळून आली. पूर्णतः बेकार झालेल्या आदिवासींचे इतर आदिवासी नसणाऱ्या लोकांनी चालविलेल्या बाजारपेठांवरील हल्ले हा या गंभीर दुष्काळाचा आणि गरिबीचाच एक परिणाम आहे.

मा. राजीव गाधींनी जिल्ह्याला भेट दिल्यानंतर प्रथमच या संकटात पडलेल्या लोकांना मदत म्हणून इथे योजना सुरू झाली. येथील बेकारांना नोकरीधंदे उपलब्ध करून देणे हेच याचे मुख्य स्वरूप होते. जवळजवळ दहा हजार लोकांना १९८५ च्या ऐन उन्हाळ्यात रोजगार उपलब्ध करून दिला गेला. इतके होऊनही नोकरीधंद्यासाठी झाबुआतून स्थलांतर हे १९९० पर्यंत चालूच राहिले. त्याकाळात झालेल्या ७१८ कुटुंबांच्या अभ्यासावरून असे आढळून आले की, यापैकी जवळजवळ ५७% कुटुंबे स्थलांतरित या गटात येतात. याचाच अर्थ असा की या कुटुंबातील किमान एकतरी व्यक्ती धंद्यानिमित्त गाव सोडून जाते आहे. मोठमोठ्या शेतकऱ्यांव्यतिरिक्त, इतर छोट्या शेतकरी कुटुंबांपैकी एक तृतीयांश शेतकरी तरी गावाबाहेर जाताना दिसतात.

१९९० च्या मध्यापासून परिस्थितीत हळूहळू बदल होऊ लागला. काक्राधारमधील जोगदी या महिलेने नोकरी, कामानिमित्त बरीचशी रेल्वेस्टेशनं पाहिलेली आहेत. तिच्या वयाच्या तिशीच्या काळात तिला रेल्वेस्टेशन आणि वॉटरशेड हे दोनच इंग्लिश शब्द माहिती होते. तीन वर्षापूर्वीपर्यंत ती गायीच्या चाऱ्यासाठी इथून ४५ कि.मी. अंतरावरील रतराम जिल्ह्यामध्ये जात असे. पण आता परिस्थिती बदलली आहे. पाणलोट क्षेत्रविकासामुळे आम्हाला जीवदान मिळाल्यासारखे आहे. कारण प्रत्येकाला अन्न तसेच जनावरांना पुरेसा चारापाणी मिळायला लागला आहे. नोकरीनिमित्त आम्हाला इतरत्र भटकावे लागत नाही. आसपासच्या डोंगरांना देखील तेथील हरविलेली जंगले परत मिळू लागली आहेत.

जोगदी सांगते की, यावर्षी तिने तिच्या जनावरांना पुरेसे गवत देऊन उरलेले जवळपास ८००० किलोग्रॅम गवत विकून १०,००० रू. मिळवले आहेत. तिच्यामते १० वर्षे रोजगारीवर काम करून जेवढे पैसे तिने साठविले असते, तितके मला या एका वर्षातच मिळाले. जोगदी झाबुआच्या भूतकाळाचे तसेच वर्तमानाचेही प्रतिनिधित्व करते. जोगदीप्रमाणेच पूर्ण झाबुआचाही पुनर्जन्म झाला आहे.

मध्यप्रदेश सरकारमार्फत राजीव गांधी पाणलोट क्षेत्रविकास योजना १९९४ मध्ये झाबुआमध्ये राबविली गेली. निसर्गाने सूडाचा जो खेळ झाबुआत मांडला, त्यामुळे झालेल्या जखमांवर या योजनेने मलमासारखा परिणाम साधला. या एका मर्यादित वेळेच्या सुसूत्र कार्यक्रमात लहान लहान अशा अनेक पाणलोट क्षेत्रविकास कार्यक्रमांचा सहभाग होतो. हा प्रत्येक लहान कार्यक्रम ४ वर्षे कालावधीचा आहे. याने यापूर्वीचे सर्व नियम मोडले. जे पूर्वी फक्त लाभार्थीच होते ते आता निर्णय घेऊ लागले.

राज्यातील एकूण ४५ पैकी ४२ जिल्ह्यात

राबवल्या गेलेल्या या योजनेमुळे तेथील स्थानिक अर्थव्यवस्था बदलून गेली. जवळपास १४ लाख लोकांना या तीन वर्षांत काम उपलब्ध झाले. झाबुआमधील १,२४,००० हेक्टर प्रदेशात, १२ सरकारी तर सात खाजगी संस्थांमार्फत २१८ छोटे छोटे पाणलोट क्षेत्र विकासाचे कार्यक्रम राबविले जात आहेत. आज झाबुआतील प्रकल्प पाणलोट विकास व्यवस्थापनासाठी एक उत्कृष्ट प्रतिकृती समजली जाते.

या योजने अंतर्गत पिण्याच्या पाण्याचा तुटवडा, मातीची धूप, पाणीसाठ्यांची कमतरता, त्यामुळे येणारी जमिनीची नापीकता, पाणलोटक्षेत्रावर आधारित असलेले अनुसूचित जाती व जमातींचे मोठे प्रमाण, आवश्यकतेपेक्षा कमी प्रमाणात मिळणारा रोजगार इत्यादी मुख्य गोष्टींचा विचार करूनच या योजनेची उद्दिष्टे ठरविलेली आहेत.

या कार्यक्रमाचे सल्लागार सांगतात, या योजनेचे पहिले आणि महत्त्वाचे उद्दिष्ट म्हणजे ही **योजना पूर्णतः लोकांचीच असावी**. त्यामुळेच लोकांचा सहभाग ही या कार्यक्रमातील अनिवार्य गोष्ट होती. आता लोक त्यांच्या त्यांच्या पाणलोट क्षेत्रात जल संधारणाचे कार्यक्रम राबवतात. मात्र यावेळी या कार्यक्रमांची संकल्पना, मांडणी, प्रत्यक्षात कार्यान्वित करणे आणि ते टिकवून ठेवणे हे सर्व लोकच करतात.

पूर्वी या संदर्भात राबविले गेलेले सर्व कार्यक्रम विविध विभागांनी वेगवेगळ्या स्तरांवर स्वतंत्ररित्या राबविले होते. अनेक प्रकारच्या संस्था आपापसात काहीही सुसूत्रता, नियमन नसताना स्थानिक पर्यावरण आणि अर्थव्यवस्था ह्या दोन स्वतंत्र्य गोष्टी असून त्यांचा एकमेकांशी काहीही संबंध असत नाही, अशाच प्रकारची सुरुवातीला आमची विचारसरणी होती.

आर. गोपालकृष्णन, जे या राजीव गांधी योजनेचे समन्वयक व जनक आहेत, त्यांच्या झाबुआतील वैयक्तिक अनुभवातूनच त्यांना तेथे अशी गरिबीविरूद्ध योजना साकारण्याची स्फूर्ती मिळाली. १९८० च्या सुमारास विज्ञान आणि पर्यावरण केंद्रातर्फे केलेल्या एका अभ्यासाची माहिती त्यांच्या वाचनात आली.

ग्रामीण लोकांना नोकरी, काम उपलब्ध करून देण्यासाठी सरकार जी गुंतवणूक करीत आहे त्या योजना लोकांच्या नियंत्रणाखाली असणं गरजेचं आहे. अशा योजना पर्यावरणाला नवजीवन देण्याच्या दिशेने राबवल्या गेल्या तर गरीब लोकांना जास्त उपयोगी ठरतील आणि स्थानिक अर्थव्यवस्था सुधारण्यासाठीही फायद्याच्या होतील. त्यांच्या स्वतःच्या अभ्यास प्रकल्पाचे नावही असेच आहे. ते आपल्या संशोधन पेपरामध्ये म्हणतात, "दुष्काळग्रस्त प्रदेशातील लोकांचा गरिबीचा प्रश्न हा तेथील पर्यावरणाच्या ऱ्हासाशी निगडीत असतो. कारण तेथील दुष्काळाचे कारण आणि फळ हे दोन्हीही या नाशावरच असते."

ते पुढे म्हणतात, "ज्या योजनेत गरिबीच्या प्रश्नाबरोबरच पर्यावरणाशी संबंधित प्रश्नांचाही विचार केला जातो. अशा एका सुसूत्र कार्यक्रमाचीच आपल्याला खरी गरज आहे, हीच शिकवण झाबुआने आपल्याला दिली आहे. आपल्याला मर्यादीत वेळेत योग्य तऱ्हेने कायान्वित होऊ शकणारी आणि लोकांच्या संपूर्ण सहभाग असेल अशा एका कार्यक्रमाची गरज आहे."

गेल्या ५० वर्षात लोकांसाठी ज्या ज्या योजना राबवल्या गेल्या, त्यात लोकांना सहभागी करून घेतले नाही. ज्यावेळी लाभार्थी योजनेत सहभागी

नसतात तेव्हा ते कायमस्वरूपी काम होऊ शकत नाही. या राजीव गांधी योजनेमध्ये आम्ही कार्यक्रमाची सर्व जबाबदारी लोकांवर टाकली आणि ही योजना सुकर मार्गांनी जावी यासाठी मदत करणे एवढीच जबाबदारी सरकारची होती.

'दुष्काळग्रस्त भागात पर्यावरणाला नवजीवन देणाऱ्या कामांच्या स्वरूपात जर लोकांना नोकरी धंदा दिला तर तो जास्त फायद्याचा ठरतो.' हीच त्यांची संकल्पना मा. दिग्विजय सिंग यांनी राजीव गांधी योजना (मिशन) या स्वरूपात उचलून धरली. नंतर ही योजना प्राथमिक शिक्षण, ग्रामीण औद्योगिकीकरण यांसारख्या इतर सहा क्षेत्रांमध्ये वाढविण्यात आली. राज्य तसेच केंद्र सरकारतर्फेही राजीव गांधी पाणलोट क्षेत्रविकास योजनेला अर्थसहाय्य दिले गेले. केंद्रसरकारच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, दुष्काळग्रस्त प्रदेशांसाठीच्या योजना आणि एकत्रित पाणलोट क्षेत्रविकास योजना यासाठी असणारे अर्थसहाय्य हे पाणलोट विकास कार्यक्रमांसाठी खर्च करण्यात आले. रोजगार हमी योजनेतील काही पैसाही या कार्यक्रमांसाठी राखून ठेवण्यात आला. याव्यतिरिक्त राष्ट्रीय पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम, राज्यस्तरावरील काही पैसा, पंचायत स्तरांवरील जवाहर रोजगार योजना यातील काही पैसाही कार्यक्रमांसाठी राखून ठेवण्यात आला.

### गावाने जबाबदारी स्वीकारली

लोकांची मागणी ही लोकांमार्फतच कार्यवाहीत यावी यासाठी विविध क्षेत्रांमार्फत, विभागांमार्फत चालवले जाणारे सर्व पाणलोट विकास कार्यक्रम हे प्रथम या योजनेअंतर्गत एकत्र करण्यात आले. मात्र हे सर्व प्रत्यक्षात आणण्यासाठी आवश्यक असलेल्या काही गोष्टी :-

- लोकांचे संघटन, क्षमता वाढणे, योजनेची आखणी, कार्यवाही सुकर करण्यासाठी जिल्हा आणि तालुका स्तरांवर बहुशाखीय समन्वयित रचना उभी करणे.
- ग्रामीण जनतेचा योजनेची आखणी, कार्यवाही, पाणलोट क्षेत्रविकासाच्या कामात सहभागी असणे. निरीक्षण योजना, व्यवस्थापन या सगळ्यांमध्ये सहभाग मिळवणे.
- लोकांनी घेतलेले निर्णय प्रत्यक्षात आणण्यासाठी त्याला मदत म्हणून सर्व उपलब्ध तांत्रिक यंत्रणा, शास्त्रीय माहिती सक्षम करणे - पंचायती राज सारख्या संकल्पनांमध्ये लोकप्रतिनिधींना सहभागी करून घेणे.

पाणलोट क्षेत्र विकास आणि जंगल व्यवस्थापन या दोन्हींना एकत्र आणण्याचे प्रयत्न झाबुआमध्ये सर्वप्रथम करण्यात आले. पाणलोट क्षेत्र विकासामुळे येथील जंगलांचे पुनरुज्जीवन झाले. जंगल व पाणलोट विकास हा एकत्र कार्यक्रम १९९४ मध्ये सुरू झाला. सर्वप्रथम त्यात वीस ग्रामपातळीवरील जंगल समित्या तयार करण्यात आल्या. या कार्यक्रमाअंतर्गत मोठ्या प्रमाणावर लोकशिक्षण देण्यात आले. प्रथम लोक आमच्याकडे संशयाने पाहात असत. त्यांचा सहभाग हा सुरुवातीला मनापासून नव्हता. मग आम्ही त्यांना विचारायचो, 'जंगल हे आदिवासींच्या मालकीचे आहे हे मान्य; पण जंगलच कुठे अस्तित्वात आहे, त्यामुळे जंगल पुन्हा निर्माण करायला आणि टिकवून ठेवायला आम्हाला मदत करा.'

त्याचबरोबरीने माझ्या सहकाऱ्यांची विचारसरणीदेखील बदलू लागली. जंगले ही लोकांची संपत्ती आहे, त्यामुळे त्यांच्याबरोबर मैत्री निर्माण करा आणि त्यांना हीच जंगले टिकवायला विनंती

करा, असे आम्ही सांगत होतो. याचा चांगला परिणाम झाला. १९९७ पर्यंत झाबुआत ३४४ ग्रामीण जंगल समित्या तयार झाल्या, असे जिल्ह्याचे जंगलअधिकारी ए. बी. गुप्ता सांगतात. आंबाखोडा गावातील तुलिया म्हणतात, "सुरुवातीला जंगलातील शिपायांना मी घाबरायचो. ते हातातील काठी माझ्यावर रोखायचे. पण आता जेव्हा आम्ही संकटात, त्रासात आहोत, तेव्हा ते आम्हाला मदतच करतात."

झाबुआतील एकूण जंगलांपैकी ६०% जमीन ही या एकत्रित योजनेखाली आहे. ३४४ समित्या या अंदाजे ४२० गावांमध्ये काम करतात. समितीच्या एकूण ७२,५५६ सदस्यांपैकी २९,७०३ महिला आहेत. आता जंगलातील शिपायांऐवजी गावकरीच जंगलाचे रक्षण करतात असे चित्र बऱ्याच गावातून दिसून येते. स्वदेशी तंत्रज्ञानाचा वापर आणि गावातील लोकांचा पूर्ण सहभाग या दोन योजनेतील प्रमुख गोष्टी आहेत. त्यामुळे एकूण लागणारा खर्चही हा अतिशय कमी आहे. गोपालकृष्णन् म्हणतात, "आमची पद्धती, विचारसरणी यामुळेच हा प्रकल्प अतिशय स्वस्तात राबविला गेला." श्री. गुप्ता यांच्या म्हणण्यानुसार लोकांना रोजगार उपलब्ध करून देणे एवढीच खऱ्या अर्थाने आम्ही केलेली गुंतवणूक आहे. जसजसे लोकांना या योजनेचे फायदे लक्षात आले तसे त्यांनी काम करायला स्वयंसेवक दिले. ह्यामुळे फक्त ह्या योजनेचा खर्च कमी झाला एवढेच नाही; तर लोकांनाही ह्या योजनेबद्दल आपुलकी निर्माण झाली.

या योजनेसाठी कोणत्याही नवीन नेमणुका झाल्या नाहीत. उपलब्ध विभागांतर्फेच आवश्यकतेनुसार मनुष्यबळ पुरवले गेले. अशाप्रकारे झाबुआ आणि धार जिल्ह्यातील या योजनेला मिळालेल्या यशाने कामाची योग्यप्रकारे विभागणी करून आणि योजना ही पूर्णपणे लोकांनी लोकांसाठी चालवलेली असेल तरच पर्यावरणाशी निगडीत प्रश्न सोडवायला उपयुक्त ठरते, हे सर्वांना पटवून दिलेले आहे. या यशोगाथांमुळे पाणलोट क्षेत्रविकास कामांना एक नवीन दिशा प्राप्त झालेली आहे.

●●

(Source :The Citizen fifth Report , Edited by - Anil Agarwal & Sunita Narayan)

---

(पृष्ठ ५ वरून पुढे)

दगड त्यामध्ये येऊन काटाज बंद पडत आहेत.

काटाजचे पाणी एकसारखे लोकांना उपसता येत नाही. त्यासाठी शेतजमीन, पिण्याचे पाणी इत्यादींचा अभ्यास करावा लागतो. शेतीसाठी एकसारखे पाणी मिळत नसल्याने सध्या लोकांचा यातील सहभाग कमी होत आहे. त्यांना सरकारी यंत्रणेकडून मिळणारे सततचे पाणी आपलेसे वाटत आहे. यामुळे लोकांचेच दुर्लक्ष होत आहे.

प्राचीन काळातील चांगल्या योजना, पद्धती हळूहळू काळाच्या आड गेल्या आहेत; पण त्यातील अनेक तळी काही प्रमाणात अजूनही अस्तित्वात आहेत. त्यातील काहींचे पुनरूज्जीवन होणे गरजेचे आहे. त्यातील हजारो तळी अंशतः अस्तित्वात आहेत. यासाठी जागतिक बँकेने ओरिसा सरकारला कर्जाऊ पैसे देण्याचे मान्य केले आहे. आपण एकविसाव्या शतकात प्रवेश केला; पण पिण्याच्या पाण्याचा प्रश्न पूर्वीपेक्षा गंभीर झाला आहे. त्यातच मोठ्या नि मध्यम आकाराच्या धरणांची क्षमता कमी कमी होत आहे. यावेळी सर्वांनाच आपल्या जुन्या पध्दतींची आठवण होत आहे. त्याचा उपयोग चांगल्यारीतीने व्हावा असा प्रयत्न केला जात आहे. ●●

(Source : Dying wisdon, Edited by - Anil Agarwal & Sunita Narayan)

# एका यशस्वी समर्पणाची कथा

श्रीनिवास इंदापूरकर

निसर्ग मानवाशी सतत संवाद साधत असतो. यातूनच काही चांगल्या गोष्टी तयार होतात किंवा निसर्गाचा ऱ्हास होताना दिसतो. एकविसाव्या शतकातील पदार्पण पर्यावरणाच्या दृष्टीने हानिकारकच होते. विज्ञानाची प्रगती झाली. पण त्याच प्रमाणात पर्यावरणावर अनिष्ट परिणाम झालेले दिसतात. स्वतःच्या उन्नतीसाठी मानवाने निसर्गाचा मोठ्या प्रमाणात गैरवापर केला. या संहारामुळे निसर्गातील विविधता नष्ट झालेली दिसते किंवा होण्याच्या मार्गावर आहे. भारतामध्ये सुध्दा वनसंपत्ती, जलसंपत्तीचा फार मोठ्या प्रमाणात नाश होत आहे. याचे संरक्षण करणे, संवर्धन करणे हे प्रत्येक माणसाचे कर्तव्य आहे.

भारतात पर्यावरणाचे रक्षण होण्यास व त्यात जिवंतपणा आणण्यासाठी काही वैयक्तिक प्रयत्न झालेले आहेत. आपल्या गावासाठी या व्यक्तींनी जीवापाड मेहनत केलेली आहे. या मेहनतीमुळेच गावातील पर्यावरणाचे पुनरूज्जीवन झालेले आहे. सोबनसिंग भंडारी यांच्या प्रयत्नांना असेच यश आले.

सोबनसिंग भारतीय सेनेतून निवृत्त झाल्यावर स्वतःच्या गावात राहण्यासाठी आले. ते गावातील पर्यावरणाची दुरवस्था पाहून अतिशय उद्विग्न झाले. त्यांच्या गावाचे नाव 'नागचंद' असे आहे. हे गाव उत्तरप्रदेशातील 'टिहरी' जिल्ह्यात येते. सुप्रसिध्द टिहरी धरणापासून गाव फक्त चाळीस किलोमीटरावर आहे. या भागातील जमीन नापीक व पडिक आहे. या जमिनीवर काहीही येत नाही. टिहरी जिल्ह्याचा हा दुष्काळग्रस्त भाग आहे. या भागात झाडसुध्दा दिसत नाहीत व पिकपाणी खूपच कमी आहे.

१९८७ ला सोबनसिंग आपल्या गावात राहायला आले तेव्हा त्यांनी प्रथम सर्व परिस्थितीचे अवलोकन केले. अभ्यास केला. त्याचबरोबर लोकांशी विस्तृत चर्चा केली. त्यावरुन त्यांच्या असे लक्षात आले की गावात 'पाणी' नाही, झाडे नाहीत त्यामुळे या उजाड जमिनीवर काहीही उगवत नाही. दिवसेंदिवस पडिक जमिनीत वाढ होत चालली आहे. गावात उरले आहेत वृद्ध, स्त्रिया आणि छोटी मुले. गावातील सगळे तरूण सध्या शहरात, पैसे मिळवण्यासाठी गेले आहेत. गावाला आधाराची गरज आहे; पण तसा आधार द्यायला कोणीच नाही. योवेळी सोबनसिंग गावाची सूक्ष्म पाहणी करीत होते. या सर्व माहितीचे संकलन करणे, त्यावर विचार करणे यात त्यांचे सहा महिने गेले.

सहा महिन्यांनंतर गावात ग्रामपंचायतीच्या निवडणुका झाल्या. सोबनसिंगांची सरपंच म्हणून निवड झाली. सुरुवातीला सरपंच व्हायचे की नाही या द्विधा मनःस्थितीत ते होते. पण लवकरच त्यांनी सरपंचपदाचा उपयोग करुन स्वतःच्या कल्पना राबविण्यासाठी करण्यास सुरुवात केली. रोजगार हमी योजनेचा फायदा घेऊन त्यांनी गावात 'समाज मंदीर' बांधले. यासाठी गावकरी पुढे आले. त्यांनी मोठ्या प्रमाणात श्रमदान केले. गावकऱ्यांचा प्रतिसाद बघून सोबनसिंगने आणखी योजना गावात कार्यान्वित केल्या. त्यासाठी लोकांचा सहभाग वाढवला. गावकऱ्यांना स्वतःच्या गावाविषयी प्रेम वाटायला लागले. आपणच आपल्या गावाचा विकास करू शकतो हा आत्मविश्वास आला. ते सोबनसिंगच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहिले.

सोबनसिंगने 'गावाचा विकास' हाच ध्यास घेतला होता. आपल्या गावातील लोकांना पाणी मिळावे अशी त्यांची इच्छा होती. त्यासाठी ते प्रयत्नशील असत. त्यांच्या गावाला मार्च महिन्यापासूनच टँकरने पाणी पुरवठा करावा लागत असे. हा टँकरचा पुरवठा त्यांना खटकत होता. आपली जन्मभूमी 'सुजलां-सुफलाम्' व्हावी अशी मनीषा मनाशी बाळगून कामाला सुरुवात झाली. त्यासाठी त्यांनी तालुका पंचायत, जिल्हापरिषद, मृदसंधारण विभाग यांच्याकडे अर्ज केले. ते स्वतः सरपंच असल्याने जागृकतेने पाठपुरवठा करू लागले. पण सरकार दरबारात त्यांना कोणीही दाद लागू दिली नाही. पण त्यांचे प्रयत्न चालूच होते.

त्यांच्या अथक प्रयत्नांना शेवटी यश आले. १९९० च्या सुमारास वनविभागाला काही ठिकाणी 'जलसंधारणचे' कार्यक्रम राबवायचे होते. त्यासाठी ते जागा शोधत होते. वनखात्याच्या अधिकाऱ्यांनी अनेक जागांची पाहणी केली. त्यांनी त्याचबरोबर लोकांशी चर्चा केली. या कार्यक्रमासाठी स्थानिक लोकांचा सहभाग आवश्यक होता. हा सहभाग वनखात्याला मिळत नव्हता. वनअधिकाऱ्यांच्या मते लोक सहभागाशिवाय प्रकल्प यशस्वी होऊ शकत नाही. त्यामुळे त्यांना मनासारखे गाव प्रकल्पासाठी मिळत नव्हते. त्याचवेळी जिल्हाधिकाऱ्यांनी सोबनसिंगची ओळख वनाधिकाऱ्यांना करून दिली.

सोबनसिंगने वनाधिकाऱ्यांना स्वतःच्या गावात आमंत्रित केले. त्यांना सर्व गाव दाखविले. अधिकाऱ्यांनी लोकांशी चर्चा केली. त्यांना प्रकल्पाची संपूर्ण माहिती सांगितली. गावकरी व वनाधिकारी यांच्या चर्चेच्या दोनतीन फेऱ्या झाल्या. दोन्हीकडच्या बाजूंनी स्वतःची मते मांडली. त्यानंतर करारावर स्वाक्षऱ्या झाल्या.

या प्रकल्पासाठी गावाने स्वतःची ३० हेक्टर जमीन देण्याचे मान्य केले. त्याचप्रमाणे प्रकल्पाला संपूर्ण सहकार्याची अपेक्षा पूर्ण करण्यास होकार भरला. या ३० हेक्टर जागेवर जनावरे चरण्यास जाऊ नये म्हणून कुंपण बांधण्यात आले. या कुंपण बांधणीचा खर्च प्रकल्पातून करण्यात आला. या भागात संपूर्णतः चराई बंदी करण्यात आली. त्याचप्रमाणे पावसाळ्यानंतर ३० हेक्टर भागात झाडांची लागवड करण्यात आली. हा खर्चसुध्दा प्रकल्पांतर्गत झाला. त्यामुळे एका वर्षातच गावात फरक जाणवू लागला.

या तीस हेक्टर भागात हिरवळ दिसू लागली. त्याचप्रमाणे झाडांचे अस्तित्व जाणवू लागले. या भागावरती वाढलेले गवत कापण्याची परवानगी गावकऱ्यांना होती. त्यामुळे त्यावरती हिरव्या चाऱ्यांची समस्या सुटली. तसेच गावातील आर्द्रता वाढली.

यानंतर पुढील तीन वर्षात इतर पर्यावरणीय बदल दिसू लागले. त्यातील मुख्य म्हणजे (जमिनीतील पाण्यात) भूजलात झालेली लक्षणीय वाढ. या गावात मार्चमध्ये विहिरींचे पाणी खूप खोल जायचे; पण वृक्षोरोपणामुळे एप्रिलच्या मध्यापर्यंत पाण्याची कमतरता एकदम कमी झाली. यामुळे गावातील विहिरींना जास्त दिवस पाणी राहू लागले. हे प्रत्यक्ष फायदे लोकांना दिसू लागले, यामुळे विकास प्रकल्पाला चालना मिळाली. लोकांचा पाण्याचा प्रश्न सुटला. हा प्रकल्प अतिशय यशस्वी झाला. सोबनसिंगच्या प्रयत्नांना यश आले. पण पुढे काय?

तीन वर्षात प्रकल्प संपला. त्यानंतर काय करायचे? असा प्रश्न गावकऱ्यांसमोर पडला. आता

झाडांना पाणी कोण घालणार? कुंपणाची देखभाल कशी करायची? याला पैसे कोठून आणायचे? सोबनसिंगने त्यासाठी ग्रामसभा बोलावली. या विषयावर चर्चा झाली. या सभेत असे ठरविण्यात आले की ३० हेक्टरवरील गवत गावकऱ्यांनी न वापरता त्याचा लिलाव करायचा आणि या विक्रीतून आलेले पैसे ग्रामविकासासाठी वापरायचे. त्यानुसार पहिल्या वर्षी गवत विकून ३,६०० रूपये मिळाले. या पैशातून गावकऱ्यांनी रोपवाटिका उभारली.

सोबनसिंगने गावकऱ्यांच्या मदतीने गावाभोवतीच्या संपूर्ण पडिक जमिनीवर वृक्षारोपणाचा कार्यक्रम हाती घेतला. त्यांनी त्या भागात येणाऱ्या झाडांची यादी केली. अशीच झाडे रोपवाटिकेत वाढवली. या झाडांचे वृक्षारोपण पडिक जमिनीवर केले. त्यामुळे झाडे चांगल्या प्रमाणात वाढली व त्यांचे संगोपन फारसे करावे लागले नाही. हा सर्व 'हरित कार्यक्रम' गावकऱ्यांच्या सहकार्याने पार पडला. यामध्ये एक तत्त्व होते 'गावाचे काम ते आपले काम'. त्यामुळे श्रमदान खूप झाले. या श्रमाचे पुरेपूर माप लोकांच्या पदरात पडले. लोकांनी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपणाच्या कार्यक्रमात भाग घेतला. पण या झाडांना पाणी कसे घालणार? पाणी आणणार कोठून? हा मोठाच प्रश्न होता. यावर उपाय म्हणून गावातील नैसर्गिक झऱ्यांवर बंधारे उभारण्यात आले. त्याचप्रमाणे पडिक जमिनीवर 'V' आकाराचे खड्डे खणण्यात आले. हे खड्डे घेताना जमिनीच्या उताराचा विचार केला. त्यामुळे पावसाळ्यात पाणी छोट्या छोट्या तलावात गोळा व्हायला लागले. त्याचप्रमाणे बंधाऱ्यात पाणी साठायला लागले. यामुळे गावातील पाण्याची कमतरता कमी झाली.

सूर्याच्या उष्णतेमुळे छोट्या छोट्या तलावातील पाण्याचे बाष्पीभवन वेगाने होते. त्यामुळे तळी लवकर कोरडी पडतात. सोबनसिंगने यावर एक तोडगा काढला. त्यांनी जिल्ह्याच्या गावातून प्लास्टिकचे मोठाले कागद आणले. हे प्लास्टिक पाण्यावर अंथरले, म्हणजेच पाणी झाकून ठेवले. त्यामुळे पाण्याच्या बाष्पीभवनास आळा बसला. या जलसंधारणांच्या कार्यक्रमांमुळे उन्हाळ्यांतही सर्वांना भरपूर पाणी मिळायला लागले.

सोबनसिंगच्या अथक परिश्रमांमुळे खरोखर गावाचा कायापालट झालेला आहे. त्यांच्यामुळे गावातील जमिनीवरचे व जमिनीखालचे पाणी वाढण्यास मदत झाली. या पाण्यामुळे शेतीसाठी व पिण्यासाठी भरपूर पाणी मिळायला लागले आहे. गावाच्या अवतीभोवती सर्व बाजूंना हिरवेगार वातावरण आहे. गावामध्ये पडिक जमीन अजिबात दिसत नाही. हे सर्व श्रेय सोबनसिंग गावकऱ्यांना देतात.

त्यांच्या मताप्रमाणे गावच्या सर्व जमिनीवरचे गवत एकदम तोडण्यास मनाई आहे. त्यांनी गावच्या जमिनीचा काही भाग संरक्षित ठेवला आहे. या भागावरील झाडे व गवत तोडण्यास सर्वांनाच बंदी आहे. उरलेल्या भागातील गवताचा दरवर्षी लिलाव करण्यात येतो किंवा त्यासाठी लोकांकडून 'जमानत' म्हणून रक्कम घेण्यात येते. हे सर्व पैसे लोककल्याण व ग्रामविकासासाठी वापरले जातात. दिवसेंदिवस नागचंद खेड्याचा विकास अधिक वेगाने होत आहे. सोबनसिंगचे स्वप्न साकार झालेले आढळते. त्यांच्या प्रयत्नांना यश आले आहे. त्यांच्या यशाला सर्वच लोकांनी दाद दिली आहे. त्यांच्या कामाबद्दल त्यांना असंख्य पुरस्कार मिळाले आहेत. ● ●

(Source : Down to Earth May 98)

# पाणलोट-क्षेत्र विकास कार्यक्रमात स्त्रियांचा सहभाग

स्मिता गाटे IAS.

(मराठी अनुवाद : अश्विनी मेहेंदळे)

*संयुक्तिक पाणलोट क्षेत्र विकासामुळे अनेक दुष्काळग्रस्त गावांचे सुंदर, हिरव्या प्रदेशात रूपांतर झाले. महाराष्ट्रातील राळेगण सिध्दी व आडगाव अशी यशस्वी उदाहणे आपल्यासमोर आहेत. या लेखाच्या लेखिका एक प्रशासकीय अधिकारी आहेत. प्रस्तुत अभ्यास मध्यप्रदेशातील 'सागर' जिल्ह्यात गुरैय्या या गावात केला गेला. त्यावेळी त्या तिथे जिल्हा परिषदेच्या मुख्याधिकारी व जिल्हा ग्रामीण विकासाच्या संचालिका होत्या. गुरैय्या पाणलोट क्षेत्र विकासाचा प्रयत्न वेगळा आहे. या प्रकल्पात प्रथमच आपला बुरखा सोडून गावातील सर्व स्त्रियांनी एक गट तयार केला व एकाच उद्दिष्टांचा ध्यास धरून काम केले. हा ध्यास होता 'राजीव गांधी पाणलोट विकास कार्यक्रमाद्वारे पाण्याचा तुटवडा, गरिबी व बेरोजगारी नष्ट करण्याचा.'*

## प्रस्तावना

सागर जिल्हा मध्यप्रदेशाच्या उत्तर मध्य भागात येतो. ब्रिटीश काळात हा जिल्हा 'सौगोर' या नावाने ओळखला जायचा. ही पध्दत भारतीय सेनेद्वारे आजही पाळली जाते. १९९१ च्या जनगणनेनुसार सागरची लोकसंख्या १६,४७,७३६ एवढी आहे. गुरैय्या गाव सागरपासून २५ कि.मी. अंतरावर बसलेले आहे.

बीना, धासन, वेंबास, सोनार वे बामनेर या सागर जिल्ह्यातून वाहणाऱ्या पाच नद्या. क्षीण जीवसृष्टीवर येणाऱ्या वाढत्या दबावामुळे गेल्या काही दशकांत जिल्ह्यातील जंगल क्षेत्र जाणवण्याइतके कमी झाले आहे. पावसावर अवलंबून असलेल्या दुष्काळग्रस्त भागात तर हा प्रश्न अधिकच बिकट झाला आहे. भूभाग व जलसंपत्तीच्या गैरवापरामुळे नैसर्गिक संपत्तीची हानी झाली आहे. व त्यामुळे गरिबीचा प्रश्न डोके वर काढत आहे. म्हणून बेरोजगारीचा प्रश्न सोडवण्यासाठी व साधनसंपत्तीच्या व्यवस्थापनेसाठी राजीव गांधी पाणलोट विकास कार्यक्रमाची सुरुवात झाली.

## सामाजिक - आर्थिक घटक

सागर जिल्ह्याचे नाव त्याच्याभोवती असलेल्या तलावामुळे पडलेले असले, तरी शहरी व ग्रामीण दोन्ही भागात पाण्याची प्रचंड टंचाई आहे. पुरूषांचा साक्षरता दर ६७.८२ % तर स्त्रियांचा साक्षरता दर ३७.७७ % आहे. एकूण साक्षरता दर ५३.४४ % आहे. स्त्री-पुरूष प्रमाण ८८१ आहे.

सरंजामशाही पद्धतीच्या समाजात शेतमजुरांची संख्या जास्त आहे. हे लोक जातीव्यवस्थेबाबत जागरूक आहेत व कोणत्याही विकास कार्यक्रमात स्त्रियांचा सहभाग नगण्य आहे.

## पाणलोट विकास कार्यक्रमापूर्वी

गुरैय्या गावात पाण्याचा प्रश्न इतका बिकट झाला होता की, वर्षातील चार महिने पाणी बाहेरून आणावे लागत होते. हातपंप व विहिरी कोरड्या होत होत्या व जमीन नापीक कमी प्रतीची होत होती. दरवर्षी अत्यल्प पीक देणाऱ्या जमिनीवर वाढणाऱ्या लोकसंख्येचा व गरिबीचा दबाव वाढतच

होता. दुसरे कोणतेही जगण्याचे साधन नसल्याने विड्या वळणे हा एकच उपाय शिल्लक होता.

## पाणलोट विकासात स्त्रियांचे कार्य (भूमिका)

या प्रकल्पाचे सगळ्यात मोठे यश म्हणजे स्त्रियांचा संपूर्ण सहभाग. ४ पाणलोट समित्यांमध्ये ४६ सभासद आहेत. ज्यात सगळ्या स्त्रिया आहेत. सागर जिल्ह्यातील सर्व ११ भाग रोजगार हमी योजनेच्या अंतर्गत येतात. म्हणून 'गुरैय्या' ला एक आदर्श गाव करण्याचा व पाणलोट कार्यात स्त्रियांच्या सक्षम सहभागाचा स्तुत्य प्रयत्न करण्यात आला.

## सरुवात

प्रकल्प अधिकाऱ्यांचा स्त्रियांबरोबर काम करण्यासाठी बराच विरोध होता. हे पूर्वी कधीही ऐकलेले नव्हते व अव्यवहार्य समजले जात होते. यावरच्या प्रतिक्रिया सौम्य ते तीव्र अशा होत्या.

* गावातील स्त्रिया अशिक्षित,परावलंबी व अप्रशिक्षित आहेत. पुरूषप्रधान व्यवस्थेत त्यांच्याबरोबर काम करणे अवघड आहे.

* बाई, तुम्ही स्त्री आहात त्यामुळे तुम्हाला आमचे प्रश्न समजत नाहीत. तुमच्याशी या स्त्रिया मोकळेपणाने बोलतात, पण पडदा पध्दतीमुळे प्रकल्प अधिकारी व स्त्रियांच्यात सुसंवादाचा पूर्ण अभाव आहे.

* गावातील पुरूष आमच्यावर सतत लक्ष ठेवतील.

* पुरूष जास्त व्यवहारी असतात.

विरोधाची पुढची प्रतिक्रिया राजकीय नेत्यांकडून आली. 'एका तरी पुरूषाचा समावेश असावा' असा अनेकांचा सल्ला होता. इतरांनी म्हटले की असा कोणताही सरकारी नियम नाही. पण मग जिल्हाधिकारी व प्रकल्प प्रमुख डॉ. अलोक शुक्ल यांनी संपूर्ण पाठिंबा दिला व सुचविले की प्रकल्प अधिकाऱ्यांसाठी व लोकप्रतिनिधींसाठी स्त्री-पुरूष समानतेवर एक कार्यशाळा आयोजित करावी. फेब्रुबारी १९९७ मध्ये राज्य प्रशिक्षण महामंडळ (भोपाळ) च्या डॉ. प्रतिभा यांचे यासाठी मार्गदर्शनपर व्याख्यान ठेवण्यात आले. या कार्यक्रमासाठी आमदार, खासदार, जिल्हा पंचायत अध्यक्ष, जनपद पंचायत अध्यक्ष व पाणलोट विकास समित्यांच्या सभासदांना निमंत्रित करण्यात आले.

कार्यक्रमात पहिल्या भागात सर्वांना स्त्रियांच्या सशक्तीकरणावर व पुरूषप्रधान सरंजामशाही समाजात त्यांना आलेल्या अडचणींवर बोलायला सांगितले. त्यातून एक प्रमुख गोष्ट समोर आली, ती म्हणजे स्त्रिया भोवती असताना पुरूषांना त्यांचा वाटलेला दरारा. सुरुवातीला ते त्याबद्दल बोलले नाहीत; पण नंतर त्यांनी धीर गोळा केला व त्यांची भीती उघड केली. या कार्यक्रमाच्या पूर्ततेनंतरही काही अधिकारी पाणलोट विकास कार्यक्रमात स्त्रियांच्या सहभागाच्या विरोधात होते. सागरच्या जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांना मी सांगितले की मला सहा महिन्यांचा अवधी द्या व जर मी अयशस्वी झाले तर मी तुमचे ऐकेन, तेव्हाच ते राजी झाले. अशाप्रकारे काळाबरोबर स्पर्धा सुरू झाली.

पण चार महिन्यांतच गुरैय्याच्या स्त्रियांनी जि.प.च्या अध्यक्षांना त्यांच्या परिश्रमांचे व प्रयासांचे मूल्यमापन करायला बोलावले व त्यांनी त्यांचे जाहीर कौतुक केले. सागरचे विभागीय अध्यक्ष श्री. पुखराज मारू व विभागाच्या उच्चधिऱ्यांनी स्त्रियांना

प्रोत्साहन दिले. हे कौतुक व प्रोत्साहन मिळाल्यामुळे त्यांच्या अडचणी सोडवायचा स्त्रियांनी निश्चय केला.

### फक्त स्त्रियांची समिती का?

स्त्रियांच्या सहभागाचा अर्थ पुरूषांचे त्यात कधीच स्थान नव्हते. हा एकत्रित प्रयत्न होता. पण पाण्याचा व इंधनाचा तुटवडा हा गुरैय्यातील बहुतेक स्त्रियांचा प्रश्न असल्याने समितीत फक्त स्त्रियांनाच घेण्यात आले. मुली या गावात राहणाऱ्या मुलांशी विवाह करण्यास नकार देत होत्या. या सर्व कारणांमुळे स्त्रियांशी लगेच जवळीक निर्माण झाली व एकदा निश्चय केल्यावर विचार बदलण्याचा प्रश्नच आला नाही.

या स्त्रियांची गावामधूर्न निवड करण्याची पध्दत त्यांच्याशी केलेल्या संवादावर आधारलेली होती. श्री अशोक शुक्ला यांनी स्वतःच स्त्रियांसाठी जानेवारी ते मार्च १९९७ या काळात प्रभाग पातळीवरचे प्रशिक्षण घेतले, त्यात खालील मुद्यांवर चर्चा झाली.

अ) बालमृत्यू ब) सुरक्षित बाळंतपण
क) बालकांची काळजी ड) स्वच्छता व स्वच्छतागृहे
इ) कुटुंबनियोजन

सर्वप्रथम, प्रशिक्षणाला उपस्थित असलेल्या व विषयात रस असलेल्या स्त्रियांना निवडण्यात आले, अशा तऱ्हेने चार ते पाच स्त्रियांच्या एका मुख्य गटाची रचना झाली व नंतर याच गटाने पाणलोट क्षेत्र समितीच्या कामात सहभाग घेतला, पंचायत राज्यात स्त्रियांना ३०% आरक्षण असले, तरी त्यांनी त्याच दराने सक्रिय प्रतिसाद दिला नव्हता. बहुतांश स्त्रिया अशिक्षित व अज्ञानी होत्या. त्यामुळे संपूर्ण स्त्रियांच्या गटाचा एक फायदा झाला, तो म्हणजे त्या सगळ्यांना एकप्रकारचा आपलेपणा वाटला. त्या सगळ्यांना अज्ञान, भीती, आत्मविश्वासाचा अभाव व समाजधारणा आणि परंपरांमुळे दबल्यासारख्या वाटत होते व ह्यामुळेच त्यांच्यात दृढ बंध निर्माण झाले. अनुभव वा नाकारण्याचे भय त्यांच्यात मुळीच नव्हते.

सभेत अगदी कमी पुरूष असल्याने बुरख्याची गरज पडली नाही, ही स्त्रियांचा दृष्टिकोन बदलण्याची पहिली पायरी ठरली यामुळे जात, वर्ग वा धर्म यातून बाहेर पडून त्यांच्यात एक स्वातंत्र्यांची भावना निर्माण झाली. त्यामुळे समाजात, निर्णय प्रक्रियेत कोणतेही स्थान नसणाऱ्या स्त्रियांच्या दृष्टिकानात बदल झाला.

### स्त्रियांच्या संघटनाची पध्दत

सुरुवातीला स्त्रियांचा आत्मविश्वास वाढविण्याची गरज होती. त्यामुळे स्त्रियांचा एक प्रबळ गट तयार होण्यासाठी तीन पायऱ्या पार कराव्या लागल्या.

१) सक्रिय कार्याचा शोध
२) स्त्रियांना पाणलोट विकासाच्या कामात प्रोत्साहित करण्यासाठी प्रकल्प अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण
३) गटांच्या या पध्दतीमुळे स्त्रियांना प्रश्न करण्यासाठी, योजना ठरविण्यासाठी संकल्प शोधण्यासाठी तयार करणे.

### पहिली पायरी

जिल्हा अधिकाऱ्यांची या पातळीवर

महत्त्वाची भूमिका होती. त्यामुळे ज्ञानाची व माहितीची मागणी करण्यासाठी वातावरण तयार करण्याचे त्यांचे काम होते. स्त्रियांची जागरूकता त्यांना त्यांच्या व समाजाच्या विकासात विधायक भूमिका पार पाडण्यात मदत होती, म्हणून त्यांचा स्वतःचा विकास हा त्यांचा पहिला महत्त्वाचा उद्देश होता. ही पध्दत त्यांना स्वतःहून सहभागी व्हायला उद्युक्त करत होती. आरोग्य, स्वच्छता, स्वच्छतागृह, बाळाचा जन्म, बालमृत्यू इ. विषयांवर चर्चा झाली व त्यामुळे जात व वर्गाच्या अडथळ्याला पार करून त्या एकत्रित, संघटित झाल्या. ज्या अडचणींसाठी त्यांनी नशिबाला दोष दिला होता, त्यावर उपाय असू शकतात हा अनुभव नवा होता. त्यांना थोडा वेळ व मोकळीक दिल्यावर आवश्यक बदल होणे नैसर्गिक होते.

प्रशिक्षणात अनेक विषयांवर गहन चर्चा झाल्या व अनेक स्त्रियांसाठी स्वतःची मते मांडण्याची ही पहिली वेळ होती. आपल्या अडचणींना उत्तरे शोधण्यासाठी 'विचार करणे' ही पहिली पायरी होती. यानंतर आला तो 'समाजातील बदल'. पाणलोट विकास, रोजगारासाठी व टिकावू साधनांसाठी उपयुक्त होता. त्यामुळे गावाच्या भल्यासाठी स्त्रियांचा सहभाग मान्य केला गेला.

नव्या कल्पनांचे स्वागत करणाऱ्या हा अनौपचारीक व उत्साही स्त्री गटांची स्थापना केली होती. त्या सर्वांनी आपल्या मुलांना शाळेत पाठविण्याची व घरात स्वच्छतागृहे बांधण्याची प्रतिज्ञा केली.

## दुसरी पायरी

लोक प्रतिनिधी व तरूण लोकांना प्रकल्पात सहभागी करून घेण्यासाठी लोक सहभागाची मदत झाली. पाणलोट विकास-समितीवर फक्त स्त्रिया घेण्याच्या अटीवर त्यांना सुध्दा 'स्त्री-पुरूष समानता' प्रशिक्षणात घेतले गेले. सर्व गावकऱ्यांशी चर्चा करून ज्यांना रस होता त्यांना सहभागी करून घेतले गेले. पण सगळेच सुरळीत होत नव्हते. बरेचसे गावकरी, मुख्यतः पुरूष संशयी होते व प्रकल्प अधिकाऱ्यांकडे त्यांची सहानुभूती होती. पण भविष्यातील आर्थिक फायद्याच्या विचाराने ते सहनशील राहिले व हळूहळू परिस्थिती मान्य केली. प्रशिक्षणांच्या पध्दतीत पारंपरिक ज्ञान व तांत्रिक माहिती यांचा मेळ घातला गेला व माहितीची देवाणघेवाण झाली.

## तिसरी पायरी

थोडासा आधार, संधी व वेळ दिल्यावर स्त्रिया स्वतःचे ज्ञान स्वतः मिळवतात व स्वतःच्या जीवनावर ताबा ठेवू शकतात. सक्रिय पाणलोट विकास कार्यक्रमाने त्यांच्यातला जात-वर्गाचा न्यूनगंड कमी केला व ग्रामीण बचत गटांनी त्यांना संघटीत केले. स्त्रियांच्या अनुभवाचा, ज्ञानाचा व कौशल्याचा आदर गावात वाढला. पण सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे स्त्रियांची स्वप्रतिमा सुधारली. आता त्या पत्रकार व राजकीय नेत्यांना तोंड देऊ शकत होत्या. स्त्रियांच्या बचती एकत्र करून तीन बचत गट निर्माण केले: लक्ष्मी बचत समूह (२,६०० रू.बचत), सहेली बचत समूह (बचत रू. ५,५००) व जागृती बचत समूह (३,८४० रू. बचत). २% ते ३% व्याजावर गरजू महिलांना कर्ज दिले जाऊ लागले व हे कर्ज हप्त्यावर परत करण्याची मुभा होती. ८६ बचत खाती उघडली व ग्रामीण बँकेच्या (दमोह-पन्ना-

सागर) अधिकाऱ्यांना पूरक सेवा देण्याची विनंती करण्यात आली.

त्यांच्या आर्थिक स्वावलंबनामुळे त्यांना त्यांच्या घरातील, समाजातील व अर्थव्यवस्थेतील सहभागाबाबत जागरूक केले. अळीचे फुलपाखरात रूपांतर होते, त्याप्रमाणे गावच्या स्त्रियांना आत्मविश्वास आला. निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याच्या निश्चयामुळे त्या स्वत:साठी व मुलांसाठी शिक्षणाची मागणी करू लागल्या. पाणलोट क्षेत्र कार्यक्रमातून माध्यमिक शाळेला एक व प्राथमिक शाळेसाठी एक खोली बांधायला २०,००० रू जमा केले गेले. यासाठी सरकारी पैसे मिळवण्याचा त्यांचा प्रयत्न चालू आहे. आपल्या कोणत्या मागण्यांना प्राधान्य द्यावे हे त्यांना समजायला लागले आहे. या महिलांना सरकारी व्यवस्था व समाजातील रचना याचे ज्ञान होऊ लागले आहे.

सरुवातीला खूप शंका होत्या व आत्मविश्वासाचा अभाव होता. प्रशिक्षण फक्त जिल्हा पातळीवर ठेवले होते व अधिकाऱ्यांना ते गावपातळीवर परत घ्यायचे होते. असे ठरविण्यात आले की, गुरैय्या पाणलोट हा लोकांना, निमसरकारी संस्थाना व सरकारी अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्याचा ठळक मुद्दा असेल. अधिकाऱ्यांच्या अनेक चर्चाद्वारे ही संकल्पना तयार झाली. अशाप्रकारे सागर जिल्ह्यात गुरैय्या गावाला आदर्श उदाहरण बनण्याची संधी मिळाली.

पुढच्या तीन महिन्यात पाणलोट समितीने, छोटे बंधारे, समपातळी चर, वृक्षारोपण, चराई बंदी, वृक्षांची चरावर लागवड यांसारखी कामे हाताळली. पाणलोट समितीने दर आठवड्याला पगार दिले व प्रकल्पावर सतत लक्ष ठेवले. पाणलोट समितीच्या कामाचे प्रकल्प अधिकाऱ्यांनी मूल्यमापन केले व अनुभवाच्या देवाण घेवाणीतून व योजनेतून लोकांमध्ये जागरूकता निर्माण झाली.

अनेक लोकांनी ग्रामपंचायतीच्या करांचे पैसे दिल्याने गावाचे उत्पन्न वाढले व या पैशातून गावातील रस्त्यांवर दिवे उभारले. स्त्रियांच्या सक्रिय सहभागाने स्वच्छता व स्वच्छतागृहे बांधण्याच्या क्षेत्रात छोटी क्रांतीच झाली व गावाचा सामाजिक-सांस्कृतिक चेहरा-मोहरा पूर्ण बदलला. जिथे सार्वजनिक स्वच्छतागृहे सुध्दा नव्हती, तेथे ८० कुटुंबांनी खाजगी स्वच्छतागृहे बांधली. जास्त सुधारीत स्वच्छतागृहांची व नळांची मुद्दाम रचना केली. ज्यामुळे पाण्याची बचत करणे शक्य झाले. सागरच्या सेनादलानेही पाणलोट समितीला गांडूळ खताचा प्रकल्प स्थापण्यात मदत केली व NCC विद्यार्थ्यांनी उन्हाळ्यात झाडांची देखभाल केली.

मार्च १९९७ मध्ये अनुसूचित जमाती व खालच्या वर्गातील महिला बचत गटांनी नर्सरीचा प्रकल्प सुरू केला. ७ लाख पॉलिथिन तयार केल्या व अनेक घरांत, शेतांत यासाठी प्रयत्न केले. लोकांना उत्पन्नाचे साधन म्हणून हा प्रयत्न केला. या प्रकल्पापूर्वी गावात फक्त दोन दूरदर्शन संच होते, आता ५५ आहेत. या नर्सरीतील झाडे जवळच्या डोंगरदऱ्यात लावून त्यांची जोपासना करण्यात आले.

आर्थिक फायद्याबरोबरच लोकांत स्वच्छता,शिक्षण, स्त्री-पुरूष समानता, बचत इ. बद्दलही जागरूकता निर्माण झाली आहे. जसजसे परिणाम दिसायला लागले, तसतशा स्त्रिया अधिकाधिक मोकळ्या, आत्मविश्वासू झाल्या व टीका

(पृष्ठ ४१ वर पहा)

# सुखोमाजरी

## लघुपाणलोट क्षेत्र विकासाचा देशातील पहिला प्रयोग

अनिल अग्रवाल/सुनिता नारायण

*लघुपाणलोटक्षेत्र विकासाच्या क्षेत्रात प्रथम प्रयत्न करणारं गाव म्हणून सुखोमाजरीचं नाव आज सर्वत्र घेतलं जातं. या गावातल्या रहिवाशांनी सिंचनसाठ्यांच्या लाभक्षेत्रातली पूर्ण निकृष्ट अशी जमीन वाचविली आहे. १९८० च्या सुमारास पी. आर. मिश्रांच्या साहाय्याने गावात अनेक तळी बांधली गेली. यामुळे पीक उत्पादन तिपटीने वाढलं. जंगलांच्या संरक्षणाला स्थानिक रहिवाशांनीच प्रारंभ केल्यामुळे गवत आणि चारा भरपूर प्रमाणात उपलब्ध होऊ लागला आहे. याचा परिणाम म्हणून दुग्धोत्पादन वाढलं आहे आणि या सगळ्याचा संयुक्त परिणाम म्हणजे १९७९ ते १९८४ या पाच वर्षांच्या काळात सुखोमाजरीतल्या घरटी वार्षिक उत्पन्नात कमीतकमी ५००० रूपयांची भर पडू लागली आहे. ही वस्तुस्थिती थक्क करणारी आहे. आत्मनिर्भरता आणि गावातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा विकास यामुळे हे घडलं आहे. सुखोमाजरीच्या या प्रयोगाविषयीचा हा लेख...*

सन १८१२ मध्ये प्रसिद्ध झालेल्या हाऊस ऑफ कॉमन्सच्या एका अधिकृत अहवालात भारतीय खेडं आणि त्याचं प्रशासन यांचं वर्णन करताना म्हटलं आहे,

"भौगोलिक दृष्ट्या विचार करायचा झाला, तर खेडं हा या देशाचा शंभर किंवा हजार एकरांचा एक भाग आहे....., राजकीय दृष्ट्या एखाद्या नगरपरिषदेच्या हद्दीत येणारा हा छोटा शहरवजा भाग आहे. प्रत्येक गावासाठी नगरसेवक आणि इतर सर्व प्रकारचे अधिकारी नेमलेले आहेत. गावाच्या वेशीचं रक्षण करणारा एक वेसकरी आहे. वेशीवरुन भांडणतंटा झाला तर तो त्याबाबत अधिकृत पुरावा देऊ शकतो. तळी आणि इतर जलाशयांच्या पाण्याचं वाटप संबंधित पर्यवेक्षक शेतीसाठी करतो.... शासकीय यंत्रणेचा हा अतिशय साधा-सोपा प्रकार ! या यंत्रणेखाली या देशातील लोक अनादिकाळापासून रहात आहेत." इथल्या खेड्यांच्या वेशींमध्ये आजवर फारसा कधी बदल झालेला नाही. युद्ध, दुष्काळ, रोगराई यामुळे क्वचित कधी खेड्याच्या या संपूर्ण चौकटीला धक्का लागलाच तरी त्या खेड्याचं नाव, त्याच्या वेशी आणि गावाची वैशिष्ट्ये ही वर्षानुवर्ष तीच राहिली आहेत.

ही खेडी ज्या सत्तांच्या अधिपत्याखाली होती, त्या सत्तांचं विघटन आणि उच्चाटन यामुळे खेड्यातल्या स्थानिक रहिवाशांवर फारसा परिणाम होत नसे....."

अहवालातल्या या वर्णनात आणखीही थोडी भर टाकता येईल. या खेड्यांमध्ये निर्माण होणारी संपत्ती इतकी प्रचंड होती की त्यामुळेच जगातल्या सर्वात श्रीमंत आणि सुसंस्कृत देशांमध्ये भारताची गणना होत असे. याच कारणामुळे गोड पदार्थांकडे माशांच्या झुंडी आकर्षित व्हाव्यात, तसे युरोपियन लोक भारताकडे आकृष्ट होत असत.

जवळजवळ १८० वर्षानंतर हा उतारा उद्धृत करण्यामागे एक विशिष्ट कारण आहे. येत्या शतकात भारतातल्या अपूर्व अशा नैसर्गिक साधनसंपत्तीचं व्यवस्थापन करण्यासाठी या उताऱ्यातला संदेश अतिशय उपयुक्त ठरू शकतो. गेल्या १८० वर्षांमध्ये या उताऱ्यात वर्णन केलेलं भारतीय खेडं नाहीसं

झालं आहे. ज्या जमिनी लागवडीखाली नव्हत्या, त्या जमिनींचं ब्रिटिशांनी राष्ट्रीयीकरण केलं. ज्या चराऊ जमिनी होत्या, त्या महसूल खात्याकडे गेल्या आणि ज्या जमिनींवर जंगलं होती, त्या वनखात्याच्या ताब्यात गेल्या.

स्वतंत्र भारताच्या नेत्यांनीही यामध्ये कुठलाही बदल केला नाही. त्याचा परिणाम असा झाला की भारतातली एक तृतीयांश जमीन अद्यापही नोकरशाहीच्या नियंत्रणाखाली आहे. महसूल आणि वनाधिकारी यांचा निर्णय या जमिनींच्याबाबतीत अंतिम मानला जातो. महसूल विभागाच्या नकाशांवर आज देशातल्या प्रत्येक खेड्याच्या सीमारेषा दाखविलेल्या आहेत, पण बहुतेक ठिकाणी, खेड्यातील अर्ध्याहून अधिक जमीन ही त्या जमिनीत कुठलाच रस नसणाऱ्या एखाद्या अधिकृत विभागाच्या मालकीची असू शकते. म्हणजेच, ज्या संस्थेचे निम्मे भांडवल (गावाचा कारभार पाहणाऱ्या पंचायतीचं अथवा नगरपालिकेचं उदाहरण घेतल्यास नैसर्गिक साधनसंपत्तीचं भांडवल) हे एखाद्या संस्थेपासून दूर असणाऱ्या परक्या व्यक्तीच्या मालकीचं आहे, अशा संस्थेचा कारभार चालविण्यासारखी ही परिस्थिती आहे. या परक्या व्यक्तीला त्या भांडवलाचा वापर करण्यात विशेष रस तर नसतोच; पण वापर करणाऱ्यांच्या ताब्यात ते भांडवल देण्याची त्या व्यक्तीची तयारीही नसते. त्यामुळेच अशी संस्था चालविणं हे काम अशक्य कोटीतलं असतं. टाटा किंवा बिर्लांसारखे समर्थ उद्योगपतीही आजपर्यंत याबाबतीत यशस्वी होऊ शकलेले नाहीत.

चंडीगढजवळ पडीक आणि निकृष्ट अशा शिवालिक टेकड्यांमध्ये एक छोटंसं गाव वसलं होतं, सुखोमाजरी त्याचं नाव. अगदी उजाड आणि कोरडं गाव. १९७४-७५ च्या सुमाराला मृद्संधारण तज्ज्ञ प्रियरत्न शर्मांनी या गावात प्रथम पाऊल ठेवलं. सुखना तळ्यात येऊन साठणारी प्रचंड माती आणि त्यामुळे बंद झालेला चंडीगढचा पाणीपुरवठा त्यांनी पाहिला. उघडे बोडके डोंगर आणि तशीच माणसं त्यांनी पाहिली. डोंगरउतार सुरकुतलेले होते, माती कोरडी, उजाड होती. शेळ्या-मेंढ्या उदंड होत्या आणि घरांमध्ये दारिद्र्य आणि रोडावलेल्या माणसांपलिकडे काही म्हणता काही नव्हतं.

आणि तरीही, आता सुखी झालेलं सुखोमाजरी हे गाव पुनर्निर्मित पर्यावरणामुळे झालेल्या लाभांसाठी प्राप्तिकर भरणारं भारतातलं पहिलं गाव होतं. ही गोष्ट आहे १९९० मधली. गवत, लाकूड आणि पाणी या साधनसंपत्तीपासून मिळालेल्या लाभांसाठी गावाने हा प्राप्तिकर भरला होता. हे सगळं घडलं, कारण हे गाव पुन्हा स्वायत्त गाव झालं. गावात पुन्हा गावाचा सीमारक्षक आला, पाणीसाठ्याची व्यवस्था आणि वाटप करणारा अधिक्षक आला, आणखीही पुष्कळ गोष्टी आल्या. लघु पाणलोटक्षेत्र विकासाच्या क्षेत्रात प्रथम काम करणारं गाव म्हणून सुखोमाजरीचं नाव आज सर्वत्र घेतलं जातं. या गावातल्या रहिवाशांनी सिंचनसाठ्यांच्या लाभक्षेत्रातली पूर्ण निकृष्ट अशी पडीक जमीन वाचविली आहे. १९८० च्या सुमारास पी. आर. मिश्रांच्या साहाय्याने गावात अनेक तळी बांधली गेली. यामुळे पीक उत्पादन जवळजवळ तिपटीने वाढलं. जंगलभागाच्या संरक्षणाला स्थानिक रहिवाशांनीच प्रारंभ केल्यामुळे गवत आणि चारा भरपूर प्रमाणात उपलब्ध होऊ लागला आहे. याचा परिणाम म्हणून दुग्धोत्पादन वाढलं आहे आणि या सगळ्यांचा सयुक्त परिणाम म्हणजे १९७९ ते १९८४

या फक्त पाच वर्षांच्या काळात घरटी वार्षिक उत्पन्नात कमीतकमी ५००० रुपयांची भर पडू लागली आहे. ही वस्तुस्थिती थक्क करणारी आहे. आत्मनिर्भरता आणि गावातील नैसर्गिक साधनसंपत्तीची सुधारणा यातून हा सर्व विकास साधला गेला आहे.

सुखोमाजरीच्या लोकांनी आपल्या पाणलोट क्षेत्रांचं संरक्षण करण्यामागे एक कारण आहे. जमिनींवरचा हक्क उपभोगण्याचं स्वातंत्र्य वनविभागाने त्यांना दिलं आहे. राज्याच्या वनविभागाबरोबर दीर्घकाळ झालेल्या वाटाघाटीनंतरच रहिवाशांना हा करार करून मिळाला. त्यापूर्वी वनखात्यातर्फे पडीक पाणलोट क्षेत्रातील गवत एखाद्या कंत्राटदाराला विकलं जात असे. नंतर हा कंत्राटदार तेच गवत अवाजवी किमतीने गावकऱ्यांना विकत असे. विकासकार्याला सुरुवात झाल्यानंतर, 'आम्ही पाणलोट क्षेत्राचं संरक्षण करीत असल्यामुळे वाढलेल्या गवत-झाडोऱ्याचे लाभही कंत्राटदाराला न मिळता आम्हाला मिळायला हवेत', असा दावा स्थानिक जनतेने केला. मग गावाच्या सहकारी संस्थेला गवताचा हक्क देण्याला वनविभाग तयार झाला. फक्त गावकऱ्यांनी पाणलोट क्षेत्राच्या संरक्षणाला सुरुवात करण्यापूर्वी वनखात्याला जेवढं सरासरी वार्षिक उत्पन्न मिळत होतं, तेवढी रॉयल्टी या सहकारी संस्थेने भरायला हवी, एवढीच अट वनविभागाने घातली.

आता गावकरी या सहकारी संस्थेत-हिल रिसोअर्स सोसायटीमध्ये पाणलोट क्षेत्रातील गवत कापण्यासाठी काही किरकोळ रक्कम भरतात. वनखात्याची रॉयल्टी देण्यासाठी यातली काही रक्कम वापरली जाते, तर उरलेली रक्कम गावासाठी सामूहिक- नैसर्गिक साधनसंपत्ती निर्माण करण्यासाठी वापरली जाते. संरक्षणामुळे पाणलोटक्षेत्रातील गवताचे उत्पादन कित्येक पटींनी वाढले आहे. वनविभागाचे आश्वासन (जरी ते सशर्त असले तरी) नसते तर सुखोमाजरीचा प्रयोग एका रात्रीत उद्ध्वस्त झाला असता. या संपूर्ण प्रयोगात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली, ती गावपातळीवरील संस्थेने. पाणलोट क्षेत्र विकासाच्या हेतूनेच सुखोमाजरीमध्ये या संस्थेची स्थापना झाली आहे. या हिल रिसोअर्स मॅनेजमेंट सोसायटीमध्ये गावातील प्रत्येक घरातला एक सभासद आहे. यामुळे ग्रामस्थांना त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी, स्थानिक पर्यावरणाचे व्यवस्थापन करण्यासाठी आणि सभासदांमध्ये शिस्त राखण्यासाठी एक अनुकूल असे व्यासपीठ मिळाले आहे. कुठल्याही घरची जनावरे पाणलोट क्षेत्रात चरणार नाहीत, याकडे संस्था काटेकोर लक्ष पुरविते. त्याचप्रमाणे पाणी, लाकूड आणि गवत या साधनसंपत्तीचं ग्रामस्थांमध्ये सुयोग्य वाटप होण्यासाठीही संस्थेने आराखडा तयार केला आहे. आज जलाशयांचं लाभक्षेत्र हिरवंगार झालं आहे आणि गाव समृद्ध झाल्यामुळे गंभीर दुष्काळांचा सामना करण्याची ताकद त्याला मिळाली आहे.

गावाचं सामूहिक जंगल, चराऊ जमिनी आणि जलाशयांची उत्पादनक्षमता वाढविण्यासाठी गावाला पैसा वापरता येईल. अन्नधान्य, इंधन, चारा, लाकूड आणि विकासासाठी लागणारी आर्थिक मदत यांच्या सुयोग्य आणि नियंत्रित पुरवठ्यातून सामूहिक जमिनी स्थानिक रहिवाशांची आर्थिक स्थिती उंचावण्यास मदत करतील.

या उत्पन्नातील काही भाग जर ग्रामस्थ वाचवू शकले, तर नैसर्गिक साधनसंपत्तीच्या विकासात तो पैसा ते पुन्हा गुंतवू शकतात. याप्रकारे मिश्रा ज्याला

'सायक्लिकल डेव्हलपमेंट' म्हणतात, तो विकास आपल्याला पाहता येईल. सामूहिक नैसर्गिक साधनसंपत्तीचा विकास, त्याद्वारे गावातील साधनांचा विकास आणि त्यातून गावकऱ्यांना मिळणाऱ्या उत्पन्नातील काही भागाची सामूहिक साधनसंपत्तीच्या विकासासाठी पुन्हा गुंतवणूक अशी ही विकासाची वर्तुळाकार प्रक्रिया आहे. सुखोमाजरीच्या उदाहरणात, सामूहिक साधनसंपत्तीच्या विकासामुळे सिंचनासाठी मुबलक पाणी तसेच गवत उपलब्ध झाल्यामुळे कुरण, शेती आणि पाळीव जनावरे यांसारख्या खाजगी साधनसंपत्तीची उत्पादनक्षमता वाढली आहे. याचा परिणाम म्हणून सामूहिक जमिनींच्या रक्षणाची वृत्ती ग्रामस्थांमध्ये वाढीस लागली आहे. गावाबाहेरचा एखादा माणूस आपली जनावरं फुकटात चरायला नेण्याच्या उद्देशाने गावात घुसू लागला तर वेशीवरचा रक्षक त्याला ताबडतोब प्रतिबंध करतो. त्याचवेळी नैसर्गिक संपत्तीचा शिस्तबद्ध वापर करण्याचं बंधन सुखोमाजरीच्या रहिवाशांवरही घातलं गेलं आहे. थोडक्यात, सर्व फुकट्या लोकांचा सुखोमाजरीने कायमचा बंदोबस्त केला आहे. या नियमात शासकीय यंत्रणेपासून सामान्य व्यक्तीपर्यंत सर्वांचा सारखा समावेश आहे.


सुखोमाजरीने आणखी एक चांगला आदर्श आपल्यापुढे ठेवला आहे. हा आदर्श निर्माण करण्याचं सामर्थ्य वेगवेगळ्या विभागात काम करणाऱ्या नोकरशाहीमध्ये नाही, हे निश्चित. बहुतांशी, आणि बहुतेक उदाहरणात पर्यावरणाच्या पुनर्निर्मितीचा प्रारंभबिंदू झाडे नसून पाणी आहे हे सुखोमाजरीने आपल्याला शिकविलं आहे. जलसंचय करणारी एखादी छोटीशी व्यवस्था एकदा उभारली गेली आणि या पाण्याच्या वाटपाची समांतर यंत्रणा विकसित केली गेली तर या जलव्यवस्थेच्या लाभनियंत्रित चराई आणि गवत आणि वृक्षलागवडीद्वारे क्षेत्राचं संरक्षण करण्याचे फायदे ग्रामस्थांच्या ताबडतोब लक्षात येतील.

एका गोष्टीतूनच हळूहळू दुसरी गोष्ट मार्गी लागणार आहे आणि गावाची पूर्ण पर्यावरणव्यवस्था राखण्यासाठी ग्रामस्थ कार्यरत होतील.

पण हे सगळं आपल्या शासनाला कसं शक्य आहे? ज्यांना झाडांमध्ये रस आहे, ते पाण्याकडे दुर्लक्ष करतात आणि ज्यांना पाण्यात रस आहे, त्यांना झाडांबद्दल काडीभरही माहिती नाही. त्यामुळे आपण ग्रामस्थांपासून या देशीच्या नागरिकांपासूनच सुरुवात करूया. जमीनदार आणि जलाशयांचे बडे मालक याबाबतीत उपयोगाचे नाहीत.

● ●

*(सौजन्यः वनराई, दिवाळी १९९३)*



# राळेगण सिद्धी
# लोकसहभागातून पाणी नियोजन

आप्पासाहेब घाडगे

महाराष्ट्रात यावर्षी संपूर्ण पावसाळ्यात पुरेसा पाऊस न झाल्याने महाराष्ट्राचा बहुतांशी भाग दुष्काळाच्या छायेत आहे. प्रत्येक वर्षी मार्च, एप्रिल महिन्यात होणारी पाण्यासाठीची ओरड आणि वणवण आधीच चालू झाली आहे. अपुऱ्या पावसाअभावी यंदा रब्बीचे पीक नेहमीपेक्षा १० ते १५ टक्के कमी क्षेत्रावर घेतले आहे आणि त्यातच भर म्हणून पिकासाठी देण्यात येणारे पाणी कमी पडल्यामुळे पिके जळून जाण्याचा धोका निर्माण झाला आहे. पाणी आणि शेती तज्ज्ञांच्या अंदाजानुसार महाराष्ट्रात यापुढेही थोड्याफार फरकाने हीच परिस्थिती राहील. कारण आपल्याकडे पडणाऱ्या पावसाचे पाणी जमिनीवर अडवून मुरवण्याचे व उपलब्ध होणारे पाणी वापराचे योग्य नियोजन नाही. एकूण शेवटी काय तर, पाऊस आला काय किंवा नाही आला काय नियोजन करणाऱ्या कार्यक्षम यंत्रणेचा अभाव आणि सिंचनाची पुरेशी उपलब्धता नसल्याने महाराष्ट्रातील जनतेचे भोग सुटणार नाहीत.

महाराष्ट्रात आजपर्यंत पाणी अडवण्यासाठी बांधण्यात आलेल्या धरणांमुळे उपलब्ध होणाऱ्या पाण्यातून फक्त १४% क्षेत्र सिंचन क्षमतेखाली आले आहे. ही सिंचन क्षमता सर्व प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर जास्तीत जास्त २०% क्षेत्रापर्यंत जाणार आहे. बाकी सर्व क्षेत्र हे पाण्यासाठी पडणाऱ्या अनियमित व लहरी पावसावरच अवलंबून आहे. त्यातच भर म्हणून सद्यस्थितीला मोठमोठ्या धरणातील पाणी हे शहरातील वाढती लोकसंख्या, कारखानदारी यांच्यासाठी राखून ठेवावे लागत आहे. त्यामुळे आपोआपच त्या पाण्याचा शेतीसाठी उपयोग करण्यावर मर्यादा येत आहेत. उपलब्ध होणाऱ्या एकूण पाण्याच्या जवळजवळ ७०% पाणी हे फक्त ४% क्षेत्रावरील ऊसाला दिले जात आहे. तेही अतिशय बिनडोक पध्दतीने. आपला शेतकरी ऊसाला पाणी देताना सारा वाफा पाण्याने तुडुंब भरेपर्यंत पाणी मोकळे सोडून देतो, त्यामुळे शेतकरी पिकाला पाणी देण्याऐवजी जमिनीलाच जास्त पाणी देत आहे, अशी परिस्थिती होते. मिळणाऱ्या पाण्यातही खूप मोठी तफावत व विषमता आहे. श्रीमंत लाभधारक पैशाच्या व राजकीय वरदहस्ताच्या जोरावर जास्तीत जास्त प्रमाणात पाणी उपलब्ध करून घेत आहे व त्याचा अमर्याद वापर करत आहे. त्यासाठी लांब अंतराच्या पाईप लाईन, जमिनीच्या पोटातील २५० ते ३०० फुटापर्यंतच्या कूपनलिका, त्यावर मोठ्या अश्वशक्तीचे वीजपंप यांचा वापर करून मूठभर लोकच आणखीन श्रीमंत होताना दिसत आहेत. म्हणूनच थोड्या दिवसांनी तयार होणारी ही मर्यादीत हिरवळीची बेटे व बाकी सर्वत्र दुष्काळ, ही परिस्थिती रोखणे महत्त्वाचे आहे. नाहीतर भूधारक असणारे शेतकरी व त्यांचे कुटुंब केव्हा या हिरवळीच्या बेटावरचे मजूर झाले, तेच समजायचे नाही. म्हणूनच आपल्याला पाण्याची समस्या आणि वारंवार येणारे दुष्काळ टाळण्यासाठी स्थानिक पातळीवर व बाहेरून उपलब्ध होणारे पाणी याच्या योग्य नियोजनातून व्यवस्थापन करणे

आवश्यक आहे. या पाणी व्यवस्थानासाठी फक्त डोक्याला हात लावून बसून राहण्याऐवजी या प्रश्नावर मात कशी करता येईल, यासाठीचा विचार काही गावात केला गेला आहे. आणि त्या विचाराला कृतीतही आणले गेले आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ती उदाहरणे खूप लांब नसून आपल्याच आजूबाजूला आहेत. त्यामध्ये अहमदनगर जिल्ह्यातील राळेगणसिध्दी व हिवरेबाजार, औरंगाबाद जिल्ह्यातील आडगाव, कोकणातील विले इ. गावात दुष्काळावर मात करण्यासाठी गावातील ग्रामस्थांच्या सहभागातून खूप चांगले प्रयत्न झाले आहेत. पर्यावरणाचे संवर्धनात्मक व्यवस्थापन आणि पाण्याचा योग्य वापर व नियोजन या मूलमंत्रातून त्यांनी दुष्काळावर मात केली आहे.

यापैकी अहमदनगर जिल्ह्यातील 'राळेगणसिध्दी' हे गाव पुणे शहरापासून ७० किमी वर आहे. २५ वर्षापूर्वी म्हणजे १९७५ च्या आसपास या गावातही अन्य कोरडवाहू शेती असलेल्या गावाप्रमाणेच बकाल (गंभीर) स्थिती होती. गावातील ५० ते ६० एकर क्षेत्र सोडले तर बाकी सर्व क्षेत्रात पाण्याचा भयानक दुष्काळ होता. पिढ्यान् पिढ्या चालत आलेल्या गरिबीमुळे आईवडिलांना आपल्या मुलांनी शिक्षण घेण्यापेक्षा काम करणेच महत्त्वाचे वाटायचे. कारण त्यातून त्यांच्या फुटक्या संसाराला थोडाफार हातभार लागायचा. गावातल्या तरूणांना रोजगारासाठी पुणे-मुंबई या शहराची वाट धरायला लागायची आणि तेथेही हमाली करणे या कामाशिवाय त्यांना पर्याय नव्हता. इतर लोकांना रोजगार हमीच्या माध्यमातून पोटापुरती मजुरी मिळायची. कुटुंबात माणसे जास्त व संपत्ती कमी त्यामुळे वारंवार भांडणतंटा, मानसिक शांती नाही, आजारांचे वाढते प्रमाण, संपूर्ण गावावर गावठी दारूच्या नशेचा अंमल, दारूच्या भट्ट्यांची वाढती संख्या व त्यातूनच फोफावलेली सावकारशाही अशी नित्याची परिस्थिती होती. शिक्षणाचीही तीच स्थिती होती. एकाच खोलीत चार वर्ग, समाजातील पराकोटीची अस्पृश्यता, हरिजन लोकांनी सामुदायिक शेतीसाठी घेतलेले २२.५ हजार रूपयांचे कर्ज, आपाआपसातील भांडणातून शेती पडीक राहून त्यांचे जवळजवळ ७५ ते ८० हजाराचे कर्जाचे ओझे झाले होते. अशा भयानक अंधःकारात त्या गावात अण्णा हजारेंच्या रूपाने दिसलेल्या प्रकाश किरणाने संपूर्ण गावालाच विकासाचा मार्ग दाखविला. अशा टोकाच्या परिस्थितीत अण्णांनी भावी काळात भरघोस दाण्यांनी भरलेल्या कणसाचे स्वप्न पाहून सर्वात प्रथम जमिनीत गाडून घेणाऱ्या एक बियाची भूमिका बजावली.


राळेगणसिध्दी या ९७१.४४ हेक्टर (२४०९ एकर) क्षेत्र असणाऱ्या स्वतःच्या गावात अण्णांनी विकासाच्या कामांना १९७५ साली सुरुवात केली. गावामधील लोकांचा मूळ भाकरीचा प्रश्न व माणसांचे आचारविचार शुद्ध करून त्यांना व्यसनापासून परावृत्त करण्यासाठी त्यांनी स्वतःपासून सुरुवात केली. संपूर्ण गावचा सामाजिक, आर्थिक कायापालट करण्यासाठी अण्णांनी गावचे श्रध्दास्थान असणाऱ्या यादवबाबा मंदिराच्या जीर्णोध्दारातून काम चालू केले. या कामासाठी एकत्र आलेली गावची शक्ती योग्य मार्गदर्शन करून नशाबंदीसाठी कामाला लावली. त्यातून गावात दारूबंदी झाली. त्यानंतर सामुदायिक शेतीचा प्रयोग सुरू करून हरिजनांना कर्जमुक्त केले. संपूर्ण गावचा विकास करायचा असेल तर गावच्या शिवारातील शेतीचा विकास होणे

महत्त्वाचे होते आणि शेतीचा विकास होण्यासाठी सर्वात महत्वाची गरज होती ती पाण्याची. राळेगणमध्ये पडणारा सरासरी पाऊस १२ ते १५ इंच इतका, त्यातूनही उपलब्ध होणारे बरेचसे पाणी वाहून जात होते. या गोष्टींवर पूर्ण विचार करून अण्णांनी गावकऱ्यांच्या सहभागातून व शासनाच्या मदतीने वाहणारे पाणी अडविण्यासाठी आणि साठणारे पाणी जमिनीत मुरविण्यासाठीचे काम हाती घेतले. त्यातूनच त्यांनी राळेगणच्या संपूर्ण क्षेत्रामध्ये डोंगरांच्या माथ्यापासून पायथ्यापर्यंत प्रत्येक ठिकाणी, मग ती जमीन सरकारी मालकीची असो वा खाजगी मालकीची, कामास सुरुवात केली.


## कुरण विकास व वृक्षरोपण

अण्णांनी फक्त लोकांना तत्त्वज्ञान न सांगता लोकांच्या भाकरीचा प्रश्न सोडविण्याच्या प्रयत्नासाठी वृक्षरोपण करण्यासाठी स्वतःची १० एकर जमीन दान केली. उघडे बाडके डोंगर, टेकड्या गवताच्या आच्छादनाखाली येण्यासाठी गावात चराईबंदी केली. याठिकाणी महत्त्वाची गोष्ट म्हणजे अण्णांनी सर्व गावकऱ्यांच्या मदतीने गावातील चराऊ क्षेत्राची विभागणी चार भागात करून प्रथम वर्षी एका भागात चराईबंदी व तीन भाग चराईसाठी खुले, नंतर पुढील वर्षी दोन भागात चराई बंदी, दोन भागात चराईसाठी खुले अशा पद्धतीने संपूर्ण क्षेत्रावर चराईबंदी केली.


प्रथम वर्ष





द्वितीय वर्ष




तृतीय वर्ष




चौथे वर्ष




वरील प्रकारच्या प्रयोगामुळे लोकांना स्वतःचे पशुधन आहे तसे सांभाळता आले. यामध्ये सर्वानुमते जनावरांना चारा कापून घालण्याचे ठरले होते. त्यामुळे मोकाट जनावरे सुटून चाऱ्याचा होणारा नाश कमी झाला. गवत कापणीमुळे व गवत जाळण्यामुळे होणारे तोटे कमी झाले. आण्णांनी गावात श्रमदानातून नर्सरी तयार करून लागवडीसाठी रोपे तयार केली. राळेगणच्या २४०९ एकर क्षेत्रावर नव्याने जवळजवळ ४ लाख झाडांची लागवड करण्यात आली. चराईबंदी प्रमाणेच गावात एकमताने कुऱ्हाडबंदीचा सुद्धा निर्णय घेण्यात आला होता. इंधन म्हणून लागणारा लाकूडफाटा फक्त झाडांच्या वाळलेल्या फांद्या, इतर फांद्या यातून उपलब्ध केला जात होता. त्याचप्रमाणे इंधनाचा प्रश्न सोडवण्यासाठी गोबर गॅस व बायोगॅससारख्या संयंत्राचाही मोठ्या प्रमाणावर वापर केला जात होता. इमारतीसाठी व इतर आवश्यक कामासाठी लागणारे लाकूड तोडण्यास इतर १० झाडे लावून त्यांच्या संगोपनाची हमी दिल्यास ग्रामसभेची

परवानगी होती. या कुरणविकास व वृक्षरोपणाच्या कामी शासनाच्या कृषीपंढरी योजनेखाली खूप महत्त्वाचे काम झाले. कुरण विकासाबरोबरच खाजगी जमिनीवर सपाटीकरण, डोंगर उतारावर सलग समपातळी चर, जास्तीच्या उतारावर एक आड एक चर, अशी कामे करून त्यावर झाडांची लागवड, जैविक बांधामध्ये घायपाताची लागवड, घळी अडवणे अशी कामे घेतघेत मुख्य नाल्यापर्यंत जागोजाग पाणी अडवून जमिनीची धूप थांबविण्याचे व मोठ्या प्रमाणात मृद संधारणाचे काम झाले.

## नालाबंडिंग व बांधबंधारे

राळेगणच्या पूर्व-उत्तरेला १९७२ साली शासनामार्फत बांधलेला पाझर तलाव होता; परंतु या तलावाचा पाया खोल नसल्यामुळे आणि धरणाची माती दाबून बसवलेली नसल्यामुळे (हॉर्टिंगझोन) पावसाळ्यानंतर एका महिन्याभरातच संपूर्ण पाझर तलाव रिकामा होत असे. म्हणून १९८३ साली अण्णांनी शासनाच्या रोजगार हमी व लघुपाटबंधारे कार्यक्रमामार्फत तलावाच्या वरच्या अंगाने नव्याने चर खोदून काळी माती दाबून भरण्याचे व धरणाच्या भिंतीवर नव्याने मातीचे चर देऊन तलावात पाणी साठून राहण्याचा कालावधी वाढविला. त्यामुळे तलावाचे जास्तीत जास्त पाणी जमिनीमध्ये जिरू लागले. त्यामुळे हे पाणी बाजूच्या विहिरींना मिळू लागले. या कामासाठी टप्प्याटप्प्याने शासनाने व टाटा रिलिफ कमिटीने ९ लाख रूपयांचा खर्च केला. पाझर तलावापासून पुढे वाहत येणाऱ्या ओढ्यावरती जागोजाग पाणी अडवण्यासाठी ४४ नालाबंडिंग, ५ चेक डॅम, ३ भूमिगत बंधारे बांधण्यात आले. यामध्ये ज्याप्रमाणे पाणी अडविण्यासाठी साईट उपलब्ध होईल त्याप्रमाणे तेथे तांत्रिकदृष्ट्या योग्य असा बंधारा घालण्यात आला. त्यात गॅबियन बंधारे, नाला बंडिंग, भूमिगत बंधारे, दगडी बंधारे, वसंत बंधारे इ. चा उपयोग करून घेण्यात आला.

पाणलोट क्षेत्रविकासाअंतर्गत झालेल्या कामांमुळे गावाच्या शिवारातील पाण्याची उपलब्धता वाढली. त्यानंतर राळेगणमध्ये पाणी उपलब्ध करण्याकडे ज्याप्रमाणे लक्ष केंद्रित केले गेले त्याचप्रमाणे उपलब्ध होणाऱ्या पाण्याच्या वापराकडेही लक्ष देण्यात आले. गावातील सर्व शेतकऱ्यांना उपलब्ध होणाऱ्या पाण्याचा वाटा मिळावा म्हणून गावच्या शिवारात यादवबाबा सहकारी पाणी पुरवठा संस्था, श्री संत तुकाराम स.पा.स. , गौतम स.पा.सं. , श्री. संत ज्ञानेश्वर स.पा.सं. आणि पद्मावती स.पा.सं. चालू करण्यात आल्या. राळेगणमध्ये आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे ज्याप्रमाणे स्थानिक क्षेत्रावर उपलब्ध होणारे पाणी योग्य वाटपातून वापरले आहे, त्याचप्रमाणे १९८६ मध्ये राळेगणच्या दक्षिणेला ३ कि.मी. वरून वाहणाऱ्या कुकडी कॅनॉलपासून कृष्णा सहकारी पाणीपुरवठा संस्था स्थापन करून जवळजवळ ११० सभासदांना त्याचा फायदा होणारी योजना सुद्धा करण्यात आली. वरील प्रकारच्या उपाययोजनेमुळे राळेगणमध्ये पाणी वाटप आणि वापराबद्दल समानता दिसून येते. त्याचप्रमाणे स्थानिक क्षेत्रावर उपलब्ध होणारे पाणी आणि बाहेरून उपलब्ध होणारे पाणी यांची योग्य सांगड घालून आर्थिक समानतेच्या दृष्टीने झालेले प्रयत्नही दिसून येतात. पाण्याचे नियोजन करताना पिकांचे नियोजन पण अतिशय काळजीपूर्वक केलेले दिसते. पिकांना पाणी देण्यासाठी समपातळीत पाणी देण्याची पद्धती, ठिबक व तुषार

सिंचनाचा वापर केलेला दिसून येतो. त्याच बरोबरीने कंपोस्ट खताच्या वापरावर जास्त भर दिला आहे. त्यामुळे जमिनीची पाणी धारण क्षमता पण वाढलेली आहे. जवळजवळ १२०० एकर क्षेत्र पीक लागवडीखाली आले आहे. आजमितीला राळेगणमधून विक्रीसाठी कांदा बंगलोरला पाठविला जात आहे. राळेगणच्या शिवारात घेतल्या जाणाऱ्या पिकांपासून प्रत्येकी ५० ते ६० रूपयांचे उत्पादन घेतले जात आहे.

गावातील आर्थिक सुधारणेसाठी व गावातच रोजगार उत्पन्न होण्यासाठी राळेगणमध्ये शेतीपूरक व्यवसायालाही महत्त्वाचे स्थान देऊन गावात दुग्ध व्यवसाय, महिला उद्योग केंद्र, धान्य गोदाम, गांडुळखत प्रकल्प, बचत गट इ. ची स्थापना करून वरील उपक्रम यशस्वीरित्या राबविले आहेत.

त्याचप्रमाणे गावातून बाहेरगावी विक्रीसाठी जाणारा शेतीमाळ, दूध इ. ची ने आण करणे सोयीचे व्हावे म्हणून पद्मावती पाणीपुरवठा संस्थेच्या नावे सामुदायिक टेम्पो खरेदी केला आहे. त्यामुळे गावाची विविध कारणांसाठी भाड्यापोटी जाणारी रक्कम वाचली आहे. या रकमेतून गावातील बालवाडीला आर्थिक मदत देता येते. या सर्व उपक्रमांचा एकत्रित परिणाम म्हणूनच राळेगणचे १९७५ साली असणारे दरडोई उत्पन्न रूपये २७० वरून १९८६ साली २२७५/- पर्यंत वाढले. ही सर्व प्रगती १० वर्षातील आहे. आजमितीस या उत्पन्नामध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या उपक्रमांमुळे कित्येक पटीत वाढच होत आहे.

राळेगण सिध्दीमध्ये आपण आतापर्यंत जे काही पाहण्यासारखं होते ते पाहिले; परंतु त्याबरोबर आणखीही येथे घेण्यासारखं खूप आहे. राळेगणमध्ये व्यसनमुक्तीतून गावच्या विकासाकडे जाताना जे सामाजिक बदल झाले आहेत, ते पण खूप महत्त्वाचे आहेत. यात संपूर्ण गावातील व्यसनमुक्ती, सामुदायिक विवाहपध्दती, हुंडाबंदी, अस्पृश्यता, अंधश्रध्दा निवारण, श्रमदान प्रथा, सहकार्याची भावना व एकता, सामुदायिक शेती, पाणी वाटपाच्या सहकारी संस्था, सामुदायिक विहिरी, गावकऱ्यांनी श्रमदानातून उभी केलेली ११ लाख रूपयांची होस्टेलची (वसतिगृह) इमारत, गावात साजरा करण्यात येणारा आगळावेगळा बैलपोळा ज्यामध्ये दलितांच्या बैलांना पहिला मान असतो. असे कित्येक चांगले उपक्रम येथे झाले आहेत.

राळेगण सिध्दीमध्ये ज्याप्रमाणे कार्यकर्ते, सर्व ग्रामस्थ व शासनाचे विविध विकास कार्यक्रमांचे विभाग यांच्या सहकार्यातून गावच्या विकासाचे स्वप्न साकार झाले आहे. त्याचप्रमाणे आपल्याकडील सर्व गावांमध्येही असे एकजुटीने प्रयत्न करून शासनाच्या योजना व लोकसहभाग यांच्या माध्यमातून गावच्या शिवारातील माती व पाणी यांचे संवर्धन शास्त्रीय पध्दतीने करून जास्तीत जास्त प्रमाणात पाणी उपलब्ध केले पाहिजे. गावामध्ये पाणी उपलब्ध झाल्यानंतर त्याचे योग्य नियोजनातून वाटप करून आर्थिक विकासाबरोबरच सामाजिक विकास पण साधला पाहिजे. अशा क्रांतिकारी कार्यक्रमातूनच आपण आपल्याकडील पाण्याचे, पुरेशा अन्नधान्याचे, रोजगार कार्यक्रमांचे, शुध्द आचार-विचारांचे, सामाजिक एकोप्याचे, आर्थिक विषमतेचे दुष्काळ दुर्मिळ केले पाहिजेत.

● ●

# महाराष्ट्रातील पिण्याच्या पाण्याची समस्या

एच. एम. देसरडा

*१९९२ च्या उन्हाळ्यात जवळपास ३० हजार खेडी व काही लहानमोठ्या शहरांना कमी-अधिक प्रमाणात पिण्याच्या पाण्याच्या समस्येला तोंड द्यावे लागले. शासनाने तातडीच्या उपाययोजना करण्यासाठी शेकडो कोटी रूपये खर्च केले. परत यावर्षी देखील हा प्रश्न आ वासून उभा आहे. विधानसभेच्या अधिवेशनाचा कालावधी कमी करून या प्रश्नाकडे लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे. यावरून परिस्थितीचे गांभीर्य सूचित होते.*

**पि**ण्याच्या पाण्याचा प्रश्न जवळपास दरवर्षीच उभा राहावा याचे कारण काय? आजतागायत झालेल्या योजनांतून नेमके काय घडले? लोकसंख्या वाढते, सध्याचे साठे व उद्भव (सोर्सेस) कमी पडतात, अशी एक सबब जी सतत सांगण्यात येते, ती कितपत बरोबर आहे?

आतापर्यंतच्या योजनांवरील खर्चाच्या स्थितीवरून एक गोष्ट लक्षात यावयास हवी की या पाणीपुरवठा योजनांमध्ये, म्हणजे त्यांची संकल्पना, अंमलबजावणी, देखभाल, दुरूस्ती व लोकांच्या अपेक्षा व गरजा यात काही मूलभूत त्रुटी असाव्यात. अन्यथा राज्यभर तीच कथा व कैफियत का म्हणून वर्षानुवर्षे कायम राहिली असती?

## खेडी व शहरे यांना वेगळा न्याय

या संदर्भात एका वस्तुस्थितीचा निर्देश करणे क्रमप्राप्त होईल. शहरात पाणी पुरवठा असो की अन्य कुठलीही नागरी सेवा-सुविधा असो, तिच्या दैनंदिन व्यवस्थापन व वितरणात लाभधारकाने सहभागी व्हावे, अशी अपेक्षा नसते; तशी गरज पडत नाही. व्यावसायिक पद्धतीने नोकरशाहीमार्फत त्याचे व्यवस्थापन केले जाते. अर्थात, स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजेच पालिका-महापालिका यांच्याद्वारे सेवा-सुविधा पुरविण्याचा अल्पसा का होईना, खर्च वसूल केला जातो. त्यात गैरप्रकार, अनागोंदी, अकार्यक्षमता नसते, असे म्हणता येणार नाही. मात्र हे गाडे चालू राहते. एक तर शहरात एक दिवस पाणी अगर वीज नसली तर बोभाटा होतो. वृत्तपत्रांत लगेच बातम्या झळकतात. लोकप्रतिनिधी-अधिकारी पळापळ करून पुरवठा पूर्ववत करण्याची तसदी घेतात!

दुसरे, महाराष्ट्रात बहुसंख्य शहरांसाठी आता पाटबंधारे प्रकल्पांचे पाणी शहरे व औद्योगिक वसाहतींसाठी राखून ठेवले जाते. खरे तर बहुसंख्य मोठे व मध्यम प्रकल्प हे सिंचन प्रकल्प राहिले नसून शहरांसाठी 'जलकुंभ' बनले आहेत. एका तऱ्हेने सिंचन खात्याला आपली अकार्यक्षमता, दुष्कृत्ये लपवायला हे फार सोयीचे झाले आहे. पाहुण्याने साप मारावा तसे हे त्यांच्या पथ्यावर पडले आहे. पुन्हा, पाणी पाजण्याचे पुण्यकर्म करतो असे सांगता येते.

तिसरी बाब म्हणजे शहराची गरज भागली, मग खेड्याचे काहीही झाले तरी चालते. एवढेच नव्हे तर, खेड्याजवळील जलप्रवाहाचे - नदीचे पाणी शहरात आणायचे. मग पाठोपाठ पाण्यामागे पळत लोकही शहरी झोपडपट्ट्यांत येऊन ठेपतात! निदान पाण्यासाठी वणवण भटकावे लागत नाही. कचरा, कागद वेचून असो की बिगारी काम करून असो, अन्य अवैध धंदे (दारू,

मटका, सट्टा, वेश्यालये इ.) करून असो, शेती कामापेक्षा थोडे अधिक व कमी कष्टाने दोन पैसे मिळतात. खेड्यापेक्षा जास्त राजरोस व बरकतीने शहरात हे कामधंदे करता येतात. तात्पर्य, खेड्यातील पाणी पळवायचे, शेती व जीवन उद्ध्वस्त करायचे आणि शेवटी लोक शहराकडे, असे चक्र सुरू झाले आहे. मनुष्यनिर्मित दुष्काळ व स्थलांतर ही नित्याची बाब बनली आहे.

आज मितीला महाराष्ट्राची नागरी लोकसंख्या चाळीस टक्के झाली आहे. मुंबई तर आहेच; पण ठाणे, पुणे, नाशिक आदी जिल्ह्यातील शहरांत राहणारी लोकसंख्या आजच निम्म्यापेक्षा अधिक आहे. २००० साल उलटण्याआधी महाराष्ट्रात पाच कोटी लोक 'शहरांत' राहणारे असतील. खरे तर हे नागरीकरण नसून भयानक अशा स्वरूपाचे झोपडपट्टीकरण (स्लमायझेशन) आहे, हे सर्वश्रुत आहे.

मुंबईत ४० टक्के लोकांना नळ व संडासच्या सोयी नाहीत. एवढेच काय, तानसा धरण होऊन तब्बल शंभर वर्षे लोटली. मात्र तेथील आदिवासींसाठी या १०० वर्षांत पाणीपुरवठ्याची सोय केलेली नाही.

मुंबईसारख्या शहरांना तरी काही अनुकूल नैसर्गिक अशी जलाशये, पाणीसाठे परिसरात (अर्थात १००-१५० कि.मी. वर) करता आले. मात्र बहुसंख्य शहरांत कोट्यावधी रूपयांच्या योजना करूनही पाण्याचा प्रश्न सतत त्रस्त करीत असतो. एवढे खरे की शासनाला म्हणजेच समाजाला कितीही किंमत पडली, पाणी कितीही दूषित व बहुसंख्य लोकांना अपुऱ्या प्रमाणात मिळत असले तरी शहरांत अगदीच मिळत नाही असे क्वचित होते. विशेषतः या शहरी पाणीपुरवठ्याच्या योजनांसाठी हजारो कोटी रूपये भांडवली खर्च केला जातो. त्याखेरीज त्यांच्या देखभाल व दुरूस्तीसाठी मोठी यंत्रणा राखली जाते व अन्य खर्च केला जातो.

## किमान गरज कार्यक्रमांतर्गत तरतूद

खेड्यांची स्थिती याच्या अगदी उलट आहे. पाचव्या योजनेत किमान गरजांचा कार्यक्रम मांडण्यात आला. त्यात खेड्यासाठी पिण्याच्या पाण्याच्या पुरवठ्याची तरतूद करण्यात आली. नवीन तीस कलमी कार्यक्रमात याचा अग्रक्रमाने समावेश करण्यात आला. महाराष्ट्रात १९७२ च्या दुष्काळात ग्रामीण भागात शासनाने पाणी-पुरवठा सुरू केला. विशेषतः टँकरद्वारे. अर्थात तत्पूर्वी टंचाई निवारण संहितेखाली काही तरतूद केली जात असे. अद्यापही त्याचा आधार घेतला जातोच. १९८० नंतर पंचवार्षिक योजनेअंतर्गत पाणी-पुरवठ्यासाठी मोठी तरतूद करण्यात येऊ लागली. १९८६ साली तर युद्धपातळीवर हा प्रश्न हाताळण्यासाठी राष्ट्रीय तंत्रविज्ञान अभियान (टेक्नॉलॉजी मिशन) कायम करण्यात आले. हे तंत्रज्ञान अभियान भूगर्भातील पाण्याच्या उपलब्धतेचा शास्त्रीयदृष्ट्या विचार करून पेयजल व्यवस्थापन करते.

ग्रामीण पाणी पुरवठा (ग्रा.पा.पु.) तीन प्रकारे केला जातो.

१. उघड्या अगर साध्या विहिरी,

२. विंधन विहिरी, आणि

३. नळ योजना.

ग्रा.पा.पु.ची योजना संकल्पनात्मकदृष्ट्या किमान खर्च (लीस्ट कॉस्ट ॲप्रोच) यावर आधारलेली आहे. म्हणजेच प्रथम साध्या विहिरीतून व ते शक्य नसल्यास विंधन (बोअर) विहिरींद्वारे पाणी-पुरवठा करण्यात यावा. जेथे या दोन्ही मार्गांनी पाणीपुरवठा शक्य नसेल तेथेच नळांद्वारे पाणी-पुरवठा (पाईप वॉटर सप्लाय), म्हणजेच बऱ्याच अंतरावरून पाणी आणले जावे, हा समज आहे.

१९७२ नंतर राज्यात विंधन विहिरींचा फार व्यापक कार्यक्रम हाती घेण्यात आला. गेल्या दोन दशकांत

दीड लक्ष विंधन विहिरी खोदल्या गेल्या. त्यावर सर्वसाधारणतः हातपंप व बऱ्याच ठिकाणी वीज-पंप (सुमारे १५,०००) बसविण्यात आले. यांपैकी ७० टक्के विहिरी यशस्वी श्रेणीत मोडतात, असा भूजलसंवर्धन यंत्रणेचा दावा आहे.

सांप्रत, ग्रां.पा.पु. तीन स्वतंत्र विभाग अगर यंत्रणांमार्फत केला जातो.

१. जिल्हा परिषद,

२. भूजल सर्वेक्षण यंत्रणा (जी.सी.डी.ए)

३. महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिस्सारण मंडळ.

यांपैकी पांच लाखांपर्यंतच्या योजना जिल्हापरिषदांमार्फत राबविल्या जातात. तर त्यापेक्षा जास्त खर्चाच्या योजना मंडळाच्या कक्षेत येतात. भू-जल-सर्वेक्षण यंत्रणेचे कार्य हे प्रामुख्याने पाण्याचा उद्भव (सोर्स) मुक्रर करून देणे. त्यांच्या प्रमाणपत्राखेरीज मंडळाला उद्भव निवडता येत नाही. तशा या यंत्रणा स्वतंत्र असणे सयुक्तिक असले तरी यामुळे अनेक घोटाळे झाले आहेत. योजना अकारण खर्चिक बनल्या आहेत.

काही योजना एकापेक्षा अधिक गावांसाठी समूह स्वरूपाच्या असतात, ज्याला ते 'रिजनल वॉटर सप्लाय स्कीम' अगर प्रादेशिक योजना असे म्हणतात. अलीकडच्या काळात अशा योजनांवर भर देण्यात आला आहे. सर्वसाधारणतः मोठ्या व मध्यम धरणाच्या जलाशयाखाली अगर प्रवाही पात्रात या योजना घेतल्या जातात. खात्रीचा उद्भव हा या प्रकारच्या निवडीमागचा हेतू सांगण्यात येतो.

प्रचलित निकषांनुसार ग्रा.पा.पु. योजनांकरिता दरडोई खर्चाची मर्यादा भौगोलिक स्थितीनुसार रूपये ६०० ते १००० च्या दरम्यान आहे. पिण्याच्या पाण्यासाठी योजनेअंतर्गत नियत व्ययाव्यतिरिक्त वेगवेगळ्या योजना, तरतुदी, अभियात व विशेषतः टंचाई कार्यक्रमाखाली प्रकल्प हाती घेतले जातात, तरतुदी केल्या जातात. परिणामतः शासनाला १९९१-९२ टंचाई सदृश्य परिस्थिती निर्माण झालेल्या जिल्ह्यांत तातडीने अनेकविध उपाय करावे लागले. त्यात प्रगतिपथावरील योजना शीघ्रतेने पूर्ण करणे, बंद पडलेल्या नळयोजनांची दुरूस्ती, जिल्हा देखभाल व दुरूस्ती निधीतून करणे, दुरूस्तीचे स्वरूप मोठे असल्यास विशेष दुरूस्ती तरतुदीनुसार त्यांची दुरूस्ती करणे. यासाठी विशेष निधीसाठी शासकीय आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. यासाठी सुमारे २९ कोटी रूपये खर्च करण्यात आले. १९९२-९३ मध्ये टंचाई परिस्थितीची व्याप्ती वाढली व २० जिल्ह्यांत, म्हणजेच मुंबई सोडून राज्यभर टंचाई निवारण उपायाखाली पाणी पुरवठ्याच्या सोयी करण्यासाठी अतिरिक्त निधी व आदेश देण्यात आले.

## प्रचंड योजना

तात्पर्य, आजमितीला राज्यात पिण्याच्या पाण्यासाठी वर्षाकाठी सुमारे १५० कोटी रूपये ग्रा.पा.पु. योजनांसाठी नियतव्यय होतो. आणि वेगवेगळ्या विशेष योजना व तरतुदीत आणखी ५० कोटी रूपये या ना त्या मार्गांनी खर्ची पडतात. आणि प्रश्न मात्र कायम लोंबकळत राहतो. असे का घडते ? याचा मुळापासून शोध घेण्याची गरज आहे.

योजना पूर्ण झाली की ग्रामपंचायत अगर जिल्हापरिषदेने ती ताब्यात घ्यावी व चालवावी अशी अपेक्षा आहे. प्रत्यक्षात असे होत नाही. कारण की ग्रामपंचायतीकडे यासाठी पुरेसा निधी नसतो. त्यामुळे पाणी-पुरवठा व जलनिःसारण मंडळ या योजना 'नाईलाज' म्हणून चालविते. राज्य पातळीवर या प्रश्नाचा विचार करण्यासाठी श्री. व. ना. माखिया यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली होती. तिने काही व्यवहार्य

सूचना केल्या आहेत. यात दोन पर्याय आहेत.

१. ग्रामपंचायतींना सक्षम करून त्यांना योजना चालविण्यास सांगणे;

२. जिल्हा परिषद अगर पाणीपुरवठा मंडळालाच (शहराच्या धर्तीवर) या योजना चालविण्याची जबाबदारी सोपविणे.

दोन्ही प्रकारचे काही फायदे-तोटे आहेत. एकूणच आपले अधिकारी, पदाधिकारी व लोकप्रतिनिधी यांना मोठ्यात मोठी भांडवली खर्चाची योजना करण्याची भारी हौस असते. यातच कंत्राटदार, अभियंते व धूर्त नेते यांचे सामूहिक हित असते. `विकास' तो हाच ! पिण्याच्या पाण्यापासून ते धरण-योजनांपर्यंत हाच प्रकार सर्वत्र आढळतो. तथापि, प्रामाणिक लोकप्रतिनिधी व समाजधुरिणांनी या प्रकारच्या `विकास योजनां' ची आखणी व अंमलबजावणी यात आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले नाही तर योजना अगडबंब होते, कोट्यावधी रूपये खर्च होतात आणि साधे प्यायचे पाणी देखील मिळत नाही. हे आता एक दुष्टचक्र होऊन बसले आहे. आज डी.पी.डी.सी. पासून ते विधानसभेपर्यंत केवळ याचे पोस्टमार्टमच होत राहते.

पिण्याच्या पाण्याच्या योजनांची प्रचलित पध्दत म्हणजे एका एका खात्याची एकेरी कार्यपध्दती व शेख महंमदी याचा मासलेवाईक नमुना आहे. या सर्व कार्यक्रमात पाण्याच्या पुनर्भरणाचा (रि.चार्ज) विचारच केलेला दिसत नाही. विशेषतः शिवारात आणि गावाच्या परिसरात जमिनीत पाणी मुरविण्याचे व उपलब्ध आड आणि विहिरी यांचे पुनर्भरण करण्याचे तसेच एकूण पाणलोटक्षेत्राचे उगमापासून ते संगमापर्यंत (रिजन टू व्हॅली) नीट व्यवस्थापन करून नदी-नाल्यांचे पाणी वाहते तसेच स्वच्छ ठेवण्याचे प्रयत्न केलेले आढळत नाहीत.

खातेनिहाय भाराभर कार्यक्रम चालले आहेत. कुणाचा कुणाला पायपोस नाही. सरकार हे सदिच्छा अगर शहाणपणाने चालत नाहीत असे म्हणतात. तर ते चालते `जी.आर.' म्हणजेच 'शासकीय आदेशा' ने. त्यात दरडोई हजार रूपयांची पिण्याच्या पाण्याची योजना करण्याऐवजी तेवढ्याच अगर थोड्या अधिक खर्चात लघुपाणलोट क्षेत्रविकासाची कल्पना राबवावी, असे का नाही कुणाच्या डोक्यात येत ? समन्वय, सुसूत्रीकरण वगैरे वेगळे कागदांवरच राहते का ? अगदी पिण्याच्या पाण्यातही गुरा-ढोरांच्या देखील पिण्याचा विचार नाही. निसर्ग आणि समाज ही एक समग्र व एकात्म व्यवस्था आहे, याचेच मुळी भान नसल्यामुळे हे सर्व घडते. `विकास-कार्यक्रम' म्हणजे किराणा मालाचे दुकान आहे का ? अशी शंका आली तर ते चुकीचे नाही.

### उपसण्याचा सपाटा

एकदा प्यायला पाणी नाही म्हटले की जेथून कोठून ते मिळवता येईल तेथून ते उपलब्ध करून दिले जाण्यासाठी प्रयत्न होणे स्वाभाविक आहे. `आग व बंब' असाच हा प्रकार आहे. अशाच अगतिक परिस्थितीत भूगर्भातून खोलवरून पाणी उपसण्याचा सपाचा सुरू झाला. हजारो वर्षांत संचित भूजल साठे वापरण्याचे विज्ञान-तंत्रज्ञान आमच्याजवळ आहे, याचा दर्प चढला. त्यातूनच शेकडो फूट खोलीच्या विंधन विहिरी व कूपनलिका खोदण्याची अहमहिका सुरू झाली. त्यातूनच या हजारो विंधन विहिरी खोदल्या गेल्या. आपत्कालीन उपाय सर्वसाधारण मानला जाऊ लागला. यातूनच कुप्रसिध्द 'रिंगरॅकेट' निर्माण झाली !

हे किती निरर्थक असते हे चार-दोन वर्षांत बोअर कोरडे पडू लागले अगर क्षमता कमी झाली की लक्षात येते. पुनर्भरण न करता, म्हणजे प्रवाह न वाढविता केवळ साठ्याचा वापर केला तर दुसरे काय होणार ?

जल बँकेच्या या 'डेबिट एंट्रिज' किती काळ चालणार?

भू-जलसर्वेक्षण यंत्रेचा 'कृत्रिम पुनर्भरणा' चा (अर्टिफिशियल- रि-चार्ज) खटाटोप अगतिकतेचा आणि एकांगी पद्धतीचा परिपाक होय. कारण की आधी भू-भाग व निसर्गचक्राची इतकी मोडतोड होऊं द्यायची की नैसर्गिकदृष्ट्या सुलभ व सयुक्तिक पद्धतीने पुनर्भरण होण्याची क्षमता संपुष्टात यायची, जमिनीची पार धूप व्हायची, वनस्पती आच्छादन व झाडझाडोरा नष्ट होऊ द्यायचा व मग 'कृत्रिम उपायां' च्या तंत्रज्ञानाची शेखी मारायची. म्हणजे निसर्ग उजाड व प्रदेश निर्जल होऊ द्यायचा व नंतर हे 'विकास कार्यक्रम' सुरू करायचे !

हा सर्व व्यर्थ खटाटोप सध्याच्या एकेरी तंत्रज्ञानात्मक मनोवृत्तीचे व कार्यपद्धतीचे द्योतक आहे.यावर उपाय म्हणजे एकात्म विचार करून निसर्गाला अनुसरून सहज, सुलभ व स्थानिक स्वरूपाच्या जलसंवर्धनाला चालना देणे. तात्पर्य, चुकीचा अभियांत्रिकी (किंबहुना केवळ तांत्रिक) अट्टाहास सोडून पर्यावरणीय दृष्टिकोन विकसित करणे. थोडक्यात, खाते निहाय कार्यक्रम न आखता सम्यक व सर्वंकष विचार व उपाययोजना करणे हाच कायमस्वरूपी उपाय आहे. केवळ पैशाच्या तरतुदीने प्रश्न सुटत नाही, हे धोरणकर्त्या मंडळींच्या ध्यानी कधी येणार ?

## जलनिःसारणाचा प्रश्न बिकट

त्यातही पुन्हा पाण्याबरोबर जलनिःसारणाच्या सोयीचा तर विचारच नाही. पाणी-पुरवठ्याच्या एकूण सातशे कोटींच्या योजनेत जलनिःसारणासाठी केवळ ५ कोटींची तरतूद केली आहे, हे एक उदाहरण पुरेसे बोलके आहे. खरे तर, मल-मूत्र विसर्जनाच्या योग्य सोयीखेरीज पाणी-पुरवठ्याला, पाणी स्वच्छ करण्याला तरी काही अर्थ आहे का ? एवढेच काय, सफाई, आरोग्य, शिक्षण, रस्ते व ग्रामसुधार सर्व खर्च व्यर्थ आहे. याचा साधा विचार देखील होत नाही. जागतिक बँकेच्या साह्याने हाती घेण्यात येणाऱ्या प्रकल्पांत याचा एकात्म विचार केला असल्याचे सांगितले जाते.

जसे पाण्याच्या पुनर्भरणाच्या विचाराखेरीज पाणीपुरवठ्याचा विचार एकेरी आहे, तद्वतच उपशाच्या मर्यादेखेरीज देखील तो अपुरा आहे. यासाठी भू-जल उपशाचे नियमन-नियंत्रण करणारे विधेयक - कायदा आवश्यक आहे. पाणी ही सामाजिक संपत्ती असून त्याचा वापर आणि विनियोगावर सामाजिक नियंत्रण असणे अपरिहार्य आहे. पिण्याच्या पाण्याला राष्ट्रीय पाणी-धोरणात अव्वल क्रमांक दिला आहे, हे लक्षात घ्यावे. तथापि, व्यवहारात हे सुलभ पद्धतीने अंमलात येणे गरजेचे आहे.

पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यासाठी आवश्यक असल्यास कुणाचीही खाजगी विहीर 'ताब्यात' घेता येते. पाण्याचा मोबदला देऊन अथवा पिकाची नुकसानभरपाई देऊन हे करता येते. येथे हेही सांगितले पाहिजे की साधारणतः शेतकरी व विशेषतः गरीब शेतकरी स्वतः होऊनच पिके कमी करून समाजासाठी पाणी राखून ठेवतात. मात्र शासनाने पुनर्भरणा करावयाच्या योजना शीघ्रतेने करण्याची जबाबदारी पार पाडली नाही तर प्रश्न दिवसेंदिवस अधिक बिकट होतो. गेल्या काही वर्षांचा हाच अनुभव आहे.

## पाणलोट क्षेत्र विकास

किमानपक्षी, पिण्याच्या पाण्याचे व जलसंवर्धन कार्यक्रमाचे एकात्मनियोजन होणे ही तातडीची व अत्यंत निकडीची गरज आहे. त्या दृष्टीनेच, प्रस्तुत लेखकाने, लघु पाणलोट क्षेत्रविकास हा आज जिल्हा पातळीवर ज्या उण्यापुऱ्या ३०० योजना कार्यरत आहेत. त्यांना

अधिक एक-आणखी एक असा कार्यक्रम न राहता एकमेव स्वरूपाचा मुख्य व मध्यवर्ती कार्यक्रम व्हावा, असा आग्रह धरून या संबंधीचा एक समग्र आराखडा नियोजन मंडळास सादर केलेला आहे.

शासनाच्या योजना आज सामान्य लोकांना आपल्या हिताच्या वाटत नाहीत. त्या त्यांच्या प्रत्यक्ष फायद्यासाठी आहेत याची त्यांना खात्री नसते. त्यामुळेच त्या योजनांत चाललेले गैरप्रकार लोक उघड्या डोळ्यांनी बघत राहतात, निमूटपणे सहन करतात. प्रकल्पांचे सिमेंट व साहित्य चोरून विकले जाते, पाईप खोलवर नीट गाडले जात नाहीत, निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरले जाते, यांत लोकांनी योग्य व परिणामकारक पद्धतीने हस्तक्षेप केल्याखेरीज हे गाडे सुधारणार नाही. यासाठी गावासाठी, गावाच्या पंचक्रोशीत होणारी कुठलीही योजना, तिचा खर्च, लाभ-हानी हे सर्व ग्रामसभेत चर्चा व्हावयास पाहिजे. खरे तर, त्या सर्व खर्चाचा तपशील ग्राम पंचायतीच्या फलकावर ठळकपणे सरळभाषेत लिहिला जावा. ग्रामसभेत त्याची चर्चा व्हावी. लोकांच्या नावाने 'परस्पर' किती काळ या योजनांचा खर्च होत राहणार?

केंद्रित भ्रष्टाचार, अनागोंदी व उधळमाधळ यापेक्षा विकेंद्रित स्तरावरील भ्रष्टाचार, अनागोंदी व उधळमाधळ अधिक वाईट असू शकत नाही, असा सार्वत्रिक अनुभव आहे. किंबहुना ती बाब तात्काळ नजरेत भरते. लोक त्यावर संधी मिळताच उपाय करू शकतात. फक्त लोकांना पुरेशी संधी व साधने उपलब्ध करून दिली पाहिजे. दुर्दैवाने आपली समस्त नोकरशाही, नियोजनकार व धोरणकर्ते ग्रामीण जनतेला 'अडाणी' संबोधून आपली एकांगी धोरणे त्यांच्यावर लादतात. खरे तर, लोकसेवक (पब्लिक सर्व्हंट) या शब्दाला काही अर्थच उरला नाही. दुसरे, आजचे लोकप्रतिनिधी स्वतःच खेड्यात अगर तालुक्याच्या ठिकाणी म्हणजे जनतेत राहात नाहीत. मोठ्या शहरात, मुंबई-दिल्लीतच त्यांचे वास्तव्य असते. मग गावात पाणी नाही, शाळेत शिक्षक नाही, मोऱ्या वाहतात. सर्वत्र धूर निघतो. धूळच ना धूर, मल-मूत्र इतस्ततः पडलेले. त्याचे त्यांना काही देणं-घेणं नाही. या परिस्थितीत बदल होण्यासाठी ज्यांची मुले गावांच्या शाळेत शिकत नाहीत, त्यांना तेथील प्रतिनिधित्व करण्याचा अधिकार नसावा. याखेरीज प्रचलित गर्तेतून बाहेर येणे कठीण आहे.

● ●

---

(पृष्ठ २६ वरून पुढे)

आणि कौतुकाला धीटपणे सामोऱ्या जाऊ लागल्या, पाणलोट विकासाची आणि सध्याची ठेव १.४० लाखांपेक्षा जास्त आहे. त्यामुळे ही रक्कम गुंतवून झाडांना पाणी घालण्यासाठी एक पंप व पाईपसाठी कर्ज घेण्याचे ठरले, अशा प्रयत्नांमुळे गुरैय्यातील स्त्रियांचा आत्मविश्वास व निश्चय वाढायला मदत झाली.

स्त्रियांच्या सामाजिक व आर्थिक गरजा व तिला सांभाळणाऱ्या वातावरणाचा मेळ घालण्याची ही संकल्पना आहे. म्हणून कमकुवत व क्षीण गट विकासात्मक कार्याचा केंद्रबिंदू झाला आहे. त्यामुळे त्यांना एक दिशा मिळते जी त्यांना यशाचा मार्ग दाखवतो.

● ●

(Source : Ashwastha, Yashda, Pune)

***संमेलन विशेषांक***

*महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेला २५ वर्षे पूर्ण होत आहेत, त्यानिमित्ताने **'हाकारा'** चा संमेलन विशेषांक काढण्यात येणार आहे. हा अंक **जानेवारी - जून २००१** असा **जोडअंक** असणार आहे.*

# ग्रामस्वराज्यासाठी लोकनियोजनातून सर्वांना किमान पाणी आणि सेंद्रीय शेतीचा विकास

*"ग्रामगौरव प्रतिष्ठान [पाणी पंचायत] संस्थेतर्फे सामाजिक भागादारीने सुरू होत असलेल्या वरील राज्यव्यापी कार्यक्रमाची रूपरेखा, सर्व संबंधितांच्या माहितीसाठी."*

**भा**रताची लोकसंख्या स्वातंत्र्यानंतर प्रचंड वाढली आणि नुकतीच ती शंभर कोटीच्या पार गेली आहे. पुढील वीस वर्षांत जगातील सर्वात अधिक लोकसंख्येचे राष्ट्र म्हणून आपली निश्चित गणना होईल. औद्योगिक विकासामुळे नागरीकरणाची लोकसंख्याही वाढत आहे; ग्रामीण आणि शहरी असे ह्या लोकसंख्येचे विभाजन होत आहे.

राष्ट्रीय विकासाच्या प्रक्रियेत लक्षणीय वाढ होत असली तरी ह्या विकासाच्या लाभधारकांची भागीदारी फारच विषमतेने होत आहे. मूठभर समाजाचा होत असलेला दिखाऊ विकास आणि बहुजन समाजाचे वाढते दारिद्र्य हे आमच्या विकास नियोजनाचे फलित आहे.

आज भारतात एकूण लोकसंख्येच्या ७० % लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. महाराष्ट्रात हे प्रमाण ६० % आहे. गेल्या पन्नास वर्षांचा आढावा घेतला तर स्थानिक गावपातळीवर एकूण दोन ते तीन पटीने ही लोकसंख्येची प्रत्यक्ष वाढ आहे. भारताच्या अधिकाधिक ग्रामीण भागाचे स्थानिक चित्र हे चार समस्यांनी सामाजिक व आर्थिक बाबतीत खालावत आहे. या चार समस्या आहेत-

१) मर्यादित नैसर्गिक साधन संपत्तीच्या गैर वापरामुळे त्या ठिकाणी राहणाऱ्या लोकांना त्यांच्या जीवनाच्या गरजा पुरवण्यास स्थानिक उत्पादनाचा अभाव. २) वाढत्या लोकसंख्येमुळे वाढत जाणारी बेरोजगारी आणि शेतीवर वर्षभर पुरेल असा रोजगार उपलब्ध न होणे. ३) या पहिल्या दोन प्रश्नांमुळे ग्रामीण भागातील एकूण आर्थिक दारिद्र्यात वाढ होत जाणे. ४) शेवटी याची प्रचिती ही एकूण पर्यावरणाचे संतुलन ढासळण्यात होते. आज महाराष्ट्रात ५० % एवढी जमीन उजाड आणि अनुत्पादक झाली आहे. उत्पादक जंगलाचे आवश्यक आच्छादन हे किमान रेषेच्या बरेच खाली गेले आहे.

ग्रामीण भागात उदरनिर्वाह करणाऱ्या लोकसंख्येचे निरनिराळे सामाजिक स्तर आहेत. त्यांपैकी आदिवासी समाजाचा एक, संख्येने मोठा असा गट भारतभर अनेक भागांत विखुरला आहे. राष्ट्रीय पातळीवर एकूण लोकसंख्येच्या ८ ते ९ % एवढी आदिवासी लोकसंख्या आहे. महाराष्टातही एकूण लोकसंख्येच्या ८% हे प्रमाण आहे आणि ग्रामीण भागाच्या लोकसंख्येच्या प्रमाणात तुलना केल्यास हे प्रमाण १५ % एवढे होईल. महाराष्ट्रात ७० लाख एवढी आदिवासी लोकसंख्या आहे आणि त्यांची कुटुंबसंख्या जवळपास १४ लाख एवढी होईल. महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत आणि ७० तालुक्यांत आदिवासी लोकसंख्या विखुरलेली आहे.

कुटुंबाच्या वार्षिक आर्थिक उत्पन्नावरून कुटुंबाची सामाजिक, आर्थिक परिस्थिती ठरवली जाते. पूर्वी कुटुंबाचे उत्पन्न वार्षिक रू. ११,००० चे खाली असेल तर ते कुटुंब दारिद्र्य रेषेखाली आहे असे समजले जाई. आता ही उत्पन्नाची मर्यादा रू. २२,००० एवढी केली आहे. या मर्यादेनुसार परीक्षण केले तर महाराष्ट्रातील एकूण ग्रामीण भागातीलकुटुंबांपैकी ६०% एवढी कुटुंबे दारिद्र्य रेषेखाली येतील. आदिवासी समाजाची याबाबतची परिस्थिती ही ९०% कुटुंबे दारिद्र्य रेषेखाली आहेत. हे विधान धक्कादायक नसून सरकारी सर्वेक्षणावर आधारित आहे. हे खालील आकडेवारीने स्पष्ट होईल.

महाराष्ट्र राज्याची आदिवासी लोकसंख्या ही विभागवार आखून त्या भागात आदिवासी उपयोजनेचा खास कार्यक्रम गेले २६ वर्षे राबवला जात आहे. राज्याच्या वार्षिक नियोजनाच्या ८% एवढी रक्कम या आदिवासी उपयोजनेवर खर्च होते. सन १९९९-२००० सालासाठी एकूण ५१२ कोटी रूपयांची तरतूद आदिवासी उपयोजनेवर केली आहे. आजपर्यंत रू. ५ हजार कोटीपर्यंतचा खर्च ह्या उपयोजनेवर झालेला आहे. जवळपास ३०० विविध योजनांचा ह्या कार्यक्रमात समावेश आहे.

**एका विशेष "आदिवासी विकास प्रकल्पाच्या" अप्रकाशित माहितीद्वारे-**

*अ) एकूण कुटुंबाच्या भूमिहीन आणि भूधारकांची माहिती-*

| | |
|---|---|
| १) एकूण कुटुंबांची संख्या | - २८,६८२ |
| २) एकूण भूधारक | - २०,६६४ |
| ३) भूमिहीन कुटुंबं | - २८% |
| ४) भूधारक कुटुंबे | - ७२% |
| ५) सिंचन व्यवस्था असलेली कुटुंबे | - ६% |
| ६) सिंचन व्यवस्था नसलेली भूधारक | - ९०% |

वरील आकडेवारीत ६% कुटुंबांना सिंचन व्यवस्था आहे. ही माहिती बरोबर वाटत नाही. या गटाची एकूण वहिताखालची जमीन किती आणि त्यापैकी किती जमीन निश्चित सिंचनाखाली आली आहे याची आकडेवारी काढलेली नाही. त्याचप्रमाणे या भागातील किती जमीन सिंचनाखाली येऊ शकेल याचा अंदाज घेतलेला नाही.

*ब) वरील गटातील कुटुंबांच्या मुख्य रोजगारीची विभागणी*

| | |
|---|---|
| १) शेतमजूर | - २७% |
| २) लहान उद्योग व्यवसाय | - १% |
| ३) नोकरी | - ४% |
| ४) जंगलातील रोजगारी | - १% |
| ५) शेती | - ६७% |
| एकूण | - १००% |

*क) वरील गटाचे सर्व साधनांतून मिळणारे सरासरी वार्षिक उत्पन्न फक्त रू. ७२००, आहे.*

कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नाची वर्गवारी खालीलप्रमाणे आहे

| | |
|---|---|
| रूपये - २००० पर्यंत | ६७६ - २% |
| २००१-३६०० | ३६४३ - १३% |
| ३६०१-५००० | ८१०९ - २८% |
| ५००१-७००० | ७६६३ - २७% |
| ७०००-११००० | ६११६ - २२% |
| ११००१-२०,००० | १४६८ - ५% |
| २०,००० चे वर | ९२७ - ३% |
| एकूण | २८,६८२ - १००% |

वरील अ, ब आणि क ही आकडेवारी एका आदिवासी विभागातील २८,६८२ कुटुंबांची असली तरी थोड्याफार फरकाने जवळपास अशीच निरनिराळ्या विभागातील १४ लाख आदिवासी कुटुंबांची आहे. आदिवासी उपयोजनेवर आजपर्यंत झालेला रू. ५००० कोटींचा खर्च आणि भविष्यात दर वर्षाला रू. ५०० कोटींपेक्षाही अधिक होणाऱ्या खर्चातून एकूण आदिवासी समाजाचा आर्थिक स्तर दारिद्र्य रेषेच्यावर काही कालमर्यादेत उंचावेल याच निर्धाराने भाष्य करण्याची जबाबदारी सरकारी यंत्रणा आणि लोकप्रतिनिधी घेतील का ? आदिवासी उपयोजनेच्या कार्याचा आढावा घेणे, त्याचे विश्लेषण करणे यांबाबत लोकप्रतिनिधी, सरकारी यंत्रणा, स्थानिक आदिवासी लोकनेतृत्व आणि आदिवासी भागात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था यांची चर्चा घडवून लोक कार्यक्रमाचा पर्यायी कृती कार्यक्रम साकार करण्यासाठी भविष्यकाळात वाटचाल होणे आवश्यक आहे. महाराष्ट्रात कार्यरत असलेल्या स्वयंसेवी संस्थांद्वारे ह्या उपक्रमाला चालना देण्याचे काम "ग्रामगौरव प्रतिष्ठान" संस्थेतर्फे विचाराधीन आहे.

"ग्रामगौरव प्रतिष्ठान" ही स्वयंसेवी संस्था १९७२ च्या दुष्काळी परिस्थितीत स्थापन झाली. लहान जिराईत शेतकरी आणि भूमिहीन कुटुंबे यांना गाव पातळीवर संघटित

करून त्यांना उपलब्ध पाण्याचे समान वाटप हे सामाजिक मूल्य कृतीत आणून "पाणी पंचायत" ही संकल्पना कार्यरत करण्यास उद्युक्त करते. पाणी या दुर्मिळ संपत्तीचे साठवण, वाटप आणि वापर यांचे पर्यायी सामाजिक नियंत्रण आणि व्यवस्थापन हे न्याय्य पद्धतीने सर्वांना उपलब्ध करून देण्याचे गाव नियोजन हे पाणी पंचायत योजनेचे उद्दिष्ट आहे.

"सामूहिक उपसा सिंचन योजना" या उपक्रमाद्वारे पाणी पंचायतीच्या योजना आखल्या जातात. अनेक वर्षांच्या आणि महाराष्ट्रातील विविध भागांतील पाणी पंचायतीच्या यशस्वी योजनांतून निघालेले अत्यंत महत्त्वाचे निष्कर्ष ग्रामनियोजनाच्या पर्यायी विकासनीतीसाठी उपयुक्त ठरतील. १) पाण्याची किमान सिंचन सुविधा गावांतील सर्व कुटुंबांना करता येणे सामूहिक उपसा सिंचनाद्वारे महाराष्ट्रात सर्वत्र शक्य आहे. २) समान पाणी वाटपाच्या तत्त्वाने प्रत्येक कुटुंबाला माणशी ०.२ हेक्टर एवढ्या सिंचनाच्या उपलब्धतेतून ५ माणसांच्या कुटुंबाला एक हेक्टर पर्यंतच हमी देणे शक्य आहे. ३) कुटुंबाला १ हेक्टर सिंचन क्षेत्र उपलब्ध झाले तर त्याचे निव्वळ शेतीचे उत्पन्न रू. ५०,००० एवढे वाढू शकते. ४) १ हेक्टर सिंचन क्षेत्र अधिकाधिक उत्पादित करण्यासाठी पाण्याचा वापर हा बारमाही पिकांऐवजी चारमाही हंगामी रीकाला केल्याने उत्पन्नात भरपूर वाढ आणि कुटुंबातील श्रमशक्तीला वर्षभर पुरून उरेल इतकी रोजगारी ह्या मर्यादित सिंचन क्षेत्रातून निर्माण होते. ५) ज्या भागात पाणी पंचायतीच्या योजना सुरू झाल्या, त्या भागातील लोक हंगामी स्थलांतर करीत होते आणि बरेच जण शहराकडे धाव घेत होते. या योजनेच्या यशस्वीतेने लोकांचे हंगामी स्थलांतर थांबले आणि अनेक कुटुंबे शहरांतून परत येऊन आपली लहान सिंचन शेती आनंदाने करीत आहेत. ६) पाणी पंचायतीच्या उपसा सिंचन योजनेच्या आखणीपासून ते कार्यान्वित करण्यापर्यंत आणि पुढे सातत्याने चालू ठेवण्याचे कार्य हे लोकच त्यांच्या संघटनेद्वारे करतात. प्रतिष्ठानच्या मार्फत त्यांना तांत्रिक व व्यवस्थापकीय मार्गदर्शन केले जाते.

**आदिवासी भागासाठी सामूहिक उपसा सिंचन कार्यक्रम**

आदिवासी उपयोजनेच्या अंतर्गत जे अनेक कार्यक्रम आहेत, त्यांमध्ये सामूहिक उपसा सिंचन योजनेचा अंतर्भाव आहे. या योजनेचा १००% भांडवली खर्च अनुदान म्हणून देण्यात येतो. भांडवली खर्चाची मर्यादा आता रू. ५०,००० प्रती हेक्टर एवढी वाढवली आहे. आदिवासींच्या विकासासाठी सामूहिक उपसा सिंचन कार्यक्रमाचा अंतर्भाव एवढ्या उदार भांडवली अनुदानाने केल्याबाबत शासनाचे स्वागत आणि अभिनंदन केले पाहिजे.

आदिवासी उपयोजनेच्या बहुतेक सर्व योजना ह्या वैयक्तिक लाभधारकांना विविध कार्यक्रमांतून आर्थिक अनुदान देण्याच्या आहेत. त्यांचा एकूण परिणाम काय आहे, हे आपण प्रथम दिलेल्या सांख्यिकी आकडेवारीने पाहिले आहे. सामूहिक उपसा सिंचन कार्यक्रम जर व्यवस्थित राबवला तर निश्चित आमूलाग्र बदल आदिवासींच्या जीवनात घडून येईल. खालावत चाललेल्या दारिद्र्यात धडपडत जीवन जगणाऱ्या आदिवासी समाजाची उन्नती संपन्नतेकडे होईल. दारिद्र्याचे संपूर्ण निर्मूलन होईल आणि आज सर्वात अधिक आर्थिक दुर्बलतेने जगणारा समाज ग्रामीण समाजातील इतर सधन समाजाएवढा प्रगत होईल. ह्या कार्यक्रमाचे यश हे ह्या समाजाने प्राप्त केलेल्या आर्थिक सबलतेतून त्यांनी शिक्षण, आरोग्य इ. सामाजिक कार्यक्रम, जे सरकारी व्यवस्थेद्वारे आणि प्रचंड खर्चातून होतात; त्याऐवजी लोकांनीच हे सामाजिक कार्यक्रम स्वबळावर आणि सरकारच्या आर्थिक खर्चाशिवाय राबवण्याची शक्ती त्यांना मिळू शकेल.

उपयोजनेअंतर्गत असलेला सामूहिक उपसा सिंचन कार्यक्रमाचा प्रसार फारच तुरळक झालेला आहे. १४ लाख आदिवासी कुटुंबांची सरासरी १ हेक्टर एवढी शेतीची जमीन वहिताखालची धरली तर एकूण १४ लाख हेक्टर पैकी किती क्षेत्र संरक्षित सिंचनाखाली आहे याची आकडेवारी उपलब्ध झाली तर किती काळ आणि किती भांडवल लागेल याचा अंदाज करता येईल.

चालू वर्षाच्या एकूण ५१२ कोटींच्या उपयोजनेच्या कार्यक्रमात फक्त ६ कोटी रूपयांची तरतूद उपसा सिंचन उपयोजनेवर केली आहे. रू. ५० हजार हेक्टर या मर्यादेने साधारण फक्त १२ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली निर्माण होईल. यावरून या कार्यक्रमाचा प्रसार किती मंदगतीने आहे हे लक्षात येईल.

**सामूहिक उपसा सिंचन कार्यक्रमाविषयी एकूण अनास्था**

एवढ्या मंदगतीने चालू असलेल्या या कार्याक्रमामागे निरनिराळ्या शासकीय व्यवस्थेची अनास्था हे कारण आहे. आजपर्यंत ज्या योजना या कार्यक्रमात राबवल्या गेल्या त्यापैकी अनेक योजना बंद आहेत किंवा समाधानकारक चालत नसून त्यापासून आदिवासी कुटुंबांना आर्थिक लाभ घेण्यास उपयुक्त ठरत नाहीत, याबाबतचा अभ्यासही शासकीय यंत्रणेद्वारे झाल्याचे दिसत नाही. लोकांचा सहभाग, त्यांच्यात व्यवस्थापकीय सक्षमता निर्माण करण्याची आवश्यकता यांच्या अभावाने या कार्यक्रमाला योग्य गती मिळाली नाही.

**सामूहिक उपसा सिंचन कार्यक्रम सर्वत्र प्रसारित होण्यासाठी "ग्रामगौरव प्रतिष्ठान" (पाणी पंचायत) तर्फे सहकाराची आखणी**

गेले एक वर्षभर या कार्यक्रमाचा अभ्यास संस्थेने केला. पुणे जिल्ह्यातील आंबेगांव आणि जुन्नर तालुक्यातील आदिवासी क्षेत्रात या कार्यक्रमाची माहिती लोकांच्यात प्रसारित केली. त्याकरिता प्रथम "पाणी पंचायत" कल्पनेची कार्यवाही करण्यासाठी तरूण अतांत्रिक-पदवीधरांचा एक स्वयंसेवी गट संस्थेत प्रशिक्षित करण्याचा चार महिन्यांचा एक कार्यक्रम आखला. त्यानंतर या तरूणांना वरील दोन तालुक्यात लोकसंपर्क आणि एकूण सामाजिक आर्थिक निरीक्षण करण्याचे प्रशिक्षण दिले. यापुढे सामूहिक उपसा सिंचन योजनेची माहिती देऊन त्या योजनेची आखणी करण्यास लोकांना आणि संबंधित तांत्रिक व्यवस्थेला सहभागी केले. संस्थेमध्येही या योजनांचे व्यवस्थापन करण्याची यंत्रणा तरूण इंजिनियर पदवीधारकांच्या नियुक्तीने आखली जात आहे.

येत्या सहा महिन्यांत या दोन तालुक्यातील सात गावांत ५४३ हेक्टर क्षेत्रांत, ५३३ कुटुंबांना सिंचनाचा लाभ मिळेल आणि त्यासाठी २.५४ कोटी भांडवली गुंतवणूक होईल, या भांडवली गुंतवणुकीची मान्यता आणि उपलब्धता त्वरित व्हावी यासाठी जिल्हाधिकारी पुणे आणि प्रकल्प अधिकारी आदिवासी उपयोजना (घोडेगांव) यांचेकडे लोकांच्या वतीने योजनापत्र दाखल केले आहे. आर्थिक उपलब्धता झाल्यापासून सहाएक महिन्यांत या योजनांची उभारणी होऊन कार्यवाही सुरू होईल. लोकांच्या पाणी वापर सहकारी संस्था नोंदवून त्यांनाच प्रत्यक्ष भांडवल पुरवून आणि संस्थेच्या मार्गदर्शनाने या योजना उभ्या राहतील आणि खर्चाचा तपशील सर्व संबंधितांना सहकारी संस्था जाहीरपणे सादर करेल. या दोन तालुक्यात सध्या आखलेल्या योजनांना आर्थिक सहाय्य उपलब्ध होईपर्यंत नवीन योजना स्वीकारण्याचे काम स्थगित केले आहे.

**मेंढालेखा ता. धानोरा जि. गडचिरोलीचा प्रयोग**

महाराष्ट्रातील आदिवासी भागातील मेंढालेखा हे एक लहान गाव आहे. पण या गावाने सर्वांना चकित करणारी सामूहिक घोषणा काही वर्षांपूर्वी केली. "दिल्ली, मुंबईत आमचे सरकार, आमच्या गावांत आम्हीच सरकार." गावच्या विकास कामांचे नियोजन, निर्णय आणि कार्यवाही सर्वांच्या संमतीने ग्रामसभेत घेतले जातात, गावाची शेतीची जमीन १०० हेक्टरच आहे, पण गावाला लागून सरकारी जंगल १४०० हेक्टर आहे. या जंगल जमिनीची राखण, देखभाल आणि लाभ यांवर गावाचे नियंत्रण आहे.

जंगल, जमीन, पाणी यांचे संतुलित नियोजन आणि लोकांच्याच ताब्यात आखणी व कार्यवाही करण्याचा आत्मनिर्धार उभा करण्याचे महत्त्वाचे काम वृक्षमित्र या संघटनेचे प्रवर्तक श्री. मोहन हिराबाई हिरालाल अनेक वर्षे या भागातील अनेक आदिवासी गावांत करीत आहेत.

मेंढालेखाचे सरपंच श्री. मोहनभाईंच्या आदर्श विचारांचे स्वप्न प्रत्यक्षात साकार करण्यात प्रयत्नशील राहून यशस्वी झाले आहेत. ता. २८-८-२००० रोजी मेंढालेखा येथे श्री. मोहनभाई यांनी दोन दिवसांचे "पाणी नियोजन" चर्चासत्र आयोजित केले होते. या कार्यक्रमाला जिल्हाधिकारी श्री. गोपाल रेड्डी आवर्जुन उपस्थित होते. आदिवासी उपयोजनेचे अप्पर आयुक्त श्री. नितीन गद्रे हे काही अडचणींमुळे येऊ शकले नाहीत.

मेंढालेखा गावाच्या शेतीच्या सिंचनाचा प्रश्न सुटला तर शेतीचा वापर दुबार आणि उन्हाळी पिकांकरिता करता येईल. आज नुसत्या पावसावर अवलंबून असलेल्या भाताचे उत्पन्न लोकांना वर्षभर पुरत नाही. सिंचन व्यवस्था उपलब्ध झाली तर आजच्यापेक्षा अनेक पटीने शेतीचे उत्पन्न वाढेल. कुटुंबाला १ हेक्टर सिंचन सुविधा आणि एक ते दोन हेक्टर जंगल जमिनीचे व्यवस्थापन आणि पशुसंवर्धन या पूरक नियोजनातून "सेंद्रीय शेतीचे" उत्पादन अवलंबून अधिक फायदेशीर होईल आणि बाहेर शहरासाठी पाठवण्याच्या उत्पन्नात वाढ होईल. याकरिता गावाजवळून आज तुडूंब वाहत असलेल्या कढानी नदीवरून "सामूहिक उपसा सिंचन योजना" आखावी अशी मेंढालेखा गावाच्या ग्रामस्थांनी आग्रहाची विनंती केली. जिल्हाधिकारी श्री. गोपाल रेड्डी यांनी या योजनेचा तांत्रिक अहवाल लवकर करून आर्थिक आदिवासी उपयोजनेतून मंजुरीही त्वरित करण्याचे आश्वासन दिले.

स्थानिक लोक, स्वयंसेवी संघटना आणि वरिष्ठ शासकीय अधिकारी यांचा सहकाराचा संवाद आत्मीयतेने घडत राहिला तर अनेक काळापासून तळागाळात दबलेल्या आदिवासी समाजाचे कायमचे दारिद्र्य निर्मूलन होण्यास फार वेळ लागणार नाही. लोकजागृती, लोकसंघटन, स्थानिक लोकनेतृत्व हे महत्त्वाचे मूलभूत काम विकास योजना सुरू होण्यापूर्वी आवश्यक आहे. विकास कार्यक्रम हा लोकांनी आखलेला असला पाहिजे आणि त्याला आर्थिक साहाय्य प्राधान्याने त्वरित काही काळापर्यंतच शासनाने करावे. काही मर्यादित काळात लोकसमूह आर्थिकदृष्ट्या सबळ होऊन शासकीय योजनांच्या नियोजनातून मुक्त झाला तरच खरे स्वातंत्र्य आणि प्रगती यांची अनुभूती येईल. यवतमाळ येथील जिल्हाधिकारी यांचीही भेट ता. ३०ला झाली. त्यांना त्यांच्या जिल्ह्यात "सामूहिक उपसा सिंचन योजनांची" आखणी करण्याकरिता पाणी पंचायतचे सहकार्य देण्याची चर्चा झाली. जिल्हाधिकारी यांनी याबाबत सर्व सहकार्य देण्याची उत्सुकता दाखवली.

हे पत्रक संबंधित लोकप्रतिनिधींपासून ते स्थानिक आदिवासी लोकसंघटनांपर्यंत त्याचप्रमाणे प्रसिद्धीमाध्यमे आणि प्रत्यक्ष संबंध नसलेल्या; परंतु समाजकार्यात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या व्यक्ती आणि संस्था यांना पाठवण्याचा प्रयत्न आहे. त्याचप्रमाणे या कामाची वाटचाल, प्रगतीचा आढावा, कार्यक्रमात येणाऱ्या अडचणी आणि आव्हाने याबाबतची माहिती नित्याने मासिकाद्वारे देण्याचाही प्रयत्न आहे. हे पत्रक वाचून ज्यांना या कार्यात सहभाग आणि सहकार्य करण्याची प्रेरणा येत असेल त्यांनी पत्राद्वारे खालील पत्त्यावर संपर्क साधावा.

कळावे,

आपला,

वि. बं. साळुंखे

(विलासराव साळुंखे)

विश्वस्त, ग्रामगौरव प्रतिष्ठान
(पाणी पंचायत)
पोस्ट बॉक्स नं. १२०२;६७
हडपसर इंडस्ट्रियल इस्टेट
पुणे ४११ ०१३.

• •

# नवे पाणी धोरण - पुन्हा केंद्रीकरण

केंद्र सरकारने १९८७ च्या राष्ट्रीय पाणी धोरणात दुरूस्ती करून नवे धोरण बनवले आहे. पाण्याच्या समस्येला गांभीर्याने घेणे स्वागतार्ह आहे. मात्र, नव्या धोरणातही केंद्रिकरणाचे तेच रूप दिसते, ज्यामुळे मागील धोरण फसले. पाणी हा लोकांच्या जीवनाचा अभिन्न भाग असताना, त्याचे व्यवस्थापन लोकांकडेच सोपवले गेले पाहिजे. देशात अनेक ठिकाणी स्थानिक समूहांनी आपल्या पाण्याचे उत्कृष्ट व्यवस्थापन केले आहे. त्या प्रयत्नांना महत्त्व देण्याऐवजी केंद्र सरकारच्या वर्चस्वाला यात अधिक बळकट केले गेले आहे.

नव्या धोरणात प्रत्येक नदी-खोऱ्याला एक एकक मानून पाणी व्यवस्थापन करावे व त्यासाठी प्रत्येक नदीसाठी नदी-खोरे संघटन बनवणार असे म्हटले आहे. त्यात अनेक तज्ज्ञांचा समावेश असेल व संपूर्ण नदीखोऱ्यातील उपलब्ध पाण्याचा आढावा घेऊन राज्याच्या प्राथमिकतांनुसार त्याची व्यवस्था केली जाईल. हा विचार जरी स्वागतार्ह असला तरी हे 'संघटन' कोणत्या निकषांवर तयार होईल? ते कोणते राज्य/केंद्र बनवणार? एका नदी खोऱ्यात अनेक राज्ये येतात (जसे नर्मदा, कृष्णा इ.) बहुराज्यीय खोरे संघटनात केंद्राची भूमिका कशी असेल आणि एकराज्यीय खोऱ्याच्या संघटनात ती कशी असेल? असे संघटन सरकारे करणार की लोक/लोकसंघटना? या नव्या व्यवस्थेत पुन्हा नोकरशाहीचेच वर्चस्व असणार का लोकांना अधिकार देणार?

सर्वोच्च न्यायालयानेदेखील अशा हस्तक्षेपाला पाठींबा दिला. त्यानुसार राष्ट्रीय भूजल मंडळाची स्थापना करण्यात आली. हे राज्यांच्या अधिकारांवर अतिक्रमण असल्याचा आरोप होत आहे. अशा मंडळांवर लोकांचे प्रतिनिधित्त्वही हवे. ते कशाप्रकारे याबद्दल विचारविनिमय हवा. शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी यांनी भूजलाच्या अतिवापरावर, पंप्स, कूपनलिका, विहिरी खोदण्यावर सरकारी अतिनियंत्रणावर प्रश्न उठविले आहेत.

एकीकडे भूजलाच्या अतिवापरावर नियंत्रण हवे अशी गरज आहे. दुसरीकडे या सरकारी / नोकरशाही हस्तक्षेपालाही विरोध. यातून 'पाणी पंचायती' सारख्या लोकसंस्थांद्वारे नियंत्रण असा मार्ग निघेल. मात्र आजवर भूजलाची वारेमाप उधळपट्टी झाल्याने शेतकऱ्यांसमोरच समस्या उभी राहते हेही मान्य करून कुठेतरी आपल्या शेतीपध्दतीत, पाणी वापरात बदल करणे शेतीच्याच हिताचे राहील.

आंतरराष्टीय पाणी वाटपासाठी १९५६च्या कायद्यानुसार एखादे न्यायाधिकरण (लवाद) नेमण्याचे काय ते काम होते. यामध्ये नदी खोऱ्याला एकक मानून विकेंद्रीत व विविध अंगी योजनांचीकल्पनाही पुढे आली नाही. त्यात पाणी टिकवणे, प्रदूषण, सिंचन या सर्व सध्याच्या समस्यांचा समावेश हवा. पाण्याचे वाटप दोन राज्य सरकारांना करणे पुरेसे नाही. लोकांच्या गरजा, प्राधान्यक्रम पाहून पाण्याच्या समुचित उपयोगाची त्यात कल्पना असायला हवी. त्या आंतरराज्यीय पाणी वाटप कायद्यातील दोष, ताठरपणा कमी करावा.

सर्व राज्यांनी समान पाणी धोरण लागू करण्याची शिफारस या धोरणाच्या मसुद्यात आहे. प्रत्येक राज्य वेगवेगळ्या प्रकारे असे धोरण विकसित करू शकते. कुणी भूजलावर नियंत्रण करेल, कुणी अधिक पाणलोट क्षेत्र विकासावर भर देईल, किंवा अन्य उपाय करेल म्हणून एकच पाणी धोरण सर्वांना असू शकत नाही. त्यात विविध आयामातून प्रयत्न करावे लागतील. एकसारखे धोरण म्हटल्यावर पुन्हा केंद्राचे वर्चस्व आले. म्हणून नव्या पाणी धोरणावर राज्य सरकारांनी आपल्या अधिकारांच्या दृष्टीने पुनर्विचार करावा. राज्य सरकारेही सत्तेचे केंद्रीकरण करत असतात. त्यांनीही प्रत्येक स्तरावर लोकसमुहांच्या सहभागाची भूमिका घ्यावी. त्यादृष्टीने व्यापक विचार व सहमती झाल्याखेरीज हे धोरण अवाजवी घाईने लागू होऊ नये.

(सौजन्य : समतेसाठी न्यायासाठी आंदोलन)

## पाणीपरिषदेत पर्यायांची मांडणी

# पाण्याच्या खासगीकरणाच्या प्रयत्नांना विरोध

हेग (नेदरलँडस्) येथे १७ ते २२ मार्च २००० दरम्यान भरलेल्या जागतिक पाणी परिषदेत सरकारे, जागतिक बँकेसारख्या आंतरराष्ट्रीय संस्था व खासगी महाकंपन्यांनी पाण्याच्या खासगीकरणाचा घाट घातला होता. मात्र परिषदेत आलेल्या संघटना व अनेक कार्यकर्त्यांनी यावेळी त्यांच्या भूमिकेला मान्यता दिली नाही. याउलट, पाणी ही व्यापार करण्याची वस्तू नाही म्हणून अन्न व पाणी हे विषय जागतिक व्यापार संघटनेच्या (वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन) अखत्यारीतून काढून टाकावेत व पाणी हा जनसमुदायाचा ठेवा म्हणून घोषित करावा असे आवाहन त्यांनी केले.

जगातील अनेक देशांचे मंत्री, नोकरशहा, पाण्यासंबंधी (बांध) कामे करणाऱ्या महाकंपन्या / संस्था, तज्ज्ञ यांच्या जोडीलाच अनेक देशांतील चळवळींचे प्रतिनिधी आले होते. परिषदेच्या सरुवातीलाच स्पेनमधील बास्क प्रदेशातील इतियो धरणाच्या विरोधात तेथील आदिवासींच्या चळवळींच्या प्रतिनिधींनी सभागृहातच अभिनव पध्दतीने जोरदार निषेध दर्शविला होता.

सध्याच्या पाणी व्यवस्थापनाच्या धोरणामुळे होणाऱ्या विनाशाचाच तो आवाज होता. त्या परिषदेत भारत सरकारचेही प्रतिनिधी होते. 'नर्मदा बचाओ आंदोलना' च्या मेधा पाटकर व बुकर पुरस्कार विजेत्या लेखिका अरूंधती रॉय या त्या परिषदेला होत्या. भारताचे जलसंसाधन मंत्री सी.पी. ठाकूर, गुजरातचे नर्मदा विकास मंत्री जयनारायण व्यास व सरदार सरोवर प्रकल्पाचे कट्टर समर्थक डॉ. योगेंद्र अलघ इत्यादी मंडळी तेथे होती. त्यांनी नेहमीप्रमाणे सरदार सरोवराची गरज, त्यामुळहोणारे लाभ इत्यादींचे वर्णन केले. मात्र श्री. ठाकूर, श्री. व्यास यांना तर भाषणाच्या दरम्यान ठिकठिकाणी अडवण्यात आले. सरदार सरोवरविषयक श्री. व्यास धादांत असत्य माहिती सांगत होते. त्यांचा खोटारडेपणा सर्वांसमोर कार्यकर्त्यांनी उघड केला. मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री दिग्विजयसिंह यांनी म्हटले की, 'माझ्या पूर्वसूरींकडून ही मोठी धरणे माझ्याकडे आली. मात्र यापुढे आम्ही मोठी धरणे बांधणार नाही.' त्यांनी, शहाण्या सैत्ताधाऱ्याप्रमाणे, विकेंद्रित पाणी व्यवस्था, जलग्रहण क्षेत्र विकास इत्यादींची गरज प्रतिपादित केली. पाण्याच्या खासगीकरणाला विरोध केला. पुण्यातील प्रसिध्द पर्यावरणीय अर्थतज्ज्ञ विजय परांजपे, अण्णा हजारे व राज्यस्थानातील 'तरण भारत संघ' चे राजेंद्रसिंह व मेधा पाटकर यांनी लोकांच्या हातात पाणी, लोकांचे निर्णय व पाण्याची हमी या मुद्यांवर भर दिला. नेपाळ व भारतातील इतर तज्ज्ञ व कार्यकर्तेही या परिषदेत होते.

'पाणी व नैतिकता' या सत्रात बोलताना मेधा पाटकर यांनी पाणी हे सार्वजनिक हितासाठी व सामूहिक उपयोगाचे असून त्याचे नियोजन व उपयोग त्या समूहाने ठरविणे आवश्यक आहे हे स्पष्ट केले. गुजरातच्या 'सेवा' या संस्थेने जंगलतोड, मोठी धरणे इत्यादींमुळे व सामाजिक-आर्थिक धोरणांमुळे पाण्याचा प्रश्न गंभीर झाल्याचे स्पष्ट केले. अण्णा हजारे, राजेंद्रसिंह व दिल्लीच्या 'सेंटर फॉर सायन्स अँड एज्युकेशन' यांनी वाजवी लोकभिमुख पर्यायांची माहिती दिली.

### जागतिक धरण आयोग : शेवटच्या टप्प्यात प्रवेश

जगातील मोठ्या धरणांच्या संदर्भात पुनर्विचार करणाऱ्या जागतिक धरण आयोगाच्या अंतर्गत जगभरातील १५० मोठ्या धरणांचा सखोल अभ्यास चालू आहे. त्यात भारतातील भाक्रा, नागार्जुन सागर, मैठन, तेनुघाट, जायकवाडी, कोयना, धोम, गांधीसागर, बरगी या नऊ धरणांचा समावेश तत्वाने केला गेला आहे. आयोगाच्या एप्रिलमध्ये झालेल्या बैठकीत मोठ्या-धरणांचे सामाजिक- पर्यावरणीय- आर्थिक परिणाम, रचनात्मक व संयोजनात्मक बाबी तसेच पर्याय यांवर चर्चा होऊन धरण आराखडा व संयोजनात लोकसहभाग, पाणी व ऊर्जा वापराबाबतचे नियोजन करण्याचा अधिकार हे कळीचे मुद्दे राहतील असे सर्वानुमते ठरले. आयोगाचा अंतिम अहवाल ऑगस्ट २००० मध्ये तयार होईल. 'मोठी धरणे म्हणजे विकासाची प्रतिके' या धारणेला प्रश्नचिन्ह लावण्याचे कार्य आयोगाद्वारे होत आहे.

(सौजन्य : समतेसाठी न्यायासाठी आंदोलन)

# हाकारा अंक-सूची

१) जानेवारी - मार्च १९८० : जबरन जोत जंगल जमीन
२) एप्रिल - जून १९८० : आदिवासी व शिक्षण
३) जुलै - सप्टेंबर १९८० : आदिवासी व वनसंवर्धन
४) ऑक्टोबर - डिसेंबर १९८० : आदिवासी साहित्य व कला
५) जानेवारी-मार्च १९८१ : दलितांना सवलती व राखीव जागा
६) एप्रिल - जून १९८१ : आदिवासी व आरोग्य
७) जुलै - सप्टेंबर १९८१ : वनशेती व संवर्धन
८) ऑक्टोबर - डिसेंबर १९८१ : रोजगार हमी योजना
९) जानेवारी - मार्च १९८२ : उत्तराखंड अभ्यास मोहीम
१०) एप्रिल - जून १९८२ : धरणे व विकास
११ - १२) जुलै - डिसेंबर १९८२ : जंगल व्यवस्थापन
१३) जानेवारी - मार्च १९८३ : आदिवासी व दारू
१४) एप्रिल - जून १९८३ : आदिवासींच्या सामाजिक/राजकीय चळवळी
१५) जुलै - सप्टेंबर १९८३ : प्रा. सरदार गौरव अंक/आदिवासी साहित्य
१६) ऑक्टोबर - डिसेंबर १९८३ : आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न
१७ - १८) जानेवारी - जून १९८४ : आदिवासींमधील स्वयंसेवी कार्य
१९) जुलै - सप्टेंबर १९८४ : आदिवासी स्त्री
२०) ऑक्टोबर - डिसेंबर १९८४ : आदिवासी आरोग्य व शिक्षण
२१) जानेवारी - मार्च १९८५ : आदिवासी संघटन
२२) एप्रिल - जून १९८५ : जमीन हस्तांतर
२३) जुलै - सप्टेंबर १९८५ : आदिवासी महिला
२४) ऑक्टोबर - डिसेंबर १९८५ : आदिवासी व सरकार
२५) जानेवारी - मार्च १९८६ : जंगल व धरण
२६) एप्रिल - जून १९८६ : आदिवासी कला
२७) जुलै - सप्टेंबर १९८६ : आदिवासी व वेठबिगारी
२८) ऑक्टोबर - डिसेंबर १९८६ : आदिवासीविषयक ग्रंथ मानवशास्त्र परिचय
२९) जानेवारी - मार्च १९८७ : भटक्याविमुक्त जमातींचे प्रश्न
३०) एप्रिल - जून १९८७ : आदिवासी आणि सांस्कृतिक बदल
३१ - ३२) जुलै - डिसेंबर १९८७ : राष्ट्रीय वननीतीचा प्रश्न
३३) जानेवारी - मार्च १९८८ : सवलती अपहरणाची समस्या
३४) एप्रिल - जून १९८८ : आदिवासी साहित्य
३५ - ३६) जुलै - डिसेंबर १९८८ : आदिवासी समाज व संस्कृती
३७ - ३८) जानेवारी - जून १९८९ : डॉ. बेरीअर एलबीन विशेषांक
३९ - ४०) जुलै - डिसेंबर १९८९ - व्यवसाय मार्गदर्शन
४१ - ४२) जानेवारी - जून १९९० : महाराष्ट्रातील आदिवासींची परिस्थिती
४३) जुलै - सप्टेंबर १९९० : जागतिक आदिवासी
४४) ऑक्टोबर - डिसेंबर १९९० : गं. बा. सरदार स्मृति विशेषांक
४५ - ४६) जानेवारी - जून १९९१ : आदिवासी साहित्य संमेलन विशेषांक
४७) जुलै - सप्टेंबर १९९१ : आदिवासींच्या विकासात्मक व सांस्कृतिक समस्या
४८) ऑक्टोबर - डिसेंबर १९९१ : आदिवासी जीवन व संस्कृती
४९ - ५०) जानेवारी - जून १९९२ : सर्वसाधारण आदिवासी
५१ - ५२) जुलै - डिसेंबर १९९२ : अनुताई वाघ विशेषांक
५३ - ५४) जानेवारी - जून १९९३ : आदिवासी धर्म, सण व उत्सव
५५ - ५६) जुलै - डिसेंबर १९९३ : धरण-विस्थापन व पुनर्वसन
५७) जानेवारी - मार्च १९९४ : सर्वसाधारण आदिवासी
५८) एप्रिल जून - १९९४ : आदिवासी एकता परिषद
५९) जुलै - सप्टेंबर १९९४ : आदिवासी विकासाची सैध्दान्तिक भूमिका
६०) ऑक्टोबर - डिसेंबर १९९४ : आदिवासी जमाती
६१ - ६२) जानेवारी - जून १९९५ : राणीपूर अभ्यास विशेषांक
६३) जुलै - सप्टेंबर १९९५ : कुपोषण विशेषांक
६४) ऑक्टोबर - डिसेंबर १९९५ : पर्यावरण विशेषांक
६५) जानेवारी - मार्च १९९६ : आदिवासी जमाती
६६) एप्रिल - जून १९९६ : महाराष्ट्र, ओरिसा अभ्यास दौरा
६७) जुलै - सप्टेंबर १९९६ : आदिवासी जमाती
६८) ऑक्टोबर - डिसेंबर १९९६ : आदिवासी शिक्षण
६९ - ७०) जानेवारी - जून १९९७ : वारली लोकगीते व बोलीभाषा
७१) जुलै - सप्टेंबर १९९७ : पंचायत राज विशेषांक
७२) ऑक्टोबर - डिसेंबर १९९७ : साहित्य संमेलन विशेषांक
७३) जानेवारी - मार्च १९९८ : वृक्ष लागवड व संवर्धन विशेषांक
७४) एप्रिल - जून १९९८ : सर्वसाधारण आदिवासी
७५ - ७६) जुलै - डिसेंबर १९९८ : आदिवासी समाज व संस्कृती
७७) जानेवारी - मार्च १९९९ : आदिवासी व आर्थिक धोरण
७८) एप्रिल जून १९९९ : आदिवासी विकास व संस्कृती
७९ - ८०) जुलै - डिसेंबर १९९९ : बोर्डी परिसर अभ्यास
८१) जानेवारी - मार्च २००० : आदिवासी जीवन, कला व मराठी साहित्य
८२) एप्रिल - जून २००० : स्त्रिया आणि आरोग्य

Registered with the Registrar of News Papers of India Under No. 35835/80.

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन, कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण.

शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकत्र व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे.

मानव विज्ञान व सामाजिक शास्त्र यांच्या शिक्षकांना व विचारवंतांना, मुख्यत: आदिवासींबाबत अभ्यासकांना एकत्र आणणे.

मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन प्रकाशन.

या उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशाचे मूर्त स्वरूप म्हणून 'हाकारा' त्रैमासिक सुरु करण्यात आले आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारून आपणही या कार्यात सहभागी व्हावे. (संस्थांना फक्त 'हाकारा' चे वार्षिक सदस्यत्व मिळेल.)

## मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व

आजीव सभासद ५०० रुपये (फक्त व्यक्तींसाठी)

हाकारा वार्षिक सभासद ५० रुपये (व्यक्ती व संस्था दोन्ही)

परिषदेच्या सभासदांना 'हाकारा' विनामूल्य पाठविला जातो. आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' (दि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ अॅन्थ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस) यांचे नांवे डिमांड ड्राफ्ट अथवा मनी ऑर्डरने पाठवावी. मनीऑर्डर करताना फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव व पूर्ण पत्ता लिहिण्यास विसरू नये.

**पत्रव्यवहाराचा पत्ता**

रा. के. मुटाटकर, अध्यक्ष
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७.

आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा.

PRINTED BY : ASSIGN SYSTEMS, PUNE 30.